इस्लाम
आतंक नव्हे आदर्श

लेखक

स्वामी लक्ष्मी शंकराचार्य

अनुवाद

सय्यद जाकिर अली

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ
१.	....आणि मला सत्य ज्ञान प्राप्त झाले!	४
२.	एक सुनियोजित कुटिल डाव	६
३.	पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र जीवन	८
४.	इस्लाम आणि आतंकवाद	१९
५.	कुरआनातील त्या चोवीस आयती	२४
६.	कुरआनची आदर्श शिकवण	४७
७.	इस्लाम मानवतेच्या कल्याणासाठी	५३
८.	इस्लाममध्ये आदर्श न्याय	५५
९.	सर्वोत्तम मानवी आदर्श	५७
१०.	पैगंबर मुहम्मद (स.) यांची वचने	६०
११.	सनातन वैदिक धर्म आणि इस्लाम	६३
१२.	सनातन वैदिक धर्म आणि इस्लाममधील आश्चर्यकारक साम्य	६५
१३.	गीतेतील प्रसिद्ध श्लोक	७२
१४.	बांधवानो! जरा गंभीरपणे विचार करा!	७५
१५.	आपणा सर्वांचे कर्तव्य	७९
१६.	समर्पण	८१

....आणि मला सत्य ज्ञान प्राप्त झाले!

बऱ्याच वर्षांपूर्वी हिंदी दैनिक जागरणमध्ये बलराज मधोक यांचा 'दंगे क्यों होते हैं?' (अर्थात- दंगली का घडतात?) लेख वाचला. कुरआनमध्ये अल्लाहने अनेकेश्वरवादींशी लढण्याचा आदेश दिलेला असल्याने दंगली घडतात, असे या लेखात स्पष्ट करण्यात आलेले होते. अनेकेश्वरवादींशी लढण्याचे आदेश देणाऱ्या आयतींचा संदर्भदेखील त्या लेखात देण्यात आला होता.

यानंतर एकाने मला एक जाहिरात पत्रिका वाचायला दिली. त्यात मुस्लिमेतर धर्मियांशी लढण्याचे आदेश देण्यात आलेल्या कुरआनातील त्या २४ आयती सादर करण्यात आल्या होत्या. ते वाचल्यावर माझ्या मनात कुरआन वाचण्याची कमालीची जिज्ञासा निर्माण झाली. इस्लामी पुस्तक विक्रेत्याकडून मला कुरआनचा एक हिंदी अनुवाद मिळाला. जाहिरात पत्रिकेत उल्लेखण्यात आलेल्या 'त्या' सर्व २४ आयती कुरआनच्या या हिंदी अनुवादात मिळाल्या. या आयती पाहिल्यावर माझी अशी धारणा झाली की, इतिहासात हिंदू राजे आणि मुस्लिम बादशाह यांच्यात झालेल्या रक्तरंजित युद्धांचे आणि आजपर्यंत होत असलेल्या दंगलींचे मूळ कारण कुरआनातील याच २४ आयती आहेत. कारण अल्लाहने या आयतींतून हीच शिकवण दिली आहे की मुस्लिमांनी अनेकेश्वरवादींशी म्हणजेच मुस्लिमेतर धर्मियांशी युद्ध करावे, त्यांना मारावे, झोडावे, त्यांच्या हत्या कराव्यात. म्हणूनच आजपर्यंत हिंदू राजे आणि मुस्लिम बादशाहांमध्ये घनघोर लढाया झाल्या आणि आजपर्यंत हिंदू-मुस्लिम दंगली व रक्तपात होत आहे. आता मलाही हेच मनोमन वाटू लागले की कुरआनातील याच २४ आयतींतील शिकवणींमुळे मुस्लिमांमध्ये आतंकवादाची भावना फोफावत आहे. मला प्रत्येक आतंकवादी घटनेचा संबंध इस्लामशी असल्याचे स्पष्ट दिसू लागले. इस्लाम, इतिहास आणि आजच्या घटनांचा परस्पर संबंध जोडून मी 'इस्लामी आतंकवाद का इतिहास' (अर्थात- इस्लामी आतंकवादाचा इतिहास) असे हिंदीत एक पुस्तकही लिहून टाकले. त्याचप्रमाणे सुदर्शन प्रकाशन, सीता कुंज, लिबर्टी गार्डन, रोड नं. ३, मालाड (प.), मुंबई-४०००६४ येथून माझ्या या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद 'The History of Islamic Terrorism' या नावाने प्रकाशित झाला.

अगदी जवळच्याच काळात इस्लाम धर्माच्या विद्वानांकडून (उलेमांकडून) आलेले स्पष्टीकरण वाचले की, 'इस्लामचा आतंकवादाशी मुळीच संबंध नाही', 'इस्लाम हा प्रेम, सद्भावना आणि बंधुत्वाचा धर्म आहे', 'कोणत्याही निरपराधावर हात टाकणे इस्लामविरूद्ध आहे' वगैरे, इतकेच नव्हे तर आतंकवादाविरूद्ध इस्लामी विद्वानांनी फतवासुद्धा काढला.

यानंतर कुरआनातील जिहादसंबंधी असलेल्या आयतींविषयी जाणून घेण्यासाठी मी भिन्न मुस्लिम विद्वानांशी संपर्क साधला. या वेळी त्यांनी मला सांगितले की कुरआनातील आयती भिन्न-भिन्न परिस्थितीत अवतरित झालेल्या आहेत. या अनुषंगाने कुरआनचा केवळ

अनुवाद पाहून चालणार नसून कोणती आयत कोणत्या परिस्थितीत अवतरित झाली, तिची पार्श्वभूमी काय आहे, हे जाणून घेतल्याशिवाय कोणत्याही आयतीचा वास्तविक अर्थ आणि उद्देश समजणे शक्य नाही. याबरोबरच यावर लक्ष देणेसुद्धा आवश्यक आहे की कुरआन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाला आहे. त्यामुळे कुरआनचे खऱ्या अर्थाने अध्ययन करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्रसुद्धा जाणून घ्यावे लागेल.

याविषयी इस्लामी विद्वानांशी संपर्क साधल्यानंतर ते म्हणाले, "तुम्ही कुरआनातील ज्या आयतींचा अनुवाद आपल्या पुस्तकाच्या संदर्भासाठी घेतला, त्या आयती मुळात निरूपद्रवी असलेल्या मुस्लिमेतरांशी लढण्यासंबंधी नसून अत्याचारी, उपद्रवी अनेकेश्वरवादींशी लढण्यासंबंधी आहेत. त्या आयतींचा अर्थ असा मुळीच नाही की मुस्लिमांनी उठसूट कोणत्याही निरपराध परधर्मियाचा गळा कापावा. त्या आयती अत्याचारी व उपद्रवी मुस्लिमेतरांविषयी अवतरित झालेल्या आहेत. कारण हे मुस्लिमेतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सत्यधर्म स्थापण्याच्या आंदोलनात अडथळे निर्माण करीत होते, देशात रक्तपात माजवीत फिरत होते. म्हणून शांतता स्थापन करण्याच्या मार्गात अडचणी निर्माण करणाऱ्या आणि हिंसाचार करणाऱ्यांविरूद्ध कुरआनात 'जिहाद' करण्याचा आदेश देण्यात आला आहे. इस्लामचा खरा अभ्यास नसल्याने लोकांना कुरआनच्या शिकवणींचा अर्थ समजत नाही. जर कुरआनसह पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्रही वाचले तर कुरआनचा वास्तविक अर्थ लक्षात येईल आणि इस्लामविषयी गैरसमज होणार नाही."

मुस्लिम विद्वानांनी सांगितल्याप्रमाणे मी सर्वप्रथम पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास अगदी शुद्ध मनाने केला. यानंतर याच विचारानुसार मी कुरआनसुद्धा आरंभ ते अखेरपर्यंत वाचले, तेव्हा मला कुरआनातील आयतींचा वास्तविक अर्थ आणि हेतू लक्षात येऊ लागला. वस्तुस्थिती लक्षात आल्यावर मला आपल्या चुकीची जाणीव झाली. नकळत मला चुकीचा भ्रम झाला आणि याच गैरसमजुतीतून मी 'इस्लामी आतंकवाद का इतिहास' पुस्तक लिहून आतंकवादाची मुळे इस्लाममध्ये असल्याचे दाखविले आणि मला माझ्याकडून घडलेल्या या चुकीविषयी मनापासून खेद वाटला. खूप पश्चात्ताप झाला. मी परम दयाळू अल्लाहसमोर या चुकीची मनापासून माफी मागतो. त्याचप्रमाणे पैगंबर मुहम्मद (स.) यांची आणि समस्त मुस्लिम बांधवांची सार्वजनिकरित्या माफी मागून अज्ञानतेत इस्लामविषयी लिहिलेले शब्द परत घेतो. सगळ्या जनतेस मी आवाहन करतो की 'इस्लामी आतंकवाद का इतिहास' या पुस्तकात जे काही लिहिण्यात आले ते रद्द समजावे.

आपला

स्वामी लक्ष्मी शंकराचार्य

ए-१६०१, आवास विकास कॉलनी,

हंसपुरम, नौवस्ता, कानपूर-२०८०२१.

email: laxmishankaracharya@yahoo.in

एक सुनियोजित कुटिल डाव

सुरूवात अशी झाली की भारतासहित जगामध्ये कोठेही बॉम्बस्फोट झाला अथवा काहींची हत्या झाली आणि योगायोगाने यात मुस्लिमांचा सहभाग असला तर यास 'इस्लामी आतंकवाद' अशी संज्ञा देण्यात आली.

लागलीच मीडिया आणि काही विशिष्ट मंडळींनी आपल्या स्वार्थासाठी याला अत्यंत सुनियोजितपणे इस्लामी आतंकवादाची व्याख्या दिली. परिणामी आज कोणत्याही ठिकाणी बॉम्बस्फोट झाला अथवा अशा प्रकारची एखादी घटना घडली की तिला तत्काळ इस्लामी आतंकवादी घटना आहे असे डोळे झाकून मानण्यात येते.

अशा या वातावरणात संपूर्ण जगामध्ये प्रसारमाध्यमांकडून आणि पाश्चिमात्य जगतासहित इतरही कित्येक देशांमध्ये वेगवेगळ्या भाषांत शेकडो पुस्तके लिहून असा रीतसर प्रसार करण्यात आला की जगातील आतंकवादाचे मूळ इस्लाममध्येच आहे.

याच दुष्प्रचारात असे प्रमाणित करण्यात आले की कुरआनमध्ये मुस्लिमांना असा आदेश देण्यात आला आहे की त्यांनी इस्लामेतर अन्य धर्मियांशी लढत राहावे, त्यांच्या निर्घृणपणे हत्या कराव्यात, त्यांना बळजबरी मुस्लिम करावे, त्यांची पूजास्थाने नष्ट करावीत, हा जिहाद आहे. अशा प्रकारचा जिहाद करणाऱ्यांना अल्लाह स्वर्ग प्रदान करील. अशा प्रकारे अगदी पूर्वनियोजितपणे इस्लामची बदनामी करण्यासाठी खास निर्दोष आणि निरपराधांची हत्या घडवून आणणारा आतंकवादी धर्म घोषित करण्यात आले आणि 'जिहाद' या शब्दाचा अर्थ आतंकवाद असल्याचा प्रचार करण्यात आला.

मात्र सत्य जाणून घेतल्याशिवाय पर्याय नाही. सत्य जाणून घेण्याकरिता आपण तीच पद्धत अवलंबू या, जिच्या आधारे आपल्याला सत्य ज्ञान झाले होते. यासाठी मी अगदी प्रामाणिक व पवित्र प्रयत्न केले. यात माझ्याकडून नकळत एखादी चूक घडली असेल तर त्यासाठी वाचक मला क्षमा करतील!

इस्लामचे खऱ्या अर्थाने प्रमाणबद्ध अध्ययन करण्याचे तीन मार्ग आहेत,

१) कुरआनातील अल्लाहचे आदेश,

२) पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र, आणि

३) पैगंबर मुहम्मद (स.) यांची कथने अर्थात हदीसशास्त्र.

हे तिन्ही मार्ग म्हणजे इस्लाम जाणून घेण्याच्या जणू तीन कसोट्याच होय. आता याच तिन्ही कसोट्यांच्या आधारावर आपण हे पाहू या की,

* खरोखरच इस्लाम निर्दोष आणि निरपराधांशी लढण्याचा व त्यांची हत्या आणि

हिंसाचार करण्याचा आदेश देतो काय?

* खरोखरच इस्लाम परधर्मियांची पूजास्थळे नष्ट करण्याचा आदेश देतो काय?
* खरोखरच इस्लाम इतरांना बळजबरी मुस्लिम करण्याचा आदेश देतो काय?
* खरोखरच हल्ले करणे, निर्दोषांची हत्या करणे आणि आतंक माजविण्याचे नाव म्हणजे जिहाद आहे?
* खरोखरच इस्लाम एक आतंकवादी धर्म आहे काय?

सर्वप्रथम याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे की मुहम्मद (स.) हे अल्लाहचे अंतिम पैगंबर आहेत. यांच्यावरच अंतिम ईशग्रंथ कुरआन अवतरित झाला. त्यांना पैगंबरत्व मिळाल्यापासून २३ वर्षांपर्यंत त्यांनी जे काही केले, ते अगदी कुरआननुसारच केले.

दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास पैगंबर मुहम्मद (स.) यांचे संपूर्ण जीवन कुरआनचेच अर्थात इस्लामचेच प्रात्यक्षिक अगर व्यावहारिक रूप आहे. म्हणून कुरआन व इस्लामला जाणून घेण्याचा सर्वांत महत्त्वपूर्ण व सोपा मार्ग पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करणे आहे, असा माझा स्वयं अनुभव आहे. मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र आणि कुरआन वाचून आपण स्वत: निर्णय घेऊ शकता की 'इस्लाम एक आतंक आहे की आदर्श!'

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र जीवन

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र जीवनचरित्र लिहिणारे विद्वान लिहितात,

मुहम्मद (स.) यांचा जन्म मक्का शहरात कुरैश कबिल्याचे सरदार अब्दुल मुत्तलिब यांचे सुपुत्र अब्दुल्लाह यांच्या परिवारात इ. स. ५७० मध्ये झाला. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा जन्म होण्याच्या काही दिवसांपूर्वीच त्यांचे पिता माननीय अब्दुल्लाह निधन पावले. मुहम्मद (स.) जेमतेम सहा वर्षांचे असतानाच त्यांची आई आमिना यांचेदेखील निधन झाले. आठ वर्षांच्या वयात आजोबा अब्दुल मुत्तलिब यांचेसुद्धा निधन झाले तेव्हा मुहम्मद (स.) यांच्या संगोपनाची सर्वस्वी जबाबदारी त्यांचे काका अबू तालिब यांच्यावर आली. वयाच्या २५ व्या वर्षी मुहम्मद (स.) यांचे लग्न खदीजाशी झाले. ती मक्का शहरातील अत्यंत समृद्धशाली व प्रतिष्ठित परिवारातील विधवा महिला होती.

त्या काळी मक्का शहरातील लोक काबागृहातील ३६० मूर्तींची पूजा करीत होते. मक्का शहरात मूर्तिपूजनाची प्रथा 'सीरिया'मधून येऊन रूढ झाली होती. काबागृहात सर्वप्रथम 'हुबल' देवतेची सीरियातून आणलेली मूर्ती स्थापन करण्यात आली होती. यानंतर 'इसाफ' आणि 'नाईला' या देवतांच्या मूर्ती ज़मज़म नावाच्या विहिरीशेजारी स्थापण्यात आल्या. यानंतर प्रत्येक कबिल्याने आपापली वेगवेगळी मूर्ती स्थापन केली. उदाहरणार्थ- कुरैश कबिल्याने 'उज्जा' देवतेची, ताईफ येथील सकीफ़ कबिल्याने 'लात' देवताची, त्याचप्रमाणे मदीना शहरातील औस आणि खज़रज या कबिल्यांनी 'मनात' या देवतेची मूर्ती स्थापली. तसेच वद्द, सुवाअ, यगूस, नसर वगैरे प्रमुख मूर्ती होत्या. याव्यतिरिक्त इब्राहीम (अ.), इस्माईल (अ.), इसा (अ.) (मसीह) वगैरे पैगंबरांची चित्रे आणि मूर्तीदेखील काबागृहात होत्या.

अशा परिस्थितीत वयाच्या ४० व्या वर्षी मुहम्मद (स.) यांच्यावर पवित्र रमजान महिन्यात मक्कापासून सहा मैल अंतरावर असलेल्या 'हिरा' नामक गुहेत देवदूत जिब्रिलमार्फत सर्वप्रथम अल्लाहचा संदेश प्राप्त झाला. यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर वेळोवेळी अल्लाहचे आदेश अवतरित होत राहिले आणि याच आदेशांचे संकलन कुरआन आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) लोकांना अल्लाहचा संदेश देऊ लागले की 'अल्लाह (ईश्वर) एकच असून त्याचा इतर कोणीही भागीदार नाही. म्हणून केवळ अल्लाहच आराधनेस पात्र आहे. सर्वांनी त्याचीच उपासना केली पाहिजे. अल्लाहने मला पैगंबर केले आणि मानवजातीस सत्यमार्ग दाखविण्यासाठी वेळोवेळी दैवी मार्गदर्शन अर्थात कुरआन अवतरित केले.' ज्या लोकांनी मुहम्मद (स.) यांच्या या आदेशावर विश्वास ठेवला (श्रद्धा

बाळगली) ते मुस्लिम ठरले. 'मुस्लिम' शब्दाचा अर्थ आज्ञाकारी, स्वत:ला ईश्वरापुढे समर्पित करणारा.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नी खदीजा (रजि.) यांनी सर्वप्रथम आपल्या पतीवर श्रद्धा व्यक्त करून मुस्लिम झाल्या. यानंतर मुहम्मद (स.) यांचे चुलत भाऊ माननीय अली (रजि.) आणि जिवलग मित्र माननीय अबू बकर (रजि.), तसेच त्यांचे दत्तकपुत्र माननीय जैद (रजि.) यांनी 'मी साक्ष देतो की अल्लाहशिवाय कोणीही पूज्य नाही आणि मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.' असे म्हणून इस्लाम स्वीकारला.

याव्यतिरिक्त मक्का शहरातील काही इतर लोकसुद्धा मुहम्मद (स.) यांच्यावर श्रद्धा ठेवू लागले अर्थात इस्लामचा स्वीकार करू लागले. काही दिवसांनी कुरैश कबिल्याच्या सरदारांना माहीत झाले की मुहम्मद (स.) यांनी पूर्वजांचा अनेकेश्वरवादी धर्म आणि मूर्तिपूजेच्या ठिकाणी एका आगळ्या-वेगळ्या धर्माचा प्रचार सुरू केला आणि पूर्वजांच्या पारंपरिक धर्माला समाप्त करीत आहेत. कबिल्याच्या पुढाऱ्यांच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली. मक्का शहरातील सर्वच अनेकेश्वरवादी पुढारी मंडळी एकत्र आली नि मुहम्मद (स.) यांचे काका अबू तालिब यांच्याकडे त्यांची तक्रार घेऊन गेले.

पुढारी मंडळींची तक्रार दूर करण्यासाठी काका अबू तालिब यांनी आपले पुतणे मुहम्मद (स.) यांना बोलावून घेतले व म्हणाले,

"हे बघा मुहम्मद (स.)! हे आपल्या कुरैश कबिल्याचे मोठमोठे पुढारी आहेत. त्यांची अशी मागणी आहे की, तुम्ही 'अल्लाहशिवाय कोणी पूज्य नाही' असा प्रचार करू नये आणि आपल्या पूर्वजांच्या धर्माचे पालन करावे."

मात्र मुहम्मद (स.) यांनी "अल्लाहशिवाय कोणीही पूज्य नाही." या सत्याचा प्रचार बंद करण्याचे साफ नाकारले आणि कुरैश कबिल्याचे पुढारी क्रोधित होऊन निघून गेले. अबू तालिब यांच्याशी झालेली बैठक पार निष्फळ ठरल्यावर संतापलेल्या कुरैश पुढाऱ्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना चिरडण्याचा व त्यांचे प्रचारकार्य बंद करण्याचा चंग बांधला. त्यासाठी ते पैगंबर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा अमानुष छळ करू लागले, त्यांना अपमानित करू लागले, त्यांच्यावर दगडांचा वर्षाव करू लागले. मात्र अत्यंत संयमी पैगंबरांनी शत्रूंच्या दुष्टतापूर्ण व्यवहारास सज्जनता आणि सद्वर्तनानेच उत्तर दिले.

पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्या अनुयायांच्या विरोधात कुरैशजनांची साथ देण्याकरिता अरबचे आणखीनही बरेच कबिले होते. या सर्वच विरोधकांनी सर्वसंमतीने ठरविले की कोणताही कबिला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कोणत्याही अनुयायास अर्थात मुस्लिमास शरण देणार नाही. दिसेल तेथे प्रत्येक मुस्लिमास अमानुषपणे मारझोड

करायची, त्यास अपमानित करायचे, जेणेकरून त्याने आपल्या पूर्वजांच्या धर्मावर परतावे. ते आता तर जास्तच निर्दयीपणे असहाय मुस्लिमांना छळू लागले. विरोधक त्यांना कैद करून ठेवीत, अन्न व पाण्यावाचून त्यांचे हाल करून सोडीत, अरबभूमीच्या अतिउष्ण वाळूवर टाकून देत, लोखंडाच्या लाल-गरम सळयांनी शरीरावर डाग देत आणि असे नाना प्रकारे त्यांचा छळ करण्यात येई.

माननीय यासिर (रजि.) यांनी अत्याचार सहन करीत तडफडून प्राण सोडले. पैगंबर मुहम्मद (स.) आणि मुस्लिमांचा सर्वांत मोठा विरोधक अबू जहल माननीय सुमैया (रजि.) यांच्यावर निर्दयीपणे अत्याचार करू लागला. एके दिवशी माननीय सुमैया (रजि.) यांनी अबू जहलच्या छळाला वैतागून शाप दिला आणि अबू जहल याने भाल्याने चिरून सुमैया (रजि.) यांचा अमानुषपणे वध केला. अशा प्रकारे इस्लाममध्ये माननीय सुमैया (रजि.) सर्वप्रथम सत्याच्या रक्षणार्थ शहीद झाल्या.

कुरैश माननीय अम्मार (रजि.) यांना लोखंडी कवच चढवून दुपारच्या रखरखत्या उन्हात टाकून देत आणि मग ते बेशुद्ध होईपर्यंत चोप देत असत.

इस्लामचा स्वीकार करून मुस्लिम झालेले माननीय बिलाल (रजि.) हे कुरैशचा पुढारी उमैयाचे गुलाम होते. माननीय बिलाल (रजि.) यांनी इस्लाम स्वीकारल्याचे समजताच क्रूरकर्मा उमैयाने त्यांचे अन्नपाणी बंद करून टाकले. भूक आणि तहानेने व्याकूळ झालेल्या बिलाल (रजि.) यांना दुपारच्या रखरखत्या उन्हात उताणे झोपवून त्यांच्या छातीवर भयंकर वजनदार दगडी शिला ठेवून बजावत असे, ''मुस्लिम होण्याचा परिणाम असाच भोगत राहा.''

त्या काळी इस्लाम स्वीकारलेल्या सर्वच गुलामांवर अशाचप्रकारे अमानुष अत्याचार करण्यात येत होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवलग मित्र माननीय अबू बकर (रजि.) यांनी स्वत:चे धन खर्च करून या सर्वांना मुक्त केले.

एखाद्या मुस्लिमास जेव्हा कुरैशजन कुरआनचे पठण करताना अथवा नमाज पढताना पाहत तेव्हा प्रथम त्यांची ते टर उडवीत, नंतर त्यांचा अमानुषपणे छळ करीत. म्हणून मुस्लिमांना लपूनछपूनच नमाज अदा करावी लागत असे आणि कुरआन पठण हळू आवाजात करीत असत.

एके दिवशी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे एक अनुयायी माननीय अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) हे काबागृहात नमाजमध्ये मग्न होते. त्यांना नमाज अदा करताना पाहताच तेथे उपस्थित सर्व कुरैशजन त्यांच्यावर तुटून पडले.

कुरैशजनांचे अत्याचार वरचेवर वाढतच असल्याने मुस्लिमांचे जगणे अशक्य

झाले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना मक्का सोडून 'ॲबिसीनिया' या देशी जाण्याचा आदेश दिला. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आदेश मिळताच बरेच मुस्लिम ॲबिसीनियाकडे रवाना झाले. ॲबिसीनियाचा राजा नेगूस हा ख्रिस्ती होता. इस्लामविरोधी कुरैशजनांना ही वार्ता मिळताच आपल्यापैकी दोनजणांचे प्रतिनिधीमंडळ राजा नेगूसकडे पाठवून निरोप धाडला,

"आमच्याकडील काही अपराध्यांनी पळून जाऊन आपल्या देशात शरण घेतली. त्यांनी आमच्या पारंपरिक धर्माविरूद्ध बंड करण्याचा घोर अपराध केला असून तुमचा ख्रिस्ती धर्मसुद्धा स्वीकारला नाही. तरीदेखील ते तुमच्या देशात राहत आहेत. त्यांनी आपल्या पूर्वजांच्या धर्माचा त्याग करून एक नवीनच धर्म घेऊन चालत आहेत, जो आमच्याही परिचयाचा नाही आणि तुम्हासही त्याची कल्पना नाही. म्हणून हे आमचे अपराधी असून त्यांना आमच्या स्वाधीन करावे."

हा निरोप मिळताच राजा नेगूसने मुस्लिमांना विचारले,

"तुम्ही कोणता नवीन धर्म स्वीकारला आहे जो आम्हास माहीत नाही?"

राज्याच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी मुस्लिमांकडून माननीय जाफर (रजि.) समोर आले व राजाला उद्देशून नम्रपणे म्हणाले,

"हे राजन! पूर्वी आम्ही असभ्य आणि अज्ञानी होतो. मूर्तिपूजा करीत होतो, अनैतिक व गुन्हेगारीची कामे करीत होतो, शेजाऱ्यांना त्रास देत आणि आपसात खूप भांडणे करीत होतो. अशा परिस्थितीत अल्लाहने आमच्यापैकीच एक पैगंबर धाडला. त्याने आम्हाला सत्यधर्म इस्लामचा संदेश दिला. त्याने अल्लाहचा संदेश देताना म्हटले की, एकाच ईश्वराची पूजा करावी, निर्जीव मूर्तींची पूजा करणे सोडून द्यावे, सत्य बोलावे व शेजाऱ्यांशी उत्तम व्यवहार करावा, कोणावरही अन्याय व अत्याचार करू नये, व्यभिचार आणि वाईट कर्म सोडून द्यावे, अनाथ आणि दुर्बलांची संपत्ती बळकावू नये, शीलवान स्त्रियांवर व्यभिचाराचा आळ लावू नये, नमाज अदा करावी आणि दानधर्म करावे. आम्हास त्यांच्या शिकवणी सत्य वाटल्या आणि त्यांवर विश्वास ठेवून आम्ही मुस्लिम झालो."

माननीय जाफर (रजि.) यांच्या या भाषणाने राजा नेगूस खूप प्रभावित झाला. त्याने कुरैशच्या प्रतिनिधीमंडळास स्पष्टपणे सांगून परत पाठविले की हे लोक आता येथेच राहतील.

मक्का शहरात खत्ताब यांचे पुत्र उमर हे अत्यंत क्रोधी स्वभावाचे मात्र खूप शूर आणि धाडसी योद्धे होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अल्लाहच्या दरबारी प्रार्थना केली

"जर उमर यांनी इस्लामचा स्वीकार केला तर इस्लामी आंदोलनास बळ मिळेल, मोठी मदत मिळेल." मात्र उमर यांचा स्वभाव खूपच रागीट आणि तापट होता. ते मुस्लिमांचे कट्टर विरोधक होते. राजा नेगूस याने मुस्लिमांना शरण दिल्याचे ऐकून त्यांचा क्रोध अनावर झाला. त्यांना वाटू लागले की मुहम्मद (स.) यांचाच काटा काढला तर नेहमीकरिताची कटकट मिटेल आणि ते कायमचा काटा काढण्यासाठी तलवार हाती घेऊन निघाले. रस्त्यात त्यांची भेट नुऐम बिन अब्दुल्लाह (रजि.) यांच्याशी झाली. नुऐम (रजि.) यांनी आधीच इस्लाम स्वीकारलेला होता, मात्र उमर (रजि.) यांना याची माहिती नव्हती. बोलता बोलता नुऐम (रजि.) यांच्या लक्षात आले की उमर हे मुहम्मद (स.) यांचा वध करण्यासाठी निघालेले आहेत. तेव्हा त्यांनी म्हटले, "उमर! आधी आपल्या बहीण-मेहुण्याची खबर घ्या, तेदेखील मुस्लिम झाले आहेत."

हे ऐकून उमर यांचा पारा जास्तच चढला. त्यांनी सरळ बहिणीचे घर गाठले. दारावर पोचताच त्यांना घरातून त्यांच्या कानावर काहीतरी पठण करण्याचा आवाज ऐकू आला. आत माननीय खब्बाब (रजि.) कुरआन पठण करीत होते. उमर यांचा आवाज येताच ते घाबरून आत जाऊन लपले. ते पठण करीत असलेल्या कुरआनाची पाने त्यांची बहीण फातिमा (रजि.) यांनी कुठेतरी लपविली आणि मग त्यांचे मेहुणे सईद (रजि.) यांनी दरवाजा उघडला. उमर यांनी संतापातच घरात प्रवेश केला. कर्कश आवाजात म्हणाले, "तुम्हाला काय वाटते, तुम्ही इस्लाम स्वीकारल्याचे मला माहीत होणार नाही काय?"

मग निर्दयीपणे बहीण व मेहुण्यास मारायला सुरूवात केली. बहिणीचे डोके फुटून त्यातून रक्त वाहू लागले. मात्र बहीण उमरसमोर नमते घ्यायला तयार नव्हती. इतका मार खावूनही ती इस्लाम त्यागण्यासाठी तयार नव्हती. बहिणीचा दृढविश्वास पाहून पर्वतासारखे दणकट स्वभावाचे उमर पार हादरून गेले. त्यांनी बहिणीला कुरआनाची पाने दाखवायला सांगितले. उमर (रजि.) स्वत: कुरआनच्या शिकवणी वाचू लागले आणि वाचता वाचता त्यांचे मनपरिवर्तन होऊ लागले. आता मुस्लिम बनण्याचा इरादा करून ते मुहम्मद (स.) यांना भेटायला निघाले.

उमर यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना विनम्रपणे सांगितले, "मी इस्लाम स्वीकारायला आलो आहे. मी साक्ष देतो की 'अल्लाहशिवाय कोणीही पूज्य नाही आणि मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.' आता मी मुस्लिम आहे."

अशा प्रकारे मुस्लिमांची संख्या सतत वाढत होती. आपला प्रत्येक वार रिकामा जात असून आपल्यावरच उलटत असल्याचे पाहून कुरैशच्या पुढाऱ्यांनी याला रोखण्यासाठी तत्काळ बैठक घेतली. सर्वसंमतीने निर्णय घेऊन सगळे पुढारी मिळून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या परिवारप्रमुख अर्थात अब्दुल मुत्तलिब यांच्याकडे गेले आणि त्यांना बजावले,

"मुहम्मद (स.) यांना आमच्या स्वाधीन करा, आम्ही त्यांची हत्या करू आणि या खुनाच्या बदल्यात आम्ही तुम्हाला अमाप संपत्ती देऊ. अन्यथा आम्ही सगळेजण घेराव करून तुम्हा सर्वांना नजरकैदेत बंद करू. तुम्हाला वाळीत टाकू. तुमचा सामाजिक व आर्थिक बहिष्कार करू. समाजातील कोणतीही व्यक्ती तुमच्याशी कसलाही संबंध ठेवणार नाही. कोणीही तुमच्याशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणार नाही. भूक-तहानेने तुम्ही सगळेजण तडफडून मरून जाल."

मात्र मुहम्मद (स.) यांना शत्रूच्या स्वाधीन करण्यास अबू तालिब यांनी स्पष्ट नकार दिला. परिणामी कुरैश सरदारांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे काका अबू तालिब आणि सर्व परिवारजनांना एका घाटीत नजरकैद केले. भुकेमुळे झाडाची पाने त्यांना खावी लागली. दीर्घकाळानंतर मुस्लिमांच्या काही स्नेह्यांच्या मध्यस्थीने हा बहिष्कार संपुष्टात आला. यानंतर काही दिवसांतच अबू तालिब यांचेदेखील निधन झाले आणि थोड्या दिवसांनंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नीचेदेखील निधन झाले.

मक्का येथील विरोधकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अल्लाहचा संदेश देणे बंद करावे यासाठी अनेक प्रयत्न केले. काका अबू तालिब यांच्या मृत्यूनंतर विरोधकांना जास्तच गुर्मी चढली. एके दिवशी पैगंबर मुहम्मद (स.) काबागृहात नमाज अदा करीत होते, कोणीतरी त्यांच्यावर उंटाचे वजनदार आणि गलिच्छ आतडे टाकले. मात्र पैगंबरांनी तोंडातून 'ब्र'देखील काढला नाही आणि शापसुद्धा दिला नाही. अशाचप्रकारे एकदा पैगंबर मुहम्मद (स.) रस्त्यावरून जात असताना कोणीतरी त्यांच्या डोक्यावर माती टाकली. ते घरी परतले. आपल्या पित्यावर सतत होणारे अत्याचार पाहून पैगंबरांची चिमुकली कन्या फातिमा रडतरडतच पित्याचे डोके धुवू लागली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या लाडकीचे सांत्वन करताना म्हटले,

"बाळ! रडू नकोस. अल्लाह तुझ्या बापाची मदत करील!"

मुहम्मद (स.) कुरैशजनांच्या अमानुष छळ आणि त्रासाला वैतागून ताईफकडे निघाले. तेथे मात्र कोणीदेखील त्यांना थारा दिला नाही. तेथील लोकांनी अल्लाहचा संदेश नाकारला आणि त्यांना अल्लाहचे पैगंबर मान्य केले नाही. इतकेच नव्हे तर सक़ीफ कबिल्याच्या एका पुढाऱ्याने काही टवाळ गुंड पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मागे पाठविले. त्यांनी पैगंबरांना दगडांचा वर्षाव करून चांगलेच जखमी केले. रक्तबंबाळ झालेल्या पैगंबरांनी एका द्राक्षाच्या बागेत जाऊन आपला जीव वाचविला. मक्का शहरातील विरोधकांना हे सर्व कळल्यावर त्यांनी खूप टर उडविली. याबरोबरच विरोधकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हत्येची एक योजना आखली.

पैगंबर मुहम्मद (स.) ताईफवरून मक्का शहरी परतण्यास निघाले. हिरा गुहेजवळ

काही मित्रांनी पैगंबरांना कुरैशजनांच्या हत्येच्या योजनेची खबर दिली. त्यामुळे पैगंबरांनी आपल्या पत्नी खदीजाकडून असलेल्या नातेवाईक अदीचे पुत्र मुतईम यांचे अभय घेऊन मक्का शहरात प्रवेश मिळविला. मुतईम यांनी अभय दिल्यामुळे विरोधक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर हात टाकू शकले नाहीत. मात्र ते काबागृही पोचताच अबू जहलने त्यांची खिल्ली उडविली.

पैगंबर मुहम्मद (स.) सत्य प्रचारकार्य करीत राहिले. त्यांनी अरबच्या अन्य कबिल्यांना इस्लामचे आवाहन केले.

मदीना शहरात इस्लामचे वारे वाहू लागले. इस्लाम स्वीकारताच मदीना शहरातील काही नागरिकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संरक्षणाची शपथ घेतली. यानंतर मदीना शहरातील नागरिकांनी निर्णय घेतला की आपण जेव्हा हजयात्रेला जाऊ तेव्हा पैगंबरांना मदीना शहरी येण्याचे निमंत्रण देऊ. हजचा काळ येताच मदीना शहरातून मुस्लिम आणि मुस्लिमेतर लोकांचा एक मोठा काफिला हज करण्यासाठी मक्का शहरी रवाना झाला. मदीना शहरातील मुस्लिमांनी काबागृहात पैगंबरांची भेट घेतली. यानंतर परत एकदा ७३ पुरुष आणि दोन महिलांच्या एका प्रतिनिधीमंडळाने रात्रीच्या वेळी पैगंबरांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या प्रसंगी मदीनाच्या प्रतिनिधीमंडळाने सत्याचा प्रचार करण्याची आणि सत्यसंदेश देणाऱ्या पैगंबर मुहम्मद (स.) यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञापूर्वक दीक्षा घेतली. रात्री घेण्यात आलेल्या दीक्षा समारंभाची वार्ता कुरैशजनांना मिळाली आणि त्यांचा संताप अनावर झाला. त्यांनी प्रतिनिधीमंडळाचा पाठलाग केला, मात्र ते सापडले नाही. परंतु त्यातील एक व्यक्ती सअद (रजि.) कुरैशजनांच्या हाती लागले. त्यांचे केस धरून व मारपीट करीत त्यांना मक्का शहरी आणण्यात आले.

मक्का शहरात मुस्लिमांवर होणाऱ्या कुरैशजनांच्या अत्याचारांनी परिसीमा गाठली होती. त्यामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना मदीना शहरी जाऊन आश्रय घेण्याचा आदेश दिला आणि सांगितले, एक-एक दोन-दोन करून येथून निघा जेणेकरून कुरैश लोकांना याची भनक लागू नये. बरेच मुस्लिम गुपचुपपणे मदीना शहरी निघून गेले आणि काहीजण विरोधकांच्या हाती लागून कैद करण्यात आले. इस्लामचा त्याग करण्यासाठी त्यांचा विरोधकांनी अमानुषपणे छळ सुरू केला. आता मक्का शहरात या कैद करण्यात आलेल्या मुस्लिमांव्यतिरिक्त केवळ पैगंबर मुहम्मद (स.), अबू बकर (रजि.) आणि माननीय अली (रजि.) एवढेच शिल्लक होते. त्यांच्यावर विरोधक घात लावून बसले होते. तिकडे मदीना शहरात पोचलेल्या मुस्लिमांनी इस्लामचा प्रचार-प्रसार सुरू ठेवला आणि मदीनावासी मोठ्या उत्स्फूर्तपणे इस्लामचा स्वीकार करू लागले.

यामुळे मुस्लिमांचे बळ वाढत गेले. मुस्लिमांचे हे वाढते बळ पाहून कुरैशजनांच्या

पायाखालची वाळू सरकत होती. त्यामुळे त्यांनी 'दारुन्नदवा' या सभागृहात तातडीची बैठक घेतली. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आणि त्यांच्या इस्लाम प्रचाराचा खात्मा करण्याविषयी सल्लामसलत करू लागले. यामध्ये अबू जहलच्या प्रस्तावावर सर्वांनी एकमताने समहती दर्शवून निर्णय घेतला की प्रत्येक कबिल्याची एकेक व्यक्ती मुहम्मद (स.) यांच्यावर हल्ला करून त्यांची हत्या करण्यात येईल. यामुळे मुहम्मद (स.) यांचे परिवारजन सर्व सम्मिलित कबिल्यांशी हत्येचा बदला घेण्यासाठी धजावणार नाहीत.

सर्वसंमतीने हा निर्णय झाल्यावर विरोधकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घराला वेढले आणि त्यांची हत्या करण्यासाठी त्यांच्या बाहेर निघण्याची वाट पाहू लागले. मात्र पैगंबरांना अल्लाहने आधीच या संकटाविषयी सावध केले होते. पैगंबरांनी आपले चुलत बंधू माननीय अली (रजि.) यांना म्हटले,

"हे अली (रजि.)! अल्लाहने मला मक्का त्यागून मदीनेस प्रयाण करण्याचा आदेश दिला आहे. विरोधकांनी आपल्या घरास मला ठार करण्यासाठी चारही बाजुंनी वेढले आहे. मी मदीनेस कूच करीत आहे. तुम्ही माझ्या बिछान्यावर माझी चादर पांघरून झोपा. अल्लाह तुमचे रक्षण करील. सकाळी उठून सर्वांच्या ठेवी परत करा. नंतर तुम्हीदेखील मदीनेस यावे."

कुरैश लोक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जिवावर उठले होते तरी ते लोक पैगंबरांजवळच त्यांच्या ठेवी ठेवत असत. त्या वेळीसुद्धा अनेकांच्या ठेवी त्यांच्याजवळ होत्या. यामुळेच अली (रजि.) यांना त्यांनी आपल्या सोबत घेतले नाही. लोकांच्या ठेवी त्यांना परत करण्यासाठी अली (रजि.) यांना मक्का मुक्कामीच ठेवले.

पैगंबर मुहम्मद (स.) आपले जीवलग मित्र अबू बकर (रजि.) यांना सोबत घेऊन मदीना शहराकडे रवाना झाले. मदीना शहर हे मक्का शहराच्या उत्तरेस आहे. मात्र विरोधकांना चुकविण्यासाठी पैगंबर दिशा बदलून दक्षिणेकडे येमेनच्या मार्गावर 'सौर' नावाच्या गुहेत तीन दिवसांपर्यंत थांबले. शत्रूंनी सर्वत्र पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांचे सहकारी अबू बकर (रजि.) यांचा कसून शोध घेतला, मात्र त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) आणि अबू बकर (रजि.) गुहेतून बाहेर पडले आणि २४ सप्टेंबर ६२२ रोजी मदीनापूर्वी असलेल्या कुबा नावाच्या एका वस्तीत पोचले. या ठिकाणी बरेच मुस्लिम वास्तव्यास होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी याच वस्तीत पहिल्यांदा एका मस्जिदीचा पाया रोवला. इस्लामी इतिहासातील हीच पहिली 'कुबा मस्जिद' होय. येथेच अली (रजि.) हे पैगंबरांना येऊन भेटले. काही दिवस येथे वास्तव्य करून पैगंबर मदीना येथे पोहचले.

पैगंबर मुहम्मद (स.) मदीना पोचताच नागरिकांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

पैगंबर मदीना पोहचल्यावर तिथे एकेश्वरवादी सत्यधर्म जोरात फैलावू लागला. मदीना शहरामध्ये सर्वत्र ''ला इलाहा इल्लल्लाह, मुहम्मदुर्रसूलुल्लाह'' (अर्थात अल्लाहशिवाय कोणीही ईश्वर नाही आणि मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.) चा गजर ऐकू येऊ लागला.

मदीना शहरातील काही दांभिक आणि कपट-कारस्थानी लोकांना हाताशी घेऊन इस्लामी आंदोलन थांबविण्याकरिता ते थेट मदीना शहरावरच हल्ला करण्याची योजना आखू लागले. एकीकडे कुरैशजन कित्येक वर्षांपासून मुस्लिमांवर अत्याचार करून त्यांचा नेहमीसाठी खात्मा करण्यावर उतारू होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा सत्य संदेश स्वीकारून मुस्लिम होणाऱ्यांना विरोधकांच्या जाचास कंटाळून आपली मायभूमी, आपली संपत्ती त्यागावी लागली होती. तरीदेखील मुस्लिमांनी संयम राखला. मात्र एवढे सगळे त्यागूनसुद्धा मदीना शहरातही विरोधक त्यांचा पिच्छा सोडायला तयार नव्हते आणि मग विरोधकांनी एक बलाढ्य सैन्य घेऊन मुस्लिमांवर हल्ला चढविला.

जेव्हा पाणी डोक्यावरून वाहू लागले तेव्हा स्वरक्षणार्थ अल्लाहने विरोधकांशी दोन हात करण्याची परवानगी दिली. अल्लाहचा आदेश अवतरित झाला,

''परवानगी दिली गेली युद्ध करण्याची त्या लोकांना ज्यांच्यावर अत्याचार केले गेले, कारण ते अत्याचारपीडित आहेत. आणि अल्लाह निश्चितपणे त्यांच्या मदतीला समर्थ आहे''

(दिव्य कुरआन, २२:३९)

असत्याकरिता लढणाऱ्या अत्याचाऱ्यांविरूद्ध युद्ध करण्याचा आदेश अल्लाहकडून आला होता. मुस्लिमांना सत्यधर्म (इस्लामचे) रक्षण करण्यासाठी तलवार उचलण्याची परवानगी मिळाली होती. आता 'जिहाद' (असत्य आणि अत्याचाराविरूद्ध संघर्ष म्हणजे धर्मयुद्ध) सुरू झाला होता. इस्लाम विरोधकांनी अनेकदा मुस्लिमांचे शहर मदीनावर हल्ला केला जेणेकरून पैगंबर मुहम्मद (स.) व त्यांच्या अनुयायींना नष्ट करावे. परंतु ते आपल्या कुप्रयत्नात सफल झाले नाहीत. सत्याची स्थापना करण्यासाठी आणि अन्याय, आतंक व अत्याचाराचा समूळ नायनाट करण्यासाठी जिहादमध्ये (धर्मरक्षण व आत्मसंरक्षणासाठी युद्ध) अल्लाहच्या पैगंबरांचा सतत विजय होत गेला. मक्का आणि आसपासचे इस्लामविरोधक पराजित होत गेले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दहा हजार मुस्लिमांचे लष्कर घेऊन मक्का शहरातील असत्य व अत्याचाऱ्यांचा समूळ नायनाट करण्यासाठी कूच केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विजय आणि मुस्लिमांची अपार शक्ती पाहून मक्का शहरातील इस्लामविरोधकांनी नांगी टाकली, पराजय पत्करला आणि कोणत्याही प्रकारे रक्तपात न होता मक्केवर मुस्लिमांना विजय प्राप्त झाला. अशा प्रकारे सत्य आणि शांततेचा विजय आणि असत्य

व आतंकवादाचा पराजय झाला.

तेच मक्का शहर जेथे काल अन्याय व अपमानाची कडू फळे चाखणे भाग पडले होते, तेथे आज पैगंबर मुहम्मद (स.) व मुस्लिमांचे जंगी स्वागत होत होते. औदार्य आणि दयेचे प्रतीक बनलेले अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या सगळ्यांना सार्वजनिक माफी दिली, ज्यांनी त्यांना व मुस्लिमांना निर्दयी व अमानुषपणे छळले होते आणि मातृभूमीला त्यागून देण्यासाठी भाग पाडले होते, तेच आज अल्लाहच्या पैगंबरांसमोर अत्यानंदित होऊन घोषणा करीत होते,

"ला इलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलुल्लाह"

(अल्लाहशिवाय कोणीही ईश्वर नाही आणि मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.)

लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन एका आवाजात प्रतिज्ञा करीत होते,

"अश्हदु अल्ला इलाह इलल्लाह व अश्हदु अन्न मुहम्मदुर्रसूलुल्लाह"

(मी साक्ष देतो की अल्लाहशिवाय कोणीही ईश्वर नाही आणि मी साक्ष देतो की मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र जीवनचरित्र वाचल्यानंतर माझ्या हे पूर्णपणे लक्षात आले की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एकेश्वरत्वाचे हे सत्य प्रस्थापित करण्यासाठी अपार आणि जिवापाड कष्ट घेतले.

मक्का शहरातील इस्लामविरोधक सत्यधर्माच्या मार्गात जबरदस्त अडथळा निर्माण करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) आणि सत्यमार्गावर चालणाऱ्या मुस्लिमांचा सतत १३ वर्षांपर्यंत अमानुष छळ करीत होते, सतत अपमान करीत होते. एवढे अत्याचार सहन करूनदेखील मुहम्मद (स.) यांनी संयम आणि धीर सोडला नाही. एव्हाना सत्यासाठी त्यांना आपली अत्यंत प्रिय मातृभूमीदेखील त्यागावी लागली आणि मदीना शहरी आले. मात्र मक्का शहरातील अनेकेश्वरवादी कुरैश लोकांनी येथेही त्यांचा पिच्छा सोडला नाही. शेवटी सहनशीलतेची मर्यादा संपली आणि मग अगदी शेवटचा पर्याय म्हणून आपले व मुस्लिमांचे तसेच सत्याचे रक्षण करण्यासाठी त्यांना शस्त्र उचलणे भाग पडले. अशा प्रकारे मुहम्मद (स.) आणि मुस्लिमांवर युद्ध थोपविण्यात आले.

अशाच प्रतिकूल परिस्थितीत सत्याचे रक्षण करण्यासाठी जिहाद (आत्मरक्षण व सत्यरक्षणास्तव करावा लागणारा संघर्ष) चा आदेश देणाऱ्या कुरआनातील आयती आणि अन्यायी व अत्याचारी विरोधक व अनेकेश्वरवादींना शिक्षा करणाऱ्या आयती अल्लाहकडून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाल्या.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेल्या लढाया आक्रमण करण्यासाठी मुळीच नसून आक्रमण व आतंकवादापासून रक्षण करण्यासाठी होत्या. कारण अत्याचार करणाऱ्यांशी युद्ध करून त्यांना पराजित केल्याशिवाय शांततेची स्थापना शक्य नसते.

अल्लाहच्या पैगंबरांनी सत्य आणि शांतीकरिता अंतिम सीमेपर्यंत धैर्य व संयम पाळला आणि धैर्याच्या अंतिम सीमेपासूनच युद्धाची सुरूवात होते. अशा प्रकारच्या युद्धालाच 'जिहाद' (धर्मयुद्ध) असे म्हटले जाते.

ही गोष्ट विशेष लक्षणीय आहे की मक्का शहरातील कुरैशजन, ज्यांनी मुस्लिमांवर अमानुष व भयानक अत्याचार केले होते, तेच कुरैशजन मुस्लिमांनी मक्केवर विजय प्राप्त केला तेव्हा जिवाच्या आकांताने थरथर कापत होते की आज काय बेतेल? मात्र पैगंबरांनी त्यांना माफ करून उराशी कवटाळले.

अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांना एखाद्या विशिष्ट देशासाठी किंवा एखाद्या लोकसमूहासाठीच पैगंबर बनवून पाठविले नाही तर संपूर्ण विश्वासाठी आणि संपूर्ण मानवजातीसाठी पैगंबर बनवून पाठविले आहे. कुरआनचा सूरह ७ आयत १५८ मध्ये उल्लेख आहे,

"हे मुहम्मद (स.) सांगा की, "हे मानवांनो, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे, त्याच्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही, तोच जीवन प्रदान करतो व तोच मृत्यू देतो, म्हणून श्रद्धा ठेवा अल्लाहवर आणि त्याने पाठविलेल्या निरक्षर नबी (स.) वर जो अल्लाह व त्याच्या आदेशांना मानतो, आणि अनुसरण करा त्याचे, जेणेकरून तुम्ही सरळमार्ग प्राप्त कराल."

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केल्यावर हेच स्पष्ट होते की इस्लामचा उद्देश केवळ हाच आहे की या जगामध्ये सत्य व शांती प्रस्थापित करावी आणि आतंकवादाचा समूळ नायनाट करावा.

म्हणूनच इस्लामचा संबंध हिंसा आणि आतंकवादाशी जोडणे हे सर्वांत मोठे असत्य होय. जर एखाद्या ठिकाणी अशी घटना घडत असेल तर या घटनेचा संबंध इस्लाम किंवा संपूर्ण मुस्लिम समुदायाशी जोडणे मुळीच योग्य ठरणार नाही.

इस्लाम आणि आतंकवाद

आता इस्लामची सविस्तर माहिती मिळविण्यासाठी इस्लामचा मूळ ग्रंथ कुरआनकडे वळू या. इस्लाम आतंक आहे की आदर्श, हे जाणून घेण्यासाठी मी कुरआनच्या काही आयतींचा अनुवाद या ठिकाणी सादर करीत आहे. या ठिकाणी ही गोष्ट विसरता कामा नये की कुरआनचा अनुवाद करतेवेळेस कोणत्याही आयतीचा भावार्थ किंचितही बदलता कामा नये. (नोट- या ठिकाणी लेखक महोदयांनी कुरआनातील आयतींचा हिंदी अनुवाद सादर केला होता. हा अनुवाद मौलाना फ़तेह मुहम्मद जालंधरी द्वारा करण्यात आलेला असून 'महमूद अॅण्ड कंपनी, मरोळ पाइपलाइन, मुंबई-५९' येथून प्रकाशित झालेला आहे. मात्र हे पुस्तक मराठी भाषेत अनुवादित होत असल्याने वाचकांच्या सोयीसाठी येथे मराठी अनुवाद सादर करीत आहोत. कारण कोणत्याही परिस्थितीत अनुवादात परिवर्तन येऊ नये, याची पूर्ण खबरदारी बाळगली जाते. म्हणून विविध भाषांमध्ये अनुवादित कुरआनाचा भावार्थ एकच असतो.)

कुरआनची सुरूवात 'बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम' या आयतीने होते. या आयतीचा अर्थ आहे, "मी सुरूवात करतो असीम कृपावंत आणि परम दयावंत अल्लाहच्या नावाने." येथे लक्षणीय बाब अशी की अल्लाह, जो अत्यंत कृपाळू आणि दयाळू आहे, तो इतरांना त्रास देण्याचा अथवा हिंसा व आतंक माजविण्याचा आदेश कसे काय देणार? अल्लाहच्या या कृपा व दयेचा प्रभाव अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या व्यावहारिक जीवनात स्पष्टपणे दिसतो. कुरआनातील आयती आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्रावरून ही गोष्ट स्पष्ट होते की केवळ आक्रमणकारी आणि अत्याचारी विरोधकांशीच मुस्लिमांनी लढावे, असा आदेश देण्यात आला आहे. अर्थातच हे युद्ध आत्मरक्षणार्थ होते. कारण कुरआनात आलेले अल्लाहचे आदेश खालीलप्रमाणे आहेत...

"आणि तो प्रसंगदेखील आठवण्याजोगा आहे जेव्हा सत्य नाकारणारे तुझ्याविरूद्ध युक्त्या योजित होते की एक तर तुला कैद करावे अथवा ठार मारावे किंवा देशांतर करावे. ते आपल्या चाली खेळत होते आणि अल्लाह आपली चाल खेळत होता. निःसंशय अल्लाह सर्वोत्तम चाल खेळणारा आहे." (दिव्य कुरआन,८:३०)

"परवानगी दिली गेली युद्ध करण्याची त्या लोकांना ज्यांच्यावर अत्याचार केले गेले, कारण ते अत्याचारपीडित आहेत. आणि अल्लाह निश्चितपणे त्यांच्या मदतीला समर्थ आहे. हे ते लोक आहेत जे आपल्या घरांतून नाहक बाहेर काढले गेले, केवळ या अपराधापायी की ते म्हणत होते, "आमचा पालनकर्ता अल्लाह आहे." जर अल्लाह लोकांना एक दुसऱ्याकरवी हटवीत नसता तर मठ, आणि चर्च व 'सिनेगॉग' आणि मस्जिदी ज्यांत अल्लाहचे नाव मोठ्या प्रमाणात घेतले जाते, सर्व उद्ध्वस्त केली गेली असती. अल्लाह जरूर त्या लोकांना साहाय्य करील जे त्याला साहाय्य करतील."

(दिव्य कुरआन, २२:३९-४०)

"काय हे म्हणतात की पैगंबराने हा ग्रंथ स्वत: रचला आहे? सांगा, "असे असेल तर यासारख्या रचलेल्या दहा सूरती तुम्ही रचून आणा आणि अल्लाहव्यतिरिक्त जे जे (तुमचे उपास्य) आहेत त्यांना साहाय्यासाठी बोलवू शकत असाल तर बोलवून घ्या."

(दिव्य कुरआन, ११:१३)

"हे पैगंबर (स.)! या जगात अश्रद्धावानांच्या धावपळीमुळे तुमची दिशाभूल होता कामा नये." (दिव्य कुरआन, ३:१९६)

"परवानगी दिली गेली युद्ध करण्याची त्या लोकांना ज्यांच्यावर अत्याचार केले गेले, कारण ते अत्याचारपीडित आहेत." (दिव्य कुरआन, २२:३९)

"आणि त्यांच्याशी युद्ध करा जिथे कुठे तुमचा त्यांच्याशी सामना होईल आणि त्यांना त्या ठिकाणाहून हाकलून लावा जिथून त्यांनी तुम्हाला हाकलले होते"

(दिव्य कुरआन, २:१९१)

"जे लोक अल्लाह आणि त्याचे पैगंबर यांच्याशी युद्ध करतात आणि भूमीवर याकरिता धावपळ करतात की हिंसाचार माजवावा, त्यांची शिक्षा ही आहे की ते ठार मारले जातील अथवा सुळावर चढविले जातील अथवा परस्परविरूद्ध दिशेने त्यांचे हात-पाय कापले जातील, अथवा त्यांना देशांतर करावयास लावले जाईल. हा अपमान व नामुष्की तर त्यांच्यासाठी दुनियेत आहे आणि मरणोत्तर जीवनामध्ये त्यांच्याकरिता याहून मोठी शिक्षा आहे. परंतु जे लोक पश्चात्ताप करतील यापूर्वी की तुम्ही त्यांच्यावर प्रभुत्व प्रस्थापित करावे - तुम्हाला माहीत असावयास हवे की अल्लाह माफ करणारा व दया करणारा आहे." (दिव्य कुरआन, ५:३३,३४)

इस्लामसंबंधी हा चुकीचा व विनाकारणचा प्रसार-प्रचार करण्यात येतो की कुरआनातील अल्लाहच्या आदेशांमुळेच (शिकवणींमुळेच) मुस्लिम लोक बिगरमुस्लिमांचे जगणे अशक्य करतात. मात्र वस्तुस्थिती अगदी उलट आहे. इस्लाममध्ये कोणत्याही ठिकाणी निर्दोष लोकांना तिळमात्र त्रास देण्याची परवानगी नाही, मग ते मुस्लिमेतर असोत, मूर्तिपूजक असोत की शत्रू असोत. विशेषत: कुरआनमध्ये अल्लाहचे आदेश असे आहेत,

"अल्लाह तुम्हाला या गोष्टीची मनाई करीत नाही की तुम्ही त्या लोकांशी सद्व्यवहार आणि न्यायाचे वर्तन करावे, ज्यांनी धर्माच्या बाबतीत तुमच्याशी युद्ध केले नाही आणि तुम्हाला तुमच्या घरातून बाहेर काढले नाही. अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो." (दिव्य कुरआन, ६०:८)

"तो तुम्हाला ज्या गोष्टीची मनाई करतो ती तर ही आहे की तुम्ही त्या लोकांशी मैत्री करावी ज्यांनी तुमच्याशी धर्माच्या बाबतीत युद्ध केले आहे आणि तुम्हाला तुमच्या घरातून बाहेर काढले आहे आणि तुम्हाला बाहेर घालविण्यात एक दुसऱ्यास मदत केली

आहे. त्यांच्याशी जे लोक मैत्री करतील तेच अत्याचारी आहेत.''

(दिव्य कुरआन, ६०:९)

इस्लाममध्ये शत्रूवर अत्याचार करण्याचीसुद्धा मनाई आहे. कुरआनात म्हटले आहे,

''आणि तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या लोकांशी लढा जे तुमच्याशी लढतात परंतु अतिरेक करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे आवडत नाहीत.''

(दिव्य कुरआन, २:१९०)

''हे अल्लाहचे आदेश आहेत जे आम्ही तुम्हाला ठीकठीक ऐकवीत आहोत कारण अल्लाह जगवासियांवर अत्याचार करण्याचा कोणताही हेतू बाळगत नाही.''

(दिव्य कुरआन, ३:१०८)

जगामध्ये शांतता स्थापन करणे हे इस्लामचे प्रथम उद्दिष्ट आहे. युद्ध हा अगदी शेवटचा पर्याय आहे. मुळात हाच तर आदर्श धर्म आहे, जो निम्नोल्लेखित आयतींवरून स्पष्ट होतो.

''हे पैगंबर (स.)! या इन्कार करणाऱ्यांना सांगा की जर आतादेखील परावृत्त झाले तर पूर्वी जे काही घडलेले आहे ते माफ केले जाईल, परंतु जर हे त्याच पूर्वीच्या चालीची पुनरावृत्ती करतील तर पूर्वीच्या लोकांशी जे काही घडले आहे ते सर्वांना माहीत आहे.''

(दिव्य कुरआन, ८:३८)

इस्लाम धर्माने शत्रुंशीदेखील न्याय करण्याचा आदेश दिला आहे आणि हीच बाब न्यायाचा सर्वोच्च आदेश प्रस्तुत करते. यासंबंधी आणखीन एक आयत प्रस्तुत करीत आहे,

''हे श्रद्धावंतांनो! अल्लाहसाठी सत्यावर अढळ राहणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना. एखाद्या गटाच्या शत्रुत्वाने तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख व्हाल. न्याय करा, हे ईशपरायणतेशी अधिक निकटवर्ती आहे. अल्लाहचे भय बाळगून कार्य करीत राहा.''

(दिव्य कुरआन, ५:८)

इस्लाम धर्माने कोणत्याही निर्दोष व्यक्तीची हत्या करण्याची परवानगी दिली नाही. असे करणाऱ्याला एकच शिक्षा आहे, अर्थात खुनाचा बदला खून! खुन्याला मिळणारी देहदंडाची शिक्षा देताना कोणत्याही प्रकारचा अतिरेक होऊ देता कामा नये. हेच न्यायाचे खरे स्वरूप होय. यासंबंधी कुरआनातील अल्लाहचा मूळ आदेश अशा शब्दांत आहे,

''कोणाचीही हत्या करू नका जिला अल्लाहने निषिद्ध ठरविले आहे, परंतु सत्यानिशी आणि जी व्यक्ती अन्यायाने ठार केली गेली असेल तिच्या वारसास आम्ही किसास (बदला) च्या मागणीचा हक्क दिला आहे. म्हणून त्याने हत्या करण्यात मर्यादा

ओलांडू नये त्याला मदत दिली जाईल.'' (दिव्य कुरआन, १७:३३)

इस्लाम धर्माने देशात किंवा समाजात कोणत्याही प्रकारची हिंसा माजविण्याची मुळीच परवानगी दिली नाही, हे खाली दिलेल्या आयतीमधून स्पष्ट होते.

''आणि लोकांना त्यांच्या वस्तू कमी देऊ नका. पृथ्वीतलावर उपद्रव पसरवीत फिरू नका.'' (दिव्य कुरआन, २६:१८३)

उपद्रवी, अत्याचारी लोकांना अल्लाहने स्पष्ट शब्दांत कडक ताकीद करताना कुरआनात म्हटले आहे,

''जे लोक अल्लाहचे आदेश व त्याच्या सूचना मान्य करण्यास नकार देतात आणि त्याच्या पैगंबरांना हकनाक ठार करतात आणि अशा लोकांच्या जीवावर उठतात जे मानवमात्रापैकी न्यायनीती व रास्तपणाचा आदेश देण्याकरिता पुढे येतात, त्यांना दुःखदायक शिक्षेची शुभवार्ता ऐकवा.'' (दिव्य कुरआन, ३:२१)

कुरआनात अल्लाहने सत्य स्थापण्यासाठी कष्ट सहन करणाऱ्यांना, युद्ध करणाऱ्यांना आणि धर्मयुद्धात वीरमरण पत्करणाऱ्यांना आपल्या विशेष कृपेची खुशखबरी दिली ती अशा शब्दांत,

''उत्तरादाखल त्यांच्या पालनकर्त्याने फर्माविले, ''मी तुमच्यापैकी कोणाचेही कृत्य वाया घालविणार नाही मग तो पुरुष असो अथवा स्त्री, तुम्ही सर्वजण परस्परांत सहजाती आहात, म्हणून ज्या लोकांनी माझ्यासाठी स्वदेश त्याग केला आणि ज्यांना माझ्या मार्गात आपल्या घरातून बाहेर काढण्यात आले आणि जे छळले गेले आणि माझ्यासाठी लढले व मारले गेले - त्यांचे सर्व अपराध मी माफ करून टाकीन व त्यांना अशा उपवनांत दाखल करीन ज्यांच्या खालून कालवे वाहात असतील. हा त्यांचा मोबदला आहे अल्लाहजवळ आणि सर्वोत्तम मोबदला अल्लाहजवळच आहे.'' (दिव्य कुरआन, ३:१९५)

इस्लाम धर्माची हेतूपुरस्सर बदनामी करण्यात आली, यासाठी लेखी स्वरूपात नियोजनबद्धरीत्या प्रचार करण्यात आला की हा धर्म तलवारीच्या जोरावर प्रसारित धर्म आहे. मक्कासहित समस्त अरब आणि अरबेतर जगतातील अधिकांश लोकांना तलवारीच्या जोरावरच इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडण्यात आले. अशा प्रकारे जोरजबरदस्तीने आणि बलप्रयोग करून लोकांना मुस्लिम करण्यात आले, असा प्रचार करण्यात आला. मात्र इस्लाम धर्मात कोणावरही बळजबरी करून मुस्लिम बनविण्याची सक्त मनाई आहे. इस्लाम स्वीकारण्याची कोणावरही सक्ती केली नाही. कुरआनात अल्लाहने स्पष्टपणे आदेश दिला आहे,

''जर तुझ्या पालनकर्त्याची इच्छा अशी असती (की पृथ्वीतलावर सर्व ईमानधारक व आज्ञाधारकच असावेत) तर सर्व भूतलवासीयांनी श्रद्धा ठेवली असती. मग तू लोकांना भाग पाडशील का की ते ईमानधारक बनतील?'' (दिव्य कुरआन, १०:९९)

"सांगा की, हे इन्कार करणाऱ्यांनो! मी त्यांची उपासना करीत नाही ज्यांची उपासना तुम्ही करता. आणि न तुम्ही त्याची उपासना करणारे आहात ज्याची उपासना मी करतो. आणि न मी त्यांची उपासना करणारा आहे ज्यांची उपासना तुम्ही केली आहे. आणि न तुम्ही त्याची उपासना करणारे आहात ज्याची उपासना मी करतो. तुमच्यासाठी तुमचा धर्म आहे आणि माझ्यासाठी माझा धर्म." (दिव्य कुरआन, १०९:१-६)

"आता हे पैगंबर (स.)! हे लोक जर तुमच्याशी भांडण करतील तर त्यांना सांगा, 'मी आणि माझ्या अनुयायांनी तर अल्लाहसमोर मान तुकविली आहे.' मग ग्रंथधारक व बिगर ग्रंथधारी दोघांना विचारा, 'काय तुम्हीही त्याची आज्ञाधारकता व दास्यत्व स्वीकारले?' जर त्यांनी स्वीकारले तर त्यांना सरळमार्ग प्राप्त झाला. जर त्यापासून पराङ्मुख झाले तर तुमच्यावर फक्त संदेश पोहचविण्याची जबाबदारी होती. पुढे तर अल्लाह स्वतःच आपल्या सर्व दासांचे व्यवहार पाहणारा आहे." (दिव्य कुरआन, ३:२०)

"(हे पैगंबर (स.)!) सांगा, "हे ग्रंथधारकानो! या, एका अशा बाबीकडे जी आमच्या आणि तुमच्या दरम्यान समान आहे, हे की आपण अल्लाहशिवाय कोणाचीही भक्ती करू नये, त्याच्याबरोबर कोणासही भागीदार ठरवू नये, आणि आपल्यापैकी कोणीही अल्लाहशिवाय इतर कोणास आपला पालनकर्ता बनवू नये." या आवाहनाला स्वीकारण्यापासून ते जर पराङ्मुख झाले तर स्पष्ट सांगून टाका की साक्षी राहा आम्ही तर मुस्लिम (केवळ अल्लाहची भक्ती करणारे व त्याचे आज्ञापालन करणारे) आहोत."

(दिव्य कुरआन, ३:६४)

इस्लामने बळजबरी धर्मपरिवर्तनाची मनाई तर केलीच शिवाय धर्माच्या बाबतीतच नव्हे तर इतर कोणत्याही बाबतीत बळजबरी करण्याची परवानगी दिली नाही. कुरआनमध्ये अल्लाहचा आदेश अशा शब्दांत आलेला आहे,

"धर्माच्या बाबतीत कोणतीही जोरजबरदस्ती नाही." (दिव्य कुरआन, २:२५६)

जो कोणी दुष्कृत्ये करील व असत्यनीती स्वीकारील, मृत्यूपश्चात जीवनात त्याचे फळ तो भोगील.

"जो कोणी वाईट (कर्मे) कमवील आणि अपराधाच्या दुष्चक्रांत अडकून पडेल तो नरकवासी असेल आणि नरकामध्येच सदैव खितपत पडेल."

(दिव्य कुरआन, २:८१)

कुरआनातील अल्लाहचे आदेश किंवा शिकवणींवरून आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्रावरून केवळ आणि केवळ हेच सिद्ध होते की, 'इस्लाममध्ये कोणत्याही ठिकाणी आतंकवादाचा गंधसुद्धा नाही.' यावरून लक्षात येते की अपूर्ण माहिती आणि अज्ञानामुळेच काहीजण इस्लामचा संबंध आतंकवादाशी जोडतात.

कुरआनातील त्या चोवीस आयती

काहीजण कुरआनातील त्या चोवीस आयतींच्या मथळ्याची जाहिरातपत्रके कित्येक वर्षांपासून जवळपास सर्वच प्रमुख क्षेत्रीय भाषांमध्ये छापून देशातील जनतेमध्ये वाटप करीत आहेत. 'कुरआनातील काही आयती, ज्या मुस्लिमांना अन्य धर्मियांशी लढण्याचा आदेश देतात', असे पत्रकाचे शीर्षक आहे. हे पत्रक वाचून मीसुद्धा भ्रमित झालो आणि याचा उल्लेख मी याच पुस्तकाच्या सुरूवातीस 'आणि मला सत्यज्ञान प्राप्त झाले'मध्ये केला आहे. आता मी हे पत्रक जशास तसे वाचकांसमोर सादर करीत आहे.

-: जाहिरात पत्रक :-

कुरआनातील काही आयती

ज्या मुस्लिमांना अन्य धर्मियांशी लढण्याचा आदेश देतात

१) "मग जेव्हा निषिद्ध महिने लोटतील तेव्हा त्या अनेकेश्वरवादींना ठार करा, जेथे सापडतील तेथे त्यांची नाकेबंदी करा व प्रत्येक पातळीवर त्यांचा समाचार घेण्यासाठी सज्ज राहा. मग जर त्यांनी पश्चात्ताप केला व नमाज कायम केली आणि जकात दिली तर त्यांना सोडून द्या. अल्लाह क्षमाशील आणि दया दाखविणारा आहे." (९:५)

२) "हे श्रद्धावंतानो! अनेकेश्वरवादी अपवित्र आहेत." (९:२८)

३) "निश्चितच काफिर तुमचे उघड शत्रू आहेत." (४:१०१)

४) "हे श्रद्धावंतानो (मुस्लिमांनो)! त्या काफिरांशी युद्ध करा, जे तुमच्या अवतीभवती आहेत आणि तुमच्यामध्ये त्यांनी कठोरता अनुभवावयास हवी." (९:१२३)

५) "ज्या लोकांनी आमची संकेतवचने मानण्यास नकार दिला आहे त्यांना खचितच आम्ही अग्नीत झोकून देऊ आणि जेव्हा त्यांच्या शरीराची त्वचा गळून पडेल तेव्हा त्या जागी दुसरी त्वचा निर्माण करू जेणेकरून ते प्रकोपाचा खूपच आस्वाद घेतील. अल्लाह खूप समर्थ आहे." (४:५६)

६) "हे श्रद्धावंतांनो! आपले वडील व आपले बंधु यांनादेखील आपले मित्र बनवू नका, जर ते श्रद्धेवर अश्रद्धेला प्राधान्य देत असतील. तुम्हापैकी जे त्यांना आपले स्नेही बनवतील तेच अत्याचारी ठरतील." (९:२३)

७) "अल्लाह काफिरांना मार्ग दाखवीत नाही." (९:३७)

८) "हे श्रद्धाधारकांनो!... आणि काफिरांना आपला मित्र बनवू नका. अल्लाहचे भय

बाळगा, जर तुम्ही श्रद्धाधारक आहात.'' (५:५७)

९) ''धिक्कारलेले (बिगरमुस्लिम) ज्या ठिकाणी सापडतील, पकडले जातील आणि ठार केले जातील.'' (३३:६१)

१०) ''नि:संदेह तुम्ही आणि तुमचे ते उपास्य ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून उपासना करता नरकाचे इंधन होत, तेथेच तुम्हाला जावयाचे आहे.'' (२१:९८)

११) ''आणि त्याच्यापेक्षा मोठा अत्याचारी कोण असेल ज्याला त्याच्या पालनकर्त्याच्या संकेताने उपदेश केला जाईल आणि मग तो त्याच्यापासून पराङ्मुख होईल, अशा अपराधींचा तर आम्ही सूड घेतल्याशिवाय राहणार नाही.'' (३२:२२)

१२) ''अल्लाह तुम्हाला पुष्कळ गनीमतच्या मालाचे वचन देतो, जो तुम्ही प्राप्त कराल.'' (४८:२०)

१३) ''जो काही गनीमत (युद्धात सापडलेला) चा माल तुम्ही हस्तगत केला आहे, तो वैध आणि पवित्र समजून खा.'' (८:६९)

१४) ''हे नबी (स.), अश्रद्धावंतांशी व दांभिकांशी संघर्ष (जिहाद) करा आणि त्यांच्याशी कठोर व्यवहार करा. त्यांचे ठिकाण नरक आहे आणि ते फार वाईट ठिकाण आहे.'' (६६:९)

१५) ''या सत्य नाकारणाऱ्यांना आम्ही कठोर शिक्षेचा आस्वाद देणारच आणि ज्या अत्यंत वाईट कारवाया हे करीत राहिले आहेत, त्यांचा पुरेपूर बदला यांना देऊ, तो नरक आहे जो अल्लाहच्या शत्रूंना बदल्यात मिळेल. त्यातच सदासर्वदा त्यांचे वास्तव्य राहील.'' (४१:२७-२८)

१६) ''हा बदला आहे अल्लाहच्या शत्रूंचा, म्हणजे (नरकाची) आग. यातच त्यांचे सदाचे वास्तव्य आहे, हे यासाठी की ते आमच्या आयती नाकारित होते.'' (४१:२८)

१७) ''वस्तुस्थिती अशी आहे की अल्लाहने श्रद्धावंतांकडून स्वत: त्यांना व त्यांच्या मालमत्तेला स्वर्गाच्या मोबदल्यात खरीदिले आहे. ते अल्लाहच्या मार्गात लढतात आणि मारतात व मरतात.'' (९:१११)

१८) ''या दांभिक पुरुष, स्त्रिया व अश्रद्धावंतांकरिता अल्लाहने नरकाग्नीचे वचन दिले आहे, ज्यात ते सदैव राहतील.'' (९:६८)

१९) ''हे नबी (स.)! श्रद्धावंतांना युद्धाचे प्रोत्साहन द्या. जर तुमच्यापैकी वीस जण संयमी असतील तर ते दोनशे जणांवर मात करतील. आणि जर शंभर माणसे अशी

असतील तर ते सत्य नाकारणाऱ्यांपैकी हजार माणसांना भारी ठरतील; कारण ते असले लोक आहेत ज्यांना जाण नाही.'' (८:६५)

२०) ''हे श्रद्धावंतांनो, दांभिक, यहुदी व (पाखंडी) ख्रिस्तींना आपले जीवलग बनवू नका, हे आपापसांतच एक दुसऱ्याचे मित्र आहेत आणि जर तुमच्यापैकी कोणी त्यांना आपला मित्र बनवीत असेल तर त्याचीदेखील गणना त्यांच्यातच होईल, नि:संशय अल्लाह अत्याचाऱ्यांना आपल्या मार्गदर्शनापासून वंचित करतो.'' (५:५१)

२१) ''युद्ध करा ग्रंथधारकांपैकी त्या लोकांविरूद्ध जे अल्लाहवर व मरणोत्तर जीवनावर श्रद्धा ठेवत नाहीत, आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराने जे काही निषिद्ध ठरविले आहे त्याला निषिद्ध करीत नाहीत, आणि सत्य धर्माला आपला धर्म बनवीत नाहीत. (त्यांच्याशी युद्ध करा) इथपावेतो की त्यांनी स्वहस्ते जिझिया द्यावा.'' (८:२९)

२२) ''सरतेशेवटी आम्ही त्यांच्या दरम्यान पुनरुत्थानाच्या दिवशापर्यंत शत्रुत्व आणि परस्पर द्वेष व द्रोहाचे बीज पेरले. आणि अवश्य एक वेळ अशी येईल ज्या वेळेस अल्लाह त्यांना दाखवील की ते जगात काय करीत होते.'' (५:१४)

२३) ''ते तर हे इच्छितात की ज्याप्रमाणे ते स्वत: अश्रद्धावंत आहेत त्याचप्रमाणे तुम्हीही अश्रद्धावंत बनावे, म्हणजे तुम्ही व ते सर्वजण एकसारखेच व्हावे. म्हणून त्यांच्यापैकी कोणालाही आपला मित्र बनवू नका जोपर्यंत ते अल्लाहच्या मार्गात देशांतर करून येत नाहीत, आणि जर ते स्थलांतरापासून पराङ्मुख राहतील तर जेथे आढळतील तेथे त्यांना पकडा व ठार करा आणि त्यांच्यापैकी कोणासही आपला मित्र व साहाय्यक बनवू नका.'' (४:८९)

२४) ''त्यांच्याशी (अश्रद्धावंतांशी) युद्ध करा! अल्लाह तुमच्या हाताने त्यांना यातना देईल आणि त्यांना अपमानित करील आणि त्यांच्या मुकाबल्यात तुमची मदत करील आणि श्रद्धावंतांना (मुस्लिमांना) समाधान प्रदान करील.'' (९:१४)

उपरोक्त आयतींवरून हे स्पष्ट होते की ईर्ष्या, द्वेष, घृणा, कपट, कलह, लढाई, लूटमार आणि हत्या करण्याचे आदेश आहेत. हेच कारण आहे की देशात व जगामध्ये मुस्लिम आणि मुस्लिमेतरांदरम्यान दंगली आणि रक्तपात होत असतात.

दिल्ली सरकारने १९८५ साली सर्वश्री इंद्रसेन शर्मा आणि राजकुमार आर्य यांच्याविरुद्ध दिल्ली येथील 'मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट'च्या न्यायालयात हे पत्रक प्रकाशित करण्याचा आरोप ठेवून खटला चालविण्यात आला. न्यायालयाने ३१ जुलै १९८६ रोजी दोघा महानुभावांना निर्दोष असल्याचा निर्णय देताना म्हटले,

"कुरआनच्या पवित्र ग्रंथाप्रति आदर राखताना उपरोक्त आयतींच्या सूक्ष्म अध्ययनातून हे स्पष्ट होते की या आयती अत्यंत हानिकारक असून घृणा व तिरस्काराची शिकवण देतात, ज्यामुळे मुस्लिम आणि देशातील इतर वर्गांमध्ये भेदभावाची भावना वाढीस लागण्याची संभावना निर्माण होते."

('हिंदू रायटर्स फोरम, नवी दिल्ली-२७'द्वारा पुनर्मुद्रित व प्रकाशित.)

वरील जाहिरात पत्रकाचे सर्वप्रथम पोस्टर छापण्यात आले होते आणि हे पोस्टर श्री इंद्रसेन शर्मा (तत्कालीन उपप्रधान, हिंदू महासभा, दिल्ली) व राजकुमार आर्य यांनी छापले होते. मुहम्मद फारुक़ खान यांनी हिंदी भाषेत अनुवाद केलेल्या या 'मक्तबा अलहसनात, रामपूर' येथून १९६६ मध्ये प्रकाशित कुरआनाच्या हिंदी अनुवादातून या पोस्टरमध्ये आयती घेण्यात आल्या होत्या. हे पोस्टर छापल्यामुळे त्यांच्यावर भारतीय दंडविधानाच्या कलम १५३ ए आणि १६५ ए नुसार (एफ.आय.आर. २३७/८३/ यू/एस, २३५ ए, १ पी.सी. हौज काजी, पोलीस स्टेशन, दिल्ली) खटला सुरू असताना उपरोक्त निवाडा देण्यात आला.

आता आपण पाहू या की या जाहिरात पत्रकातील कुरआनच्या आयती खरोखरच विभिन्न समाजांमध्ये तिरस्कार आणि वैरभाव निर्माण करणाऱ्या आहेत काय?

पत्रकातील पहिल्या क्रमांकाची आयत :

"मग जेव्हा निषिद्ध महिने लोटतील तेव्हा त्या अनेकेश्वरवादींना ठार करा, जेथे सापडतील तेथे त्यांची नाकेबंदी करा व प्रत्येक पातळीवर त्यांचा समाचार घेण्यासाठी सज्ज राहा. जर त्यांनी पश्चात्ताप केला व नमाज कायम केली आणि जकात दिली तर त्यांना सोडून द्या. अल्लाह क्षमाशील आणि दया दाखविणारा आहे."

(दिव्य कुरआन-९:५)

या आयतीची पार्श्वभूमी अशी-

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्रावरून ही बाब स्पष्ट होते की मक्का शहरात आणि मक्केहून मदीना शहरी आल्यावरदेखील मक्केतील मूर्तिपूजक असलेले कुरैशजन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मागे हात धुवून लागले होते. त्यांना छळत होते व त्यांचा पिच्छा सोडायला मुळीच तयार नव्हते. पैगंबर मुहम्मद (स.) आणि सत्यधर्म इस्लामचा नायनाट करण्यासाठी शक्य होईल तेवढे प्रयत्न करीत होते. मुहम्मद (स.) यांच्याशी आणि मुस्लिमांशी युद्ध करण्याचे सदैव कटकारस्थान रचत होते.

अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) मक्केहून मदीना स्थलांतराच्या सहाव्या वर्षी अरबी वर्षाच्या जिल्कद महिन्यात शेकडो अनुयायांबरोबर (मुस्लिमांबरोबर) हज करण्यासाठी

मदीनेहून मक्केस रवाना झाले. मात्र दांभिक आणि कपटचाऱ्यांनी याची माहिती कुरैशांना दिली. कुरैश पैगंबर मुहम्मद (स.) यांना छळण्याची कोणतीही संधी हातातून जाऊ देत नसत. या वेळीसुद्धा ते घात लावून रस्त्यात बसले. त्यांच्या या खोडीची माहिती पैगंबर मुहम्मद (स.) यांना मिळाली. त्यामुळे त्यांनी मदीनापासून मक्केकडे जाणारा नेहमीचा रस्ता बदलून मक्केजवळ हुदैबियाच्या विहिरीवर तळ ठोकला. याच विहिरीच्या नावावर या स्थळाचे नाव हुदैबिया असे होते. कुरैशांना या गोष्टीचीदेखील खबर मिळाली आणि त्यांनी काही लोकांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हत्येची सुपारी देऊन हुदैबियास पाठविले. मात्र हल्ला करण्यापूर्वीच मुस्लिमांनी त्यांना अटक करून पैगंबरांसमोर हजर केले. मात्र पैगंबरांनी त्यांना त्यांच्या चुकीची जाणीव करून देऊन माफी दिली. यानंतर लढाई, हिंसा व रक्तपात होऊ नये यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माननीय उस्मान (रजि.) यांना कुरैशांशी चर्चा करण्यासाठी पाठविले. मात्र कुरैशांनी तिकडे उस्मान (रजि.) यांना कैद करून टाकले. इकडे हुदैबियावर पाडाव करून असलेले पैगंबर मुहम्मद (स.) यांना अशी वार्ता मिळाली की उस्मान (रजि.) यांना कुरैशांनी ठार केले. ही वार्ता येऊन धडकताच मुस्लिम उस्मान (रजि.) यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी तयारी करू लागले.

मात्र जेव्हा कुरैशांना खबर मिळाली की आता मुस्लिम खवळले आहेत आणि युद्ध अटळ आहे. म्हणून त्यांनी सुहैल बिन अम्र यांना मध्यस्थी करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे पाठविले. सुहैल यांनी सांगितले की माननीय उस्मान (रजि.) यांना ठार करण्यात आलेले नसून कैद करण्यात आले आहे. यानंतर सुहैल बिन अम्र यांनी उस्मान (रजि.) यांना कैदेतून सोडण्यासाठी व युद्ध टाळण्यासाठी काही अटी ठेवल्या त्या खालीलप्रमाणे होत.

पहिली अट - या वर्षी पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्यासोबत असलेले सर्व मुस्लिमांनी हज न करताच परत जावे आणि पुढच्या वर्षी यावे. मात्र तीन दिवसांनंतर निघून जावे.

दुसरी अट - आमच्या (मक्केतील कुरैशां) पैकी कोणी एखादा माणूस मुस्लिम होऊन मदीनेस तुमच्या (मुस्लिमांच्या) आश्रयास आला तर त्यास तुम्ही आमच्या स्वाधीन करावे, मात्र तुमचा एखादा मुस्लिम मदीना सोडून मक्केस आला तर आम्ही त्यास तुमच्या स्वाधीन करणार नाही.

तिसरी अट - कोणताही कबिला आपल्या मर्जीनुसार कुरैशांसोबत अथवा मुस्लिमांसोबत सामील होऊ शकतो.

चौथी अट - या अटी मान्य केल्यावर कुरैश आणि मुस्लिम एकमेकांवर हल्ला करणार नाहीत, तसेच एकमेकांच्या सहयोगी कबिल्यावरदेखील हल्ला करणार नाहीत. हा

समझोता दहा वर्षांच्या कालावधीसाठी झाला. अर्थातच कुरैश आणि मुस्लिमांदरम्यान झालेल्या या तहास 'हुदैबियाचा तह' असे म्हणतात.

या चारही अटी आणि शर्ती केवळ एकतर्फी व अन्यायपूर्ण होत्या तरी शांती व संयमाचे दूत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या स्वीकारल्या.

मात्र हा तह होऊन दोनच वर्षे लोटली आणि या समझोत्यास कुरैशांचा सहयोगी असलेल्या बनू बकर कबिल्याकडूनच तडा गेला. बनू बकर कबिल्याने मुस्लिमांच्या सहयोगी असलेल्या खुज़ाआ कबिल्यावर हल्ला केला. या हल्ल्यात कुरैशांनी बनू बकरचीच साथ दिली.

खुजाआ कबिल्याचे लोक जीव मुठीत धरून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दरबारी हजर होऊन या एकतर्फी हल्ल्याची खबर दिली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एवढे नमते घेऊन निमूटपणे कुरैशांच्या अटी व शर्ती मान्य केल्या आणि शांतता अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र कुरैशांनीच हा तह मोडला, समझोता मोडून दगा केला.

परिस्थिती टोकाची असल्यामुळे दगा करणाऱ्यांना दंडित करण्यासाठी तसेच भंग झालेली शांतता पुन्हा स्थापन करण्यासाठी एका युद्धाची निश्चितच गरज होती. ही गरज पाहता अल्लाहतर्फे सूरह क्र. ९ च्या आयती अवतरित झाल्या.

अल्लाहकडून अवतरित झालेल्या या आयती (अर्थात अल्लाहचा आदेश) सूचित करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माननीय अली (रजि.) यांना अनेकेश्वरवादींकडे पाठविले. अली (रजि.) यांनी अनेकेश्वरवादींना स्पष्ट सांगितले की मुस्लिमांकरिता अल्लाहचा आदेश आला आहे आणि सूरह क्र. ९ च्या आयती त्यांच्यासमोर पठण केल्या,

"मुक्तीची (करार समाप्त करण्याची) घोषणा आहे, अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) कडून त्या अनेकेश्वरवादी लोकांसाठी ज्यांच्याशी तुम्ही करार केले होते. तर तुम्ही देशात आणखी चार महिने संचार करून घ्या आणि जाणून असा की तुम्ही अल्लाहला असफल करणारे नाहीत आणि अल्लाह सत्याचा इन्कार करणाऱ्यांना अपमानित करणारा आहे. आम सूचना आहे, अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) कडून हजे अकबर च्या दिवशी, तमाम लोकांच्यासाठी, की अल्लाह अनेकेश्वरवादी लोकांकडून जबाबदारीपासून मुक्त आहे आणि त्याचा पैगंबरसुद्धा. आताही जर तुम्ही पश्चात्ताप केला तर ते तुमच्यासाठीच उत्तम आहे आणि जर तोंड फिरवीत आहात तर चांगले लक्षात ठेवा की तुम्ही अल्लाहला असफल करणारे नाहीत. आणि हे पैगंबर (स.)! सत्याचा इन्कार करणाऱ्यांना कठोर यातनेची खूशखबरी ऐकवा त्या अनेकेश्वरवादींखेरीज ज्यांच्याशी तुम्ही करार केले."

(दिव्य कुरआन, ९:१-३)

माननीय अली (रजि.) यांनी अनेकेश्वरवादींना स्पष्ट सांगितले की हा अल्लाहचा आदेश आहे. आपल्या दरम्यान झालेला युद्धबंदीचा करार तुम्हीच मोडला. म्हणून युद्ध अवैध असलेले हे चार महिने संपताच आम्ही तुम्हाला धडा शिकविण्यासाठी युद्ध करू.

युद्धबंदीचा करार मोडून हल्ला करणाऱ्या पक्षाला चोख प्रत्युत्तर देण्याचा मुस्लिमांना पूर्ण अधिकार होता. शिवाय हे युद्ध मक्का शहरातील त्या मूर्तिपूजकांविरूद्ध होते, ज्यांनी मुस्लिमांवर सदैव अत्याचार केले, त्यांचा अमानुष छळ केला. म्हणूनच सर्वोच्च न्यायकर्ता अल्लाहने ५ क्रमांकाच्या आयतीचा आदेश दिला.

या पाचव्या क्रमांकाच्या आयतीपूर्वीची अर्थात चौथ्या क्रमांकाची आयत अशी आहे-

"आणि त्यांनी तुमच्याशी आपला करार पाळण्यांत कोणतीही कसूर केली नाही व तुमच्याविरूद्ध कुणाला मदतही केली नाही, तेव्हा अशा लोकांशी तुम्हीदेखील कराराची मुदत पूर्ण होईपर्यंत प्रामाणिक राहा; कारण अल्लाह ईशपरायण लोकांनाच पसंत करतो." (दिव्य कुरआन, ९:४)

यावरून स्पष्ट होते की मुस्लिमांतर्फे करण्यात आलेली युद्धाची घोषणा निर्दोष व शांतताप्रिय अनेकेश्वरवादींविरूद्ध नसून, त्या अनेकेश्वरवादींविरूद्ध होती ज्यांनी युद्ध करण्यासाठी फूस दिली. यासाठी आवश्यक असलेली परिस्थिती जाणूनबुजून निर्माण केली व युद्धबंदीचा करार मोडला. म्हणून हे युद्ध आत्मरक्षण आणि धर्मरक्षणासाठीच होते, असेच म्हणणे योग्य ठरेल.

अन्यायी व अत्याचाऱ्यांकडून बळजबरीने थोपण्यात आलेल्या युद्धापासून स्वत:चा बचाव करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला कोणत्याही प्रकारे कलह अगर उपद्रव म्हणता येत नाही.

अन्याय व अत्याचाऱ्यांपासून आपले आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी युद्ध करणे आणि आपल्या सैनिकांना उत्साहित करणे हे धर्मसंमत आहे. अशा स्वरूपाचे पोस्टर किंवा पत्रक प्रकाशित करणाऱ्यांना हेसुद्धा माहिती नसेल की अत्याचारी व अन्यायी लोकांचा विनाश करण्यासाठी योगेश्वर श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेचा उपदेश दिला होता. मग या उपदेशास आपण कलह आणि उपद्रव निर्माण करणारा म्हणू शकतो काय? तर मुळीच नाही. मग कुरआनविषयी असे कसे म्हणता येईल?

हा पूर्ण सूरह त्या काळात मक्का शहरातील अत्याचारी अनेकेश्वरवादींविरूद्ध अवतिरत झाला असून हे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे भाऊबंध कुरैशच होते. मग अशी परिस्थिती असताना अल्लाहचा हा आदेश आजच्या संदर्भात आणि हिंदूविषयी का लागू

करण्यात येत आहे? हे हिंदू व अन्य मुस्लिमेतरांना भडकविण्यासाठी आणि त्यांच्या मनात मुस्लिमांविषयी इस्लामला बदनाम करण्याचे घृणित कटकारस्थान नव्हे काय?

पत्रकातील दुसऱ्या क्रमांकाची आयत :

"हे श्रद्धावंतांनो! अनेकेश्वरवादी अपवित्र आहेत." (दिव्य कुरआन, ९:२८)

सतत लढाई, कलह, उपद्रव माजविणारे, हिंसा पेटविणारे, अन्याय, अत्याचार करणारे अपवित्र नाहीत तर आणखीन काय आहेत?

पत्रकातील तिसऱ्या क्रमांकाची आयत :

"निश्चितच अश्रद्धावंत तुमचे उघड शत्रू आहेत." (दिव्य कुरआन, ४:१०१)

खरेतर या ठिकाणी जाणूनबुजून कुरआनच्या आयतचा एक अंश देऊन लोकांची दिशाभूल करण्यात येत आहे. कुरआनची पूर्ण आयत जरा लक्ष देऊन वाचावी, ती अशा प्रकारे आहे-

"आणि जेव्हा तुम्ही प्रवासाला निघाल तर याच्यात काही हरकत नाही की तुम्ही नमाजला संक्षिप्त करावे. (विशेषत:) जेव्हा तुम्हाला भीती वाटेल की अश्रद्धावंत तुम्हाला सतावतील कारण ते उघडउघड तुमच्या शत्रुत्वावर आहेत." (दिव्य कुरआन, ४:१०१)

कुरआनची ही पूर्ण आयत वाचल्यावर हे स्पष्ट होते की मक्का आणि आसपासचे इस्लामवैरी लोक मुस्लिमांना सदैव नुकसान व इजा पोचवू इच्छित होते. (पाहा पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र) अशा प्रकारच्या शत्रू असलेल्यांपासून सावध राहण्याचा आदेश देण्यास्तव ही आयत क्र. १०१ अवतरित करण्यात आली व म्हटले गेले,

"निश्चितच अश्रद्धावंत तुमचे उघड शत्रू आहेत."

यापुढील १०२ क्रमांकाच्या आयतीवरून ही बाब आणखीन जास्त स्पष्ट होते, जिच्याद्वारे अल्लाहने आणखीन जास्त सावध राहण्याचा आदेश दिला आहे,

"आणि हे नबी (स.)! जेव्हा तुम्ही मुस्लिमांच्या दरम्यान असाल आणि (युद्धाच्या स्थितीत) त्यांना नमाज पठण करविण्यासाठी उभे असाल तर हे आवश्यक आहे की त्यांच्यातील एक गट तुमच्याबरोबर उभा राहावा आणि आपले हत्यार घेऊन असावा, नंतर त्याने जेव्हा सजदा केला असेल तेव्हा त्याने पाठीमागे जावे आणि दुसरा गट ज्याने अद्याप नमाज अदा केली नाही, त्याने येऊन तुमच्यासह नमाज अदा करावी आणि त्यानेसुद्धा जागरूक राहावे व सशस्त्र असावे, कारण अश्रद्धावंत यासाठी टपून आहेत की तुम्ही आपले हत्यार आणि आपले सामानाविषयी थोडेदेखील गाफिल झालात तर ते एकदम तुमच्यावर तुटून पडतील." (दिव्य कुरआन, ४:१०२)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र आणि वर लिहिण्यात आलेल्या तथ्यावरून हे स्पष्ट होते की आत्मसंरक्षण आणि धर्मरक्षण करण्यासाठी मुस्लिमांना असे करणे आवश्यक होते. त्यामुळे या आयतीमध्ये कलह, द्वेष, लढाई, घृणा किंवा कपट व यासारखी कोणतीही बाब नाही, जसे पत्रकामध्ये दर्शविण्यात आले आहे. अर्थातच या पत्रकामध्ये जाणूनबुजून व हेतूपुरस्सर या आयतीचा केवळ एक अर्धवट भाग सादर करून उरलेला भाग लपवून जनतेमध्ये मुस्लिमांविरूद्ध घृणा, द्वेष व संताप आणि कलह निर्माण करण्याचे पातक संपूर्ण देशातील जनतेत करीत आहेत. म्हणून हे पत्रक छापून व पूर्ण देशात प्रसारित करण्याचे काम करीत आहेत अशा लोकांपासून जनतेने सावध राहावे.

पत्रकातील चौथ्या क्रमांकाची आयत :

"हे श्रद्धावंतानो (मुस्लिमांनो)! त्या अश्रद्धावंतांशी युद्ध करा, जे तुमच्या अवतीभवती आहेत आणि तुमच्यामध्ये त्यांनी कठोरता अनुभवावयास हवी."

(दिव्य कुरआन, ९:१२३)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र आणि वर सादर करण्यात आलेल्या तथ्यांवरून हेच स्पष्ट होते की मुस्लिमांना अनेकेश्वरवादींशी स्वत:चे व धर्माचे रक्षण करण्याकरिता असे करणे नितांत गरजेचे होते. म्हणून आत्मरक्षण करणाऱ्या त्या आयतीला कलह निर्माण करणारी म्हटले जाऊ शकत नाही.

पत्रकातील पाचव्या क्रमांकाची आयत :

"ज्या लोकांनी आमची संकेतवचने मानण्यास नकार दिला आहे त्यांना खचितच आम्ही अग्नीत झोकून देऊ आणि जेव्हा त्यांच्या शरीराची त्वचा गळून पडेल तेव्हा त्या जागी दुसरी त्वचा निर्माण करू जेणेकरून ते प्रकोपाचा खूपच आस्वाद घेतील. अल्लाह खूप समर्थ आहे." (दिव्य कुरआन, ५:५६)

हा तर धर्मविरूद्ध जाणाऱ्याला पापाची शिक्षा देण्याकरिता नरकाग्नीमध्ये झोकून देण्याचा दंड होय. सगळ्याच धर्मांमध्ये त्या धर्माच्या नियमांनुसार आचरण करण्यावर स्वर्गप्राप्तीचे अकल्पनीय सुख आणि नियमांविरूद्ध आचरण केल्यास भयानक दंड आहे. मग कुरआनमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या नरकाग्नीच्याच बाबतीत तक्रार असण्याचे कारण काय? याबाबतीत पत्रक प्रसारित करणाऱ्यांना नाक खुपसण्याचा अधिकार कोणी दिला अथवा या लोकांना नरकामधील लोकांच्या मानवाधिकारांची चिंता भेडसावत आहे?

पत्रकातील सहाव्या क्रमांकाची आयत :

"हे श्रद्धावंतांनो! आपले वडील व आपले बंधु यांनादेखील आपले मित्र बनवू नका, जर ते श्रद्धेवर अश्रद्धेला प्राधान्य देत असतील. तुम्हापैकी जे त्यांना आपले स्नेही बनवतील तेच अत्याचारी ठरतील." (दिव्य कुरआन, ९:२३)

पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा एकेश्वरत्वाचा संदेश देत होते आणि या संदेशाचा स्वीकार करून जेव्हा एखादी व्यक्ती मुस्लिम होऊन आपले माता-पिता व भाऊ-बहिणींकडे जात असे तेव्हा हेच माता-पिता व भाऊ-बहीण एकेश्वरत्वावरील त्याचा विश्वास नष्ट करून पुन्हा त्याला अनेकेश्वरवादी बनवीत असत. म्हणूनच एकेश्वरत्वाच्या रक्षणासाठी अल्लाहने ही आयत अवतरित केली, जेणेकरून एकेश्वरत्वाचे सत्य दडपले जाता कामा नये. मग सत्यरक्षणासाठी अवतरित झालेल्या या आयतीवर कलह आणि घृणा निर्माण करणारी आयत कसे म्हटले जाऊ शकते? जे असे म्हणतात, ते अज्ञानी आहेत.

पत्रकातील सातव्या क्रमांकाची आयत :

"ईश्वर अधर्मी लोकांना मार्ग दाखवीत नाही." (दिव्य कुरआन, ९:३७)

या आयतीचा पूर्ण अर्थ बदलण्यासाठी जाणूनबुजून या आयतीला पूर्ण देण्यात आले नाही. म्हणूनच आयतीचा खरा उद्देश लक्षात येत नाही. ही आयत समजण्यासाठी आम्ही पूर्ण आयत सादर करीत आहोत.

"एखाद्या वर्षी एखाद्या महिन्याला वैध ठरवितात व एखाद्या वर्षी त्याला अवैध करून टाकतात, जेणेकरून अल्लाहने निषिद्ध ठरविलेल्या महिन्यांची संख्याही पूर्ण करता यावी व अल्लाहने ज्याला निषिद्ध केलेले आहे त्याला वैधसुद्धा करून घेता यावे. त्यांची अपकृत्यें त्यांच्यासाठी शोभिवंत करण्यात आलेली आहेत, व अल्लाह सत्याचा इन्कार करणाऱ्यांना मार्गदर्शन करीत नसतो." (दिव्य कुरआन, ९:३७)

शांतीचे चार महिने आहेत ते - जिलकद, जिलहज्ज, मुहर्रम व रज्जब आहेत. या चार महिन्यात भांडणतंटा केला जात नाही. अधर्मी कुरैश या महिन्यांपैकी एखाद्या महिन्याला आपल्या आवश्यकतेनुसार हेतूपुरस्सर मागे-पुढे करून भांडणतंटा करण्यासाठी मान्यतेचे उल्लंघन करीत होते. चुकून भटकलेल्यास मार्ग दाखविला जाऊ शकतो, परंतु हेतूपुरस्सर भटकलेल्या मनुष्यास ईश्वरसुद्धा मार्ग दाखवित नाही. याविषयी ही आयत अवतरित झाली. या आयतचा भांडण, लढाई करणे किंवा घृणा पसरविण्याचा काहीएक संबंध नाही.

पत्रकातील आठव्या क्रमांकाची आयत :

"हे श्रद्धाधारकांनो!... अश्रद्धावंतांना आपला मित्र बनवू नका. अल्लाहचे भय बाळगा, जर तुम्ही श्रद्धाधारक आहात." (दिव्य कुरआन, ५:५७)

ही आयतदेखील अर्धवटच सादर केली आहे. आयतीचा मधील भाग हेतूपुरस्सर लपविण्याचा खोडसाळपणा केला आहे. पूर्ण आयत खालीलप्रमाणे,

"हे श्रद्धावंतांनो! तुमच्या पूर्वीच्या ग्रंथधारकांपैकी ज्या लोकांनी तुमच्या धर्माला थट्टा व मनोरंजनाचे साधन बनविले आहे, त्यांना व इतर अश्रद्धावंतांना आपले मित्र व सोबती बनवू नका. अल्लाहचे भय बाळगा जर तुम्ही श्रद्धावंत असाल."

(दिव्य कुरआन, ५:५७)

संपूर्ण आयत वाचल्यावर हेच स्पष्ट होते की, अधर्मी कुरैश आणि त्यांचे सहकारी ज्यू आणि ख्रिस्ती, जे मुस्लिमांच्या धर्माची खिल्ली उडवित होते, त्यांच्याशी मैत्री न ठेवण्याकरिता ही आयत अवतरित करण्यात आली आहे. मग ही लढाई, भांडणासाठी प्रेरित करणारी व घृणा द्वेष पसरविणारी कशी? याउलट वाचकवृंदाने स्वत: विचार करावा की पत्रकामध्ये आयतीचा "ज्यांनी तुमच्या धर्माची खिल्ली उडवून अपमानित केले आहे." हा भाग हेतूपुरस्सर लपवून तिचा अर्थच बदलण्याच्या कुटिल डावामागे त्यांचा कोणता हेतू आहे?

पत्रकातील नवव्या क्रमांकाची आयत :

"धिक्कारलेले (बिगरमुस्लिम) ज्या ठिकाणी सापडतील, पकडले जातील आणि ठार केले जातील." (दिव्य कुरआन, ३३:६१)

सूरह क्रमांक ३३ मधील ही ६१ व्या क्रमांकाची आयत आहे. या आयतीचा वास्तविक अर्थ जाणून घेण्याकरिता याआधीची क्र. ६० ची आयत जोडून वाचणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्ही या ठिकाणी ६० आणि ६१ या दोन्ही आयती सादर करीत आहोत.

"जर दांभिक आणि ते लोक ज्यांच्या हृदयांत रोग आहे आणि ते जे मदीनेत प्रक्षोभक अफवा पसरविणारे आहेत, आपल्या कारवायांपासून परावृत्त झाले नाही तर आम्ही त्यांच्याविरूद्ध कारवाई करण्यासाठी तुम्हाला उभे करू, मग ते या शहरांत तुमच्यासमवेत मुष्किलीनेच राहू शकतील. त्यांच्यावर चोहोंकडून धिक्काराचा मारा होईल, जेथे कोठे ते सापडतील पकडले जातील आणि भयंकररीत्या ठार मारले जातील."

(दिव्य कुरआन, ३३:६०-६१)

त्या काळी मदीना शहर जेथे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वास्तव्य होते, तेथे

कुरैशांच्या हल्ल्याची नेहमीच संभावना होती. या युद्धसदृश परिस्थितीमध्ये काही दांभिक व कपटी) लोक तसेच ज्यू आणि ख्रिस्ती, जे मुस्लिमांच्याही जवळ राहत असत आणि मुस्लिमांचे कट्टर वैरी असलेल्या कुरैशांनासुद्धा भेटत असत आणि अफवा पसरवून शांतता भंग करण्याचा प्रयत्न करीत. युद्धसदृश परिस्थितीत अफवा पसरविणारे हेर किती भयानक असतात हे सर्वांनाच माहिती आहे. आजदेखील अशा स्वरूपाचा गुन्हा मृत्यूदंडासारख्या कडक शिक्षेस पात्र आहे. कारण याशिवाय शांतता स्थापन होणे शक्य नाही आणि हेच न्यायसंमत होय. अशा न्यायसंगत आयतीस उपद्रव निर्माण करणारी आयत असल्याचा प्रचार करणे मोठे दुर्दैव होय.

पत्रकातील दहाव्या क्रमांकाची आयत :

"नि:संदेह तुम्ही आणि तुमचे ते उपास्य ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून उपासना करता नरकाचे इंधन होत, तेथेच तुम्हाला जावयाचे आहे." (दिव्य कुरआन, २१:९८)

मूलत: इस्लाम हा एकेश्वरवादी धर्म असल्याने अल्लाहव्यतिरिक्त इतर कोणाचीही पूजा करणे या धर्मात अक्षम्य अपराध आहे. या आयतीमध्ये याच पापाची मरणोत्तर शिक्षा नरकाग्नी आहे, हे सांगितले आहे. पत्रकामधील पाचव्या क्रमांकाच्या आयतीविषयी लिहिताना आम्ही यासंदर्भात आपली भूमिका मांडलीच आहे. त्यामुळे ही आयतदेखील मानवांमध्ये कलह आणि तिरस्कार निर्माण करणारी आयत असल्याचा प्रचार करणे न्यायसंगत ठरणार नाही!

पत्रकातील अकराव्या क्रमांकाची आयत :

"आणि त्याच्यापेक्षा मोठा अत्याचारी कोण असेल ज्याला त्याच्या पालनकर्त्याच्या संकेताने उपदेश केला जाईल आणि मग तो त्याच्यापासून पराङ्मुख होईल, अशा अपराधींचा तर आम्ही सूड घेतल्याशिवाय राहणार नाही." (दिव्य कुरआन, ३२:२२)

या आयतीमध्येसुद्धा मागील आयतीप्रमाणेच स्पष्ट सांगितले की, अल्लाह त्या लोकांना नरकाग्नीची शिक्षा देईल, जे अल्लाहच्या आयतींचा अगर शिकवणींचा इन्कार करतात. अर्थातच ही बाब परलोक जीवनाशी संबंधित आहे. तेव्हा निश्चितच हिचा संबंध या इहलोकी जीवनात कलह निर्माण करणे असल्याची बतावणी करणे आणि द्वेष निर्माण करणे हा एक घृणास्पद कुटिल डाव आहे.

पत्रकातील बाराव्या क्रमांकाची आयत :

"अल्लाह तुम्हाला पुष्कळ गनीमतच्या मालाचे (युद्धसंपत्तीचे) वचन देतो, जो तुम्ही प्राप्त कराल." (दिव्य कुरआन, ४८:२०)

सर्वप्रथम वाचकांसमोर मी ही बाब स्पष्ट करू इच्छितो की 'गनीमत' या शब्दाचा वास्तविक अर्थ 'लुटीचा माल' असा नसून 'शत्रूची प्राप्त केलेली संपत्ती' असा आहे. त्या काळी मुस्लिमांचे अस्तित्वच नष्ट करण्यासाठी त्यांच्यावर जोरदार हल्ले होत असत वा हल्ले करण्याची तयारी करण्यात येत असे. इस्लामचे कट्टर विरोधक असलेले कुरैशजन आणि त्यांचे सहयोगी ज्यू व ख्रिस्ती आर्थिकरित्या खूप सबळ होते. अशा शक्तिशाली शत्रूंशी बचाव करण्याकरिता अल्लाहकडून हे वचन आहे. तसे पाहता ही युद्धाच्या नियमांनुसार वैध बाब होय. आजही पराभूत शत्रूंची संपत्ती विजेत्या पक्षाच्याच मालकीची असते. म्हणून ही आयतदेखील कलह निर्माण करणारी म्हणणे दुर्भाग्यपूर्ण होय.

पत्रकातील तेराव्या क्रमांकाची आयत :

"जो काही गनीमत (युद्धात सापडलेला) चा माल तुम्ही हस्तगत केला आहे, तो वैध आणि पवित्र समजून खा." (दिव्य कुरआन, ८:६९)

बाराव्या क्रमांकाच्या आयतीमध्ये देण्यात आलेल्या तर्कानुसार या आयतीचा संबंधदेखील आत्मरक्षण आणि धर्मरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या युद्धातून प्राप्त होणाऱ्या चलसंपत्तीशी असून युद्धात धैर्य निर्माण करण्यासाठी आहे. त्यामुळे या आयतीचा संबंधदेखील कलह निर्माण करण्याशी जोडणे मोठी दुर्भाग्यपूर्ण बाब होय.

पत्रकातील चौदाव्या क्रमांकाची आयत :

"हे नबी (स.), अश्रद्धावंतांशी व दांभिकांशी संघर्ष (जिहाद) करा आणि त्यांच्याशी कठोर व्यवहार करा. त्यांचे ठिकाण नरक आहे आणि ते फार वाईट ठिकाण आहे." (दिव्य कुरआन, ६६:९)

वर उल्लेख केल्याप्रमाणे इस्लामविरोधक कुरैश अन्यायी, अत्याचारी होते. त्याचप्रमाणे कपटी व दांभिक मुस्लिमांशी स्नेही व सहयोगी बनून मुस्लिमांमध्ये राहात आणि त्यांचीच हेरगिरी करीत आणि पूर्ण खबर कुरैशांना देत, पैगंबर मुहम्मद (स.) यांची खिल्ली उडवित व मुस्लिमांविरूद्ध कूटनीतीत साथ देत असत. अशा अधर्मियांविरूद्ध युद्ध करून अधर्माचा नायनाट करणे हेच धर्माची स्थापना करणे होय. अशाच अत्याचारी कौरवांसंबंधी श्रीकृष्णाने म्हटले होते,

"अथ चेत त्वमिमं धर्म्य संग्राम न करिष्यसि।
ततः स्वधर्म कीर्ति च हित्व पापमवाप्स्यसि।।" (अध्याय-२, श्लोक-३३)

अर्थात- हे अर्जुना! जर तू हे धर्मयुद्ध करणार नाही तर आपला धर्म आणि कीर्ती हरवून बसणार आणि पापाला प्राप्त करशील."

त्याचप्रमाणे,

"तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्च राज्यं समृद्धं।"

(अध्याय-११, श्लोक-३३)

अर्थात- म्हणून तू उठ! शत्रूंवर विजय प्राप्त कर, यश प्राप्त कर, धनधान्याने संपन्न राज्य भोग.

इस्लाम आणि मुस्लिमांविरुद्ध लोकांच्या मनात द्वेष निर्माण करणाऱ्यांनी अर्थात पत्रक प्रकाशित करणाऱ्यांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे की 'श्रीमद् भागवतगीता'मधील हा आदेश कलह अगर झगडा निर्माण करणारा आहे काय? आणि 'नाही' असे तुमचे उत्तर असेल तर अशा परिस्थितीत 'जिहाद' (आत्मरक्षण व धर्मरक्षण करण्यासाठी तसेच शांतता स्थापनेसाठी करावे लागणारे युद्ध किंवा संघर्ष) करण्याचा आदेश देणाऱ्या आयतीस कलह व उपद्रव निर्माण करणारी आयत आहे, असे का बरे म्हटले जावे. ही अन्यायपूर्ण नीती नाही काय? याचा शेवटी उद्देश काय आहे?

पत्रकातील पंधराव्या क्रमांकाची आयत :

"या सत्य नाकारणाऱ्यांना आम्ही कठोर शिक्षेचा आस्वाद देणारच आणि ज्या अत्यंत वाईट कारवाया हे करीत राहिले आहेत, त्यांचा पुरेपूर मोबदला यांना देऊ."

(दिव्य कुरआन, ४१:२७)

सत्य नाकारणाऱ्यांना (काफिरांना) दंडित करण्यासंबंधी उल्लेख आहे, मात्र हा दंड अगर शिक्षा का मिळेल, याचे कारण या आयतीच्या पूर्वीच्या आयतीमध्ये देण्यात आलेले आहे (याची ही पूरक आयत आहे) त्यास येथे लपविले गेले. आता या दोन्ही आयतींना एकत्रितरित्या देत आहोत. वाचकांनी मग स्वत:च विचार करावा की इस्लामला व मुस्लिमांना बदनाम करण्याचा कट कसा रचला गेला?

"हे सत्याचा इन्कार करणारे म्हणतात, 'या कुरआनला कदापि ऐकू नका आणि जेव्हा हा ऐकविला जाईल तेव्हा त्यात व्यत्यय आणा, कदाचित अशा प्रकारे तुम्ही वर्चस्व मिळवाल.' या नाकारणाऱ्यांना आम्ही कठोर शिक्षेचा आस्वाद देणारच आणि ज्या अत्यंत वाईट कारवाया हे करीत राहिले आहेत, त्यांचा पुरेपूर बदला यांना देऊ."

(दिव्य कुरआन, ४१:२६-२७)

आता जर कोणी आपल्या धार्मिक ग्रंथाचे पठण करीत असेल अथवा नमाज अदा करीत असेल, तर अशा वेळी मुद्दाम त्रास देण्याकरिता हलकल्लोळ माजविणे हे दुष्कृत्य नव्हे काय? मग या दुष्कर्माची शिक्षा देण्याचा अल्लाहचा आदेश असेल तर यात उपद्रवपूर्ण बाब कोणती आहे? मला हेच समजत नाही की पापांची शिक्षा देण्याचा

उल्लेख असलेल्या आयतीस झगडा आणि कलह निर्माण करणारी आयत असल्याचे का दाखविण्यात येते?

पत्रकातील सोळाव्या क्रमांकाची आयत :

"हा बदला आहे अल्लाहच्या शत्रूंचा, म्हणजे (नरकाची) आग. यातच त्यांचे सदाचे वास्तव्य आहे, हे यासाठी की ते आमच्या आयती नाकारित होते."

(दिव्य कुरआन, ४१:२८)

ही आयत पंधराव्या क्रमांकाच्या आयतीची पूरक आयत असून यात सत्य नाकारणाऱ्यांना मरणोत्तर जीवनात शिक्षा देण्याचा उल्लेख आहे. या आयतीचा संबंधदेखील या इहलोकात कलह व क्लेश निर्माण करण्याशी मुळीच नाही.

पत्रकातील सतराव्या क्रमांकाची आयत :

"वस्तुस्थिती अशी आहे की अल्लाहने श्रद्धावंतांकडून स्वत: त्यांना व त्यांच्या मालमत्तेला स्वर्गाच्या मोबदल्यात खरेदिले आहे. ते अल्लाहच्या मार्गात लढतात आणि मारतात व मरतात." (दिव्य कुरआन, ९:१११)

गीतेमध्ये आहे,

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्ग जित्व वा भोक्ष्यसे महीम्।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय:॥" (गीता : अध्याय-२, श्लोक-३७)

अर्थात- तुला (युद्धात) वीरमरण आल्यास स्वर्गप्राप्ती होईल किंवा (युद्ध) जिंकून तुला पृथ्वीचे राज्य प्राप्त होईल. म्हणून हे अर्जुना! (तू) युद्धाकरिता निश्चय करून उभा हो!

निश्चितच गीतेतील हा आदेश क्लेश-कलह, झगडा आणि हिंसा माजविण्याचा आदेश नाही, अधर्माच्या आगीत तेल ओतणाराही नाही. कारण अन्यायी, अत्याचारी व उपद्रवींचा विनाश करून धर्माची स्थापना करण्याच्या युद्धासाठी आहे. अशाच विषम परिस्थितीमध्ये अन्यायी, अत्याचारी आणि उपद्रवी अनेकेश्वरवादी सत्यविरोधकांना संपविण्यासाठी अल्लाहने (ईश्वराने) आदेशसुद्धा सत्यधर्म स्थापण्यासाठी आणि आत्मरक्षणासाठी दिला. मग याच आयतीला कलह निर्माण करणारी का म्हटले आहे? असे म्हणणारा ही अन्यायपूर्ण नीती बाळगत नाही काय? जनतेने अशा लोकांपासून सावध राहावयास हवे.

पत्रकातील अठराव्या क्रमांकाची आयत :

"या दांभिक पुरुष, स्त्रिया व अश्रद्धावंतांकरिता अल्लाहने नरकाग्नीचे वचन दिले

आहे, ज्यात ते सदैव राहतील.'' (दिव्य कुरआन, ९:६८)

सूरह क्र. ९ च्या ही ६८ वी आयत वाचण्यापूर्वी ६७ क्रमांकाची आयतदेखील अवश्य वाचावी. ही आयत अशी-

''दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया सर्व एकमेकाशी सारखेच आहेत. दुष्कर्माचा आदेश देतात आणि सत्कर्मापासून परावृत्त करतात आणि आपले हात सत्कर्मापासून रोखतात, हे अल्लाहला विसरले म्हणून अल्लाहदेखील यांना विसरला. निश्चितपणे हे दांभिकच अवज्ञाकारी आहेत.'' (दिव्य कुरआन, ९:६७)

यावरून स्पष्ट होते की मुनाफिक (कपटी व दांभिक) पुरुष व स्त्रिया चांगल्या कामांपासून रोखतात आणि दुष्कर्मांची प्रेरणा देतात. चांगल्या कामाकरिता एक पैसाही खर्च करीत नसत. ईश्वराचे (अल्लाहचे) स्मरणही कधी करीत नसत. त्याची अवज्ञा करीत आणि नेहमी दुष्कर्म करीत. अशा पापींना मरणोत्तर जीवनात शिक्षा देण्याची चेतावणी देणारी अल्लाहची ही आयत असत्यावर सत्याचा विजय करण्यासाठीच अवतरित झालेली असून याशी कलह आणि क्लेशशी लेशमात्र संबंध नाही.

पत्रकातील एकोणीसाव्या क्रमांकाची आयत :

''हे नबी (स.)! श्रद्धावंतांना युद्धाचे प्रोत्साहन द्या. जर तुमच्यापैकी वीस जण संयमी असतील तर ते दोनशे जणांवर मात करतील. आणि जर शंभर माणसे अशी असतील तर ते सत्य नाकारणाऱ्यांपैकी हजार माणसांना भारी ठरतील; कारण ते असले लोक आहेत ज्यांना जाण नाही.'' (दिव्य कुरआन, ८:६५)

मक्का शहरातील अत्याचारी कुरैश आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दरम्यान होणाऱ्या युद्धांत प्रतिस्पर्धी कुरैशांच्या तुलनेत सत्यरक्षक मुस्लिमांची संख्या खूपच कमी होती. अशा परिस्थितीत मुस्लिमांचे धैर्य वाढविण्यासाठी आणि युद्धात तग धरून शत्रूचा मुकाबला करण्यासाठी अल्लाहकडून ही आयत अवतरित झाली. हे युद्ध अत्याचारी आक्रमणकारी सत्य नाकारणाऱ्या कुरैशांशी होते, सर्व काफिरांसाठी अर्थात सत्यविरोधकांशी मुळीच नव्हते. म्हणून ही आयत अन्य धर्मियांशी युद्ध करण्याची शिकवण देणारी मुळीच नाही. पुराव्यासाठी कुरआनची आणखीन एक आयत आम्ही वाचकांसाठी सादर करीत आहोत.

''अल्लाह तुम्हाला या गोष्टीची मनाई करीत नाही की तुम्ही त्या लोकांशी सद्व्यवहार आणि न्यायाचे वर्तन करावे, ज्यांनी धर्माच्या बाबतीत तुमच्याशी युद्ध केले नाही आणि तुम्हाला तुमच्या घरातून बाहेर काढले नाही. अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो.'' (दिव्य कुरआन, ६०:८)

पत्रकातील विसाव्या क्रमांकाची आयत :

"हे श्रद्धावंतांनो, दांभिक यहुदी व (पाखंडी) ख्रिस्तींना आपले जीवलग बनवू नका, हे आपापसांतच एक दुसऱ्याचे मित्र आहेत आणि जर तुमच्यापैकी कोणी त्यांना आपला मित्र बनवीत असेल तर त्याचीदेखील गणना त्यांच्यातच होईल, नि:संशय अल्लाह अत्याचाऱ्यांना आपल्या मार्गदर्शनापासून वंचित करतो."

(दिव्य कुरआन, ५:५१)

ज्यू आणि ख्रिस्ती त्या वेळी मुस्लिमांशी मैत्रीचे केवळ नाटक करीत आणि मागे मात्र कुरैशांची मदत करीत आणि म्हणत, मुहम्मद (स.) यांच्याशी लढा. मुस्लिमांशी लढण्याकरिता आम्ही तुमच्याबरोबर आहोत. त्यांना फूस लावीत असत. त्यांच्या याच कूटनीतीला अपयशी करण्यासाठी मुस्लिमांना सावध करणे आवश्यक होते. म्हणूनच ऐनवेळी सावध करण्यासाठी ही आयत अवतरित करण्यात आली. पुराव्यादाखल कुरआनची आणखीन एक आयत सादर करण्यात येत आहे,

"तो तुम्हाला ज्या गोष्टीची मनाई करतो ती तर ही आहे की तुम्ही त्या लोकांशी मैत्री करावी ज्यांनी तुमच्याशी धर्माच्या बाबतीत युद्ध केले आहे आणि तुम्हाला तुमच्या घरातून बाहेर काढले आहे आणि तुम्हाला बाहेर घालविण्यात एक दुसऱ्यास मदत केली आहे. त्यांच्याशी जे लोक मैत्री करतील तेच अत्याचारी आहेत."

(दिव्य कुरआन, ६०:९)

पत्रकातील एकविसाव्या क्रमांकाची आयत :

"युद्ध करा ग्रंथधारकांपैकी त्या लोकांविरूद्ध जे अल्लाहवर व मरणोत्तर जीवनावर श्रद्धा ठेवत नाहीत, आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराने जे काही निषिद्ध ठरविले आहे त्याला निषिद्ध करीत नाहीत, आणि सत्य धर्माला आपला धर्म बनवीत नाहीत. (त्यांच्याशी युद्ध करा) इथपावेतो की त्यांनी स्वहस्ते जिझिया द्यावा." (दिव्य कुरआन, ९:२९)

इस्लामनुसार तौरात आणि जबुर (Old Testament) अर्थात बायबलचा 'जुना करार' आणि इंजिल (New Testament) अर्थात बायबलचा 'नवीन करार' हेसुद्धा कुरआनप्रमाणेच ईशग्रंथ आहेत. म्हणूनच या ग्रंथांवर ईमान धारण करणारे 'अहले किताब' म्हणजेच ग्रंथधारक असे म्हटले गेले. या आयतीमध्ये 'ग्रंथधारक' हा शब्द ज्यू आणि ख्रिस्तींसाठीच आहे. ईशग्रंथ रहस्यमय असतात. म्हणून ही आयत वाचल्यावर सुरूवातीस साहजिकच असे वाटते की या आयतीत ज्यू आणि ख्रिस्तींना बळजबरी मुस्लिम बनविण्याची शिकवण आहे. मात्र खरे तर असे मुळीच नाही. कारण इस्लाममध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी करण्याची सक्तीने मनाई करण्यात आली आहे. पुराव्यादाखल

कुरआनच्या दोन आयती आम्ही सादर करीत आहोत.

"जर तुझ्या पालनकर्त्याची इच्छा अशी असती (की पृथ्वीतलावर सर्व ईमानधारक व आज्ञाधारकच असावेत) तर सर्व भूतलवासीयांनी श्रद्धा ठेवली असती. मग तू लोकांना भाग पाडशील का की ते ईमानधारक बनतील?" (दिव्य कुरआन, १०:९९)

तसेच कुरआनात आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"आता हे पैगंबर (स.)! हे लोक जर तुमच्याशी भांडण करतील तर त्यांना सांगा, "मी आणि माझ्या अनुयायांनी तर अल्लाहसमोर मान तुकविली आहे." मग ग्रंथधारक व बिगर ग्रंथधारी दोघांना विचारा, "काय तुम्हीही त्याची आज्ञाधारकता व दास्यत्व स्वीकारले?' जर त्यांनी स्वीकारले तर त्यांना सरळमार्ग प्राप्त झाला. जर त्यापासून पराङ्मुख झाले तर तुमच्यावर फक्त संदेश पोहचविण्याची जबाबदारी होती. पुढे तर अल्लाह स्वत:च आपल्या सर्व दासांचे व्यवहार पाहणारा आहे."

(दिव्य कुरआन, ३:२०)

इस्लामचा प्रसार व प्रचार करताना कोणत्याही प्रकारची बळजबरी करण्याची आणि कोणत्याही प्रकारची जोरजबरदस्ती व बलप्रयोग न करण्याची या आयतींमध्ये शिकवण असूनसुद्धा या ठिकाणी 'अहले किताब' (ग्रंथधारक) ज्यू व ख्रिस्तींशी लढण्याचा या आयतीमधील आदेश येण्याचे कारणदेखील तेच आहे जे पत्रकातील आठव्या, नवव्या आणि विसाव्या क्रमांकाच्या आयतींसाठी मी सादर केले आहे. आणखीन एक गोष्ट उल्लेखनीय आहे की आयतीमध्ये उल्लेखण्यात आलेल्या 'जिझिया' नावाचा टॅक्स (कर) हा मुळात इस्लामी राज्यातील बिगरमुस्लिम जनतेच्या प्राण व संपत्तीचे रक्षण करण्यासाठी लागू करण्यात आलेला असतो. याशिवाय त्यांना इतर कोणत्याही प्रकारचा कर नसतो. याउलट इस्लामी राज्यातील मुस्लिमांवर मात्र वार्षिक अडीच टक्के जकात देणे बंधनकारक असते. आज आपण शासनाच्या नाना प्रकारच्या करवसुलीच्या विळख्यात आहोत.

पत्रकातील बाविसाव्या क्रमांकाची आयत :

"सरतेशेवटी आम्ही त्यांच्या दरम्यान पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत शत्रुत्व आणि परस्पर द्वेष व द्रोहाचे बीज पेरले. आणि अवश्य एक वेळ अशी येईल ज्या वेळेस अल्लाह त्यांना दाखवील की ते जगात काय करीत होते." (दिव्य कुरआन, ५:१४)

कपटपूर्ण उद्देशानेच या ठिकाणीदेखील आयतीचा अर्धवट भागच पत्रकात देऊन जनतेची दिशाभूल करण्यात आली. म्हणून वाचकांसाठी पूर्ण आयत आम्ही येथे सादर करीत आहोत.

"याचप्रमाणे आम्ही त्या लोकांकडून पक्के वचन घेतले होते ज्यांनी सांगितले होते

की आम्ही नसारा (ख्रिश्चन) आहोत परंतु त्यांनादेखील जो पाठ दिला गेला होता, त्याचा फार मोठा भाग ते विसरलेत. सरतेशेवटी आम्ही त्यांच्या दरम्यान पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत शत्रुत्व आणि परस्पर द्वेष व द्रोहाचे बीज पेरले. आणि अवश्य एक वेळ अशी येईल ज्या वेळेस अल्लाह त्यांना दाखवील की ते जगात काय करीत होते.''

(दिव्य कुरआन, ५:१४)

संपूर्ण आयत वाचल्यावर स्पष्ट होते की ही आयतसुद्धा वचनभंग करणे, तसेच धोका देणे वगैरे दुष्कर्मांविरूद्ध अवतरित झालेली आहे. मात्र कलह निर्माण करण्याच्या उद्देशाने नव्हे.

पत्रकातील तेविसाव्या क्रमांकाची आयत :

''ते तर हे इच्छितात की ज्याप्रमाणे ते स्वतः अश्रद्धावंत आहेत त्याचप्रमाणे तुम्हीही अश्रद्धावंत बनावे, म्हणजे तुम्ही व ते सर्वजण एकसारखेच व्हावे. म्हणून त्यांच्यापैकी कोणालाही आपला मित्र बनवू नका जोपर्यंत ते अल्लाहच्या मार्गात देशांतर करून येत नाहीत, आणि जर ते स्थलांतरापासून पराङमुख राहतील तर जेथे आढळतील तेथे त्यांना पकडा व ठार करा आणि त्यांच्यापैकी कोणासही आपला मित्र व साहाय्यक बनवू नका.''

(दिव्य कुरआन, ४:८९)

या ठिकाणीदेखील वाचकांनी यापूर्वीची अर्थात आयत क्र. ८८ जोडून वाचावी, तरच अर्थ कळेल. ही आयत क्र. ८८ आम्ही येथे देत आहोत.

''मग हे तुम्हाला झाले तरी काय आहे की दांभिकासंबंधी तुमच्यादरम्यान मतभिन्नता किंवा दुमत आढळते. वस्तुतः जे दुष्कर्म त्यांनी कमाविले आहे त्यांच्यामुळे अल्लाहने त्यांना परत फिरविले आहे. काय तुम्ही हे इच्छिता की ज्याला अल्लाहने सरळमार्गावर आणले नाही त्यांना तुम्ही सरळमार्गावर आणाल? वस्तुतः ज्याला अल्लाहने मार्गभ्रष्ट केले त्याच्यासाठी तुम्हाला कोणताच सन्मार्ग आढळणार नाही''

(दिव्य कुरआन, ४:८८)

यावरून स्पष्ट होते की ही आयत अर्थात आयत क्र. ८९, जी पत्रकात तेविसाव्या क्रमांकावर देण्यात आली आहे, निश्चितच कपटी व पाखंडी लोकांसाठी अवतरित झालेली आहे. कारण हेच मुनाफिक (कपटचारी) लोक मुस्लिमांसमोर येऊन सांगतात की 'आम्ही ईमान धारण केले आणि मुस्लिम झालो आहोत.' मक्का येथील सत्यविरोधकांकडे जाऊन मात्र सांगतात की 'आम्ही आमच्या पूर्वजांच्या धर्मावर आहोत, मूर्तिपूजक आहोत.' आणखीन असे म्हणत असत, 'आम्ही तर मुस्लिमांदरम्यान जाणून घेण्यासाठी जातो ज्यास आम्ही तुम्हाला सांगतो आणि संधी मिळताच त्यांना मूर्तिपूजेचा पारंपरिक धर्म

स्वीकारण्यासाठी सांगतो.'

म्हणून ही आयत अवतरित झाली की, या कपटी व दांभिकांशी मैत्री ठेवू नये. म्हणून यांच्या खरेपणाची परीक्षा घेण्यासाठी यांना सांगा की तुम्हीसुद्धा माझ्याप्रमाणे हिजरत करून देशांतर करावे जर खरे असाल तर. मात्र हे जर तयार नसतील तर समजून घ्यावे की हे धोकेबाज व पाखंडी हेर आहेत. यांचा हा पाखंडीपणा शत्रूंपेक्षाही जास्त भयानक आहे. त्या काळी युद्धाची परिस्थिती होती आणि अशा परिस्थितीत या मुनाफिकांची अर्थात दांभिकांची हेरगिरी करणे व शत्रूंचे खबरी होणे हे निश्चितच अत्यंत धोकादायक असते. अशा खबऱ्यांना फाशीपेक्षा कमी शिक्षा असूच शकत नाही. अशा लोकांच्या या हेरगिरीमुळेच त्यांच्याशी मैत्री करण्याची मनाई करण्यात आली. कारण असे करण्याचे धोकेच धोके आहेत.

यावरून स्पष्ट होते की ही आयत मुस्लिमांच्या आत्मरक्षणाचीच शिकवण देणारी असून इतर बिगरमुस्लिमांशी क्लेश व कलह निर्माण करण्याचा यामध्ये मुळीच हेतू नाही.

पत्रकातील चोविसाव्या क्रमांकाची आयत :

"त्यांच्याशी (अश्रद्धावंतांशी) युद्ध करा! अल्लाह तुमच्या हाताने त्यांना यातना देईल आणि त्यांना अपमानित करील आणि त्यांच्या मुकाबल्यात तुमची मदत करील आणि श्रद्धावंतांना (मुस्लिमांना) समाधान प्रदान करील." (दिव्य कुरआन, ९:१४)

पत्रकामधील पहिल्या क्रमांकाच्या आयतीसंबंधी भाष्य करताना आम्ही ही बाब सविस्तरपणे स्पष्ट केली की शांतताकरार भंग करून हल्ला करणाऱ्या बिगरमुस्लिमांविरूद्ध सूरह क्र. ९ ची ही आयत अवतरित झाली. पत्रकातील चोविसाव्या क्रमांकाची ही आयतदेखील शांतताकरार मोडून हल्ला करणाऱ्यांना शिक्षा देण्यासंबंधीची सूरह क्र. ९ ची आयत आहे. या आयतीमध्ये शत्रूंना त्यांच्या शांतताकरार मोडून शांतता भंग करण्याच्या अपराधाची शिक्षा देण्यासाठी त्यांच्याशी युद्ध करण्याची स्पष्ट आज्ञा देण्यात आली आहे. या आयतीचा अर्थ आणि हेतू आणखीन जास्त स्पष्टपणे समजण्याकरिता आम्ही या आयतींपूर्वीच्या दोन आयती वाचकांकरिता सादर करीत आहोत.

"आणि जर प्रतिज्ञा घेतल्यानंतर यांनी पुन्हा आपल्या शपथा मोडल्या आणि तुमच्या धर्मावर हल्ले करण्यास सुरूवात केली तर इन्काराच्या ध्वजधारकांशी युद्ध करा कारण त्यांच्या शपथा विश्वासपात्र नाहीत, कदाचित (मग तलवारीच्या जोरानेच) ते परावृत्त होतील."

(दिव्य कुरआन, ९:१२)

"काय तुम्ही लढणार नाहीत अशा लोकांशी जे आपल्या प्रतिज्ञा भंग करीत राहिले व ज्यांनी पैगंबराला देशातून काढून टाकण्याचा निश्चय केला होता व अतिरेकास प्रारंभ

करणारे तेच होते? तुम्ही त्यांना भीता काय? जर तुम्ही ईमानधारक असाल तर अल्लाह या गोष्टीला जास्त पात्र आहे की तुम्ही त्याची भीती बाळगावी.''(दिव्य कुरआन, ९:१३)

म्हणून शांतता स्थापन करण्याच्या हेतूनेच अवतरित झालेल्या सूरह क्र. ९ च्या या आयतींना शांतता भंग करणाऱ्या आणि द्वेष व कलह आणि हिंसा फैलावणाऱ्या असल्याचे दाखविणारे एक तर धूर्त आहेत किंवा अज्ञानी!

निष्कर्ष

वयाच्या चाळीसाव्या वर्षी पैगंबर मुहम्मद (स.) यांना अल्लाहकडून सत्यसंदेश मिळाल्यानंतर शेवटच्या क्षणापर्यंत (अर्थात तेवीस वर्षांपर्यंत) अत्याचारी व निष्ठूर सत्यविरोधकांनी (काफिरांनी) सुखाने जगू दिले नाही. या संपूर्ण काळात निरंतर युद्धाचे आणि कुटिलतापूर्ण वातावरण होते.

अशा परिस्थितीत स्वतःच्या रक्षणासाठी शत्रूंशी सावधान राहणे, शांतता आणि सुव्यवस्था भंग करणाऱ्या मुनाफिक (कपटचारी) अर्थात हेरगिरी करणाऱ्यांचे दमन करणे वा त्यांना दंडित करणे ही केवळ काळाची गरजच नव्हे तर मुस्लिमांचे परमकर्तव्य होते. अशा दुष्ट, अत्याचारी आणि कपटी लोकासाठी ऋग्वेदामध्ये ईश्वरांचा स्पष्ट आदेश आहे,

''मायाभिरिन्द्र मायिनं त्वं शुष्णमवातिरः।
विदुष्टं तस्य मेधिरास्तेषां श्रवांस्युत्तिर॥''

(संदर्भ : ऋग्वेद, मंडल-१, सूक्त-११, मंत्र-७)

भावार्थ- बुद्धिमान लोकांना ईश्वर आदेश देतो की, 'साम, दाम, दंड आणि भेदाच्या माध्यमाने शत्रूंचा नाश करून विद्या आणि चक्रवर्ती राज्याची उन्नती करावयास हवी, तसेच या जगात कपटी, निर्दयी आणि दुष्ट पुरुषांना वृद्धी प्राप्त होऊ नये, अशी निरंतर उपाययोजना करावयास हवी.'

(हिंदी भाष्य- महर्षी दयानंद. मात्र या ठिकाणी मराठीत भावानुवाद दिला आहे.)

या ठिकाणी ही बाब अगदीच स्पष्ट आहे की या पत्रकात व पोस्टरमध्ये सादर करण्यात आलेल्या २४ आयती या मुळात मुस्लिमांनी स्वतःचे आणि एकेश्वरवादी सत्यधर्माचे रक्षण करण्यासाठी असलेले अल्लाहचे आदेश आहेत. खरे पाहता या आयती अगदी व्यावहारिक सत्य होय. मात्र आपला राजकीय स्वार्थ साधून घेण्यासाठी कुरआनातील या आयतींची चुकीची व्याख्या करून जनतेसमोर मांडून काही स्वार्थी वृत्तीचे लोक मुस्लिम आणि इतर धर्मियांच्या दरम्यान द्वेष, तिरस्कार, वैरभाव आणि घृणा निर्माण करण्याचे कटकारस्थान करीत नाहीत काय? अत्यंत सुनियोजितपणे जनतेची दिशाभूल करण्याचे

पातककर्म करीत नाहीत काय?

सन १९८६ मध्ये छापण्यात आलेले हे पत्रक न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन जनतेसमोर मांडण्याचा मुळात कोणता हेतू आहे?

आपल्या राजकीय स्वार्थाची पोळी भाजून घेण्यासाठी द्वेष, वैरभाव आणि मानवजातीत एकदुसऱ्याविषयी घृणा व तिरस्काराची आग पेटवून देशात अशांती माजविणाऱ्या लोकांशी जनतेने वेळीच सावध व्हावे.

अशा लोकांना हेदेखील समजू नये काय की इतरांकडून आदर सन्मान मिळविण्याकरिता अगोदर आपण इतरांचा आदर-सन्मान करणे आवश्यक असते?

अशा लोकांनी प्रथम स्वत: शुद्ध अंत:करणाने कुरआनचा चांगल्या रीतीने अभ्यास करावा आणि इस्लामला जाणून घ्यावे मगच इस्लामवर मत मांडण्यासाठी आपले तोंड उघडावे. अन्यथा तोंड बंद ठेवलेलेच बरे!

हेदेखील शक्य आहे की हे पत्रक अथवा पोस्टर जनतेमध्ये वितरित करणारेसुद्धा माझ्यासारखेच भ्रमित झाले असतील, सत्य त्यांच्यासमोर स्पष्ट झाले नसेल आणि नकळत त्यांच्याकडून ही चूक घडली असेल. मात्र आता सत्य स्पष्ट झाल्यावर कित्येक भाषांमध्ये छापून जनतेत वितरित करण्यात येत असलेले हे पत्रक बंद करून कळत न कळत घडलेल्या चुकीचे शुद्ध अंत:करणाने प्रायश्चित्त करावे आणि सार्वजनिक रूपाने माफी मागण्याचे कर्तव्य पार पाडावे.

येथे एका घटनेचा उल्लेख करणे अति आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वी 'वैदिक धर्म व इस्लाम' या विषयावर कानपूरमध्ये आयोजित एका चर्चासत्रात माझ्या व्याख्यानानंतर आर्यसमाजी एका गृहस्थाने मला विचारले, "स्वामीजी! आता आपण इस्लामविषयी सांगितले की इस्लाम व वेदांच्या सत्यतेत आश्चर्यजनक साम्य आढळते. तुम्ही दिलेल्या तर्कानुसार हेच सिद्ध होते. आता सांगा की स्वामी दयानंद सरस्वती लिखित 'सत्यार्थ प्रकाश'चा १४ वा अध्याय काय चुकीचा आहे? हा एक असा प्रश्न आहे जो त्या लोकांच्या मनात स्वाभाविकपणे येतो ज्यांनी 'सत्यार्थ प्रकाश'चे अध्ययन केले आहे. याचे उत्तर आहे, - जसे मी स्वत:विषयी लिहिले आहे, की कुरआनच्या आयतींचा अचूक अर्थ जाणण्यासाठी हे जाणून घेणे अत्यावश्यक आहे की आयत का अवतरित झाली? आणि कोणत्या परिस्थितीत अवतरली आहे? तसेच कुरआनला समजून घेण्यासाठी व्यक्तीच्या मनात इस्लामविषयी सकारात्मक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. म्हणजेच मन शुद्ध असणे आवश्यक आहे. कारण ईशग्रंथ हे फार रहस्यमयी असतात. त्यांना समजून घेणे सोपे नाही. वेदांना घ्याल तर वैदिक मंत्रांचा अचूक अर्थ काढणे अत्यंत कठीण काम आहे.

मंत्रांचा अर्थ काढताना लोकांची जशी मानसिकता असेल, त्यामुळे मंत्रांचा अर्थ काढण्यात ती प्रभावी ठरते.

स्वामी दयानंद सरस्वती फार मोठे विद्वान होते, परंतु स्वामीजी अरबी भाषा जाणत नव्हते. स्वामीजींनी माझ्याचप्रमाणे इस्लामप्रति नकारात्मक दृष्टिकोन ठेवून कुरआनचा सरळ अनुवाद पाहिला किंवा ऐकला. त्यांनी हे पाहिले नाही की आयत अवतरित का झाली आणि कोणत्या परिस्थितीत अवतरली? आणि आयतचा हेतू कोणता आहे? आणि ती आयत कोणत्या संदर्भात आहे? याचमुळे माझ्याप्रमाणे ते कुरआनविषयी संभ्रमित झाले आणि त्याविषयी चुकीची धारणा बनविली. स्वामीजी एक महान विद्वान होते. चुक त्यांची नव्हती तर त्या व्यक्तीची होती ज्याने स्वामीजींना कुरआन व्यवस्थित समजून सांगितला नाही. कुरआनच्या आयतींना अचूक समजून घेण्याची पद्धत सांगितली नाही. स्वामीजींनी जर पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र जीवन आणि त्यांचे कथन (हदीस) यांचे अध्ययन केले असते तर निश्चितपणे त्यांनी कुरआनविषयी तेच म्हटले असते किंवा लिहिले असते जे आज मी सांगत आहे आणि लिहित आहे.

(स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्वत: लिखित ग्रंथ 'सत्यार्थ प्रकाश'मध्ये मुख्य धर्मांची आणि मतांची समीक्षा केली आहे. या ग्रंथाच्या १४ व्या अध्यायामध्ये इस्लामविषयी अगदी चुकीची व भ्रामक माहिती देण्यात आली आहे.)

कुरआनची आदर्श शिकवण

ही बाब मी स्वत: अनुभवली आहे की ईशज्ञान असलेले रहस्यमय ग्रंथ वाचण्याकरिता आणि समजून घेण्याकरिता शुद्ध शरीराबरोबरच शुद्ध अंत:करणाचीदेखील गरज असते तेव्हा त्यांचे रहस्य कळते. मीदेखील जेव्हा शुद्ध अंत:करणाने ईशग्रंथ कुरआनाचा अभ्यास केला, तेव्हा अल्लाहच्या रहस्यमयी आयतींचा वास्तविक अर्थ लक्षात आला. अल्लाहने अवतरित केलेला कुरआन हा ग्रंथ मानवकल्याणासाठी असून यात मानवतेप्रति आदर्शच आदर्श आहे.

कुरआनातील अगदी प्रारंभीचा सूरह 'फातिहा' ईशवंदना आहे. हा सूरह वाचल्यावर माणसाचे अंत:करण आपोआपच अल्लाहची अर्थात ईश्वराची सर्वोच्चता स्वीकार करते आणि अल्लाहच्या प्रति आस्था आणि श्रद्धेने तसेच भक्तीने माणसाचे मन ओतप्रोत होते. हा सूरह शुद्ध अंत:करणाने व आस्तिक भावनेने वाचावा. आम्ही याचे मराठी भाषांतर वाचकांसाठी येथे सादर करीत आहोत.

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

"स्तवन फक्त अल्लाहसाठीच आहे जो सर्व सृष्टीचा पालनकर्ता आहे. एकमात्र कृपावंत आणि दयावंत, निर्णयाच्या दिवसाचा स्वामी आहे. आम्ही तुझीच बंदगी (भक्ती) करतो आणि तुजपाशीच मदत मागतो. आम्हाला सरळमार्ग दाखव. त्या लोकांचा मार्ग ज्यांना तू अनुग्रहित केलेस. जे कोपग्रस्त झाले नाहीत व जे मार्गभ्रष्ट नाहीत." (तथास्तु)

(दिव्य कुरआन, १:१-७)

कुरआनचे आध्यात्मिक आदर्श

"सावधान! आकाशात वास्तव्य करणारे असोत अथवा पृथ्वीवर, सर्वचे सर्व अल्लाहच्या मालकीचे आहेत. आणि जे लोक अल्लाहशिवाय काही (आपले स्वरचित) बनावटी भागीदारांचा धावा करीत आहेत, ते निव्वळ मिथ्या व भ्रामक कल्पनेचे अनुयायी आहेत व केवळ कल्पनाविलास करीत आहेत. तो अल्लाहच आहे ज्याने तुमच्यासाठी रात्र बनविली की तिच्यात संतोष प्राप्त करावा व दिवसाला प्रकाशमान बनविले. यात निशाण्या आहेत त्या लोकांकरिता जे (उघड्या कानांनी पैगंबराचे आवाहन) ऐकतात."

(दिव्य कुरआन, १०:६६-६७)

"हे पैगंबर (स.)! सांगून टाका, "लोकहो! जर अद्यापही माझ्या धर्मासंबंधी तुम्ही एखाद्या शंकेत असाल तर ऐकून घ्या की तुम्ही अल्लाहशिवाय ज्यांची भक्ती करता मी त्यांची भक्ती करीत नाही तर केवळ त्याच अल्लाहची भक्ती करतो ज्याच्या अधिकारात तुमचा मृत्यू आहे. मला आज्ञा दिली गेली आहे की मी ईमानधारकांपैकी व्हावे."

(दिव्य कुरआन, १०:१०४)

"आणि अल्लाहला सोडून अशा कोणत्याही अस्तित्वाचा धावा करू नकोस जो तुला फायदाही पोहचवू शकत नाही आणि नुकसानही नाही. जर तू असे करशील तर अत्याचाऱ्यांपैकी बनशील." (दिव्य कुरआन, १०:१०६)

"सांगा, अल्लाहला सोडून काय मी इतर कोणाला आपला पालक बनवू? त्या अल्लाहला सोडून जो आकाश व पृथ्वीचा निर्माता आहे. तो उपजीविका देतो, उपजीविका घेत नाही. सांगून टाका, मला तर हाच आदेश दिला गेला आहे की सर्वप्रथम मी त्याच्यापुढे आज्ञापालनार्थ मान तुकवावी, (आणि ताकीद करण्यात आली आहे की कोणी अनेकेश्वरवादी होत असेल तर होवो) तू कोणत्याही परिस्थितीत अनेकेश्वरवाद्यांत सामील होऊ नकोस." (दिव्य कुरआन, ६:१४)

"याउलट तुम्ही अल्लाहव्यतिरिक्त ज्यांचा धावा करता ते तुम्हाला साहाय्य करू शकत नाहीत आणि स्वत: आपल्याला मदत करण्याचे देखील सामर्थ्य त्यांच्यात नाही, इतकेच नव्हे तर जर तुम्ही त्यांना सरळमार्गावर येण्याचे आवाहन कराल तर ते तुमचे म्हणणे ऐकूही शकत नाहीत. सकृतदर्शनी तुम्हाला असे दिसते की ते तुमच्याकडे पाहात आहेत परंतु वस्तुत: ते काहीही पाहात नाहीत." (दिव्य कुरआन, ७:१९७-१९८)

"यांना विचारा, कोण तुम्हाला आकाश व पृथ्वीतून उपजीविका देतो? या ऐकण्याच्या व पाहण्याच्या शक्ती कोणाच्या अधिकारात आहेत? कोण निर्जीवमधून सजीव आणि सजीवांमधून निर्जीव काढतो? कोण या विश्वव्यवस्थेची उपाययोजना करीत आहे? ते अवश्य म्हणतील की अल्लाह. सांगा, मग तुम्ही (वास्तविकतेविरूद्ध चालण्यापासून) त्याच्याशी परायण का राहात नाही? तेव्हा हाच अल्लाह तुमचा खरा पालनकर्ता आहे. मग सत्यानंतर पथभ्रष्टतेशिवाय आणखी काय उरले आहे? शेवटी तुम्ही कोठे वळविले जात आहात? (हे पैगंबर (स.) पाहा) अशा प्रकारे अवज्ञेचा अंगीकार तुमच्या पालनकर्त्याचे वचन सत्यप्रमाणित झाले, की ते मान्य करणार नाहीत. यांना विचारा तुम्ही ठरविलेल्या भागीदारांपैकी कोणी आहे जो निर्मितीचा प्रारंभसुद्धा करीत असेल आणि मग त्याची पुनरावृत्तीदेखील करीत असेल? सांगा, तो केवळ अल्लाह आहे जो निर्मितीचा प्रारंभही करतो व त्याची पुनरावृत्तीदेखील, मग तुम्ही या कोणत्या उलट्या मार्गावर चालविले जात आहात? यांना विचारा की तुम्ही ठरविलेल्या भागीदारांपैकी कोणी असा आहे जो सत्याकडे मार्गदर्शन करीत आहे? सांगा, तो केवळ अल्लाहच आहे जो सत्याकडे मार्गदर्शन करतो. मग सांगा, जो सत्याकडे मार्गदर्शन करतो तो याचा अधिक हक्कदार आहे की त्याचे अनुकरण केले जावे अथवा त्याचे ज्याला स्वत:ला मार्ग सापडत नाही, याशिवाय की त्याला मार्गदर्शन केले जाईल? शेवटी तुम्हाला झाले तरी काय आहे, कसले विपरीत निर्णय घेत आहात? वस्तुस्थिती अशी आहे की यांच्यापैकी बहुतेक

लोक केवळ अनुमान व कल्पनांच्या पाठीमागे जात आहेत. वास्तविक पाहता कल्पना, सत्याची गरज यत्किंचितही भागवीत नाही. जे काही हे करीत आहेत अल्लाह ते चांगलेच जाणतो.'' (दिव्य कुरआन, १०:३१-३६)

''हे अनेकेश्वरवादी म्हणतात, 'जर अल्लाहने इच्छिले असते तर आम्हीही आणि आमच्या पूर्वजांनीदेखील त्याच्याशिवाय अन्य कोणाची उपासनाही केली नसती आणि त्याच्या आज्ञेशिवाय एखाद्या वस्तूला निषिद्धदेखील ठरविले नसते.' असलेच निमित्त यांच्यापूर्वीचे लोकदेखील करीत राहिले आहेत, तर पैगंबरावर स्पष्ट गोष्टी पोहचविण्याव्यतिरिक्त काही जबाबदारी आहे काय? आम्ही प्रत्येक जनसमूहात एक पैगंबर पाठविला, आणि त्याच्याद्वारे सर्वांना खबरदार करून टाकले की, 'अल्लाहची भक्ती करा आणि अनिर्बंध बनलेल्या (तागूत) च्या उपासनेपासून अलिप्त राहा.' त्यानंतर त्यांच्यापैकी कुणाला अल्लाहने मार्गदर्शन दिले आणि कुणावर पथभ्रष्टता ओढवली. मग जरा धरतीवर चालून फिरून पाहा की खोटे ठरविणाऱ्यांचा शेवट कसा झाला आहे.''

(दिव्य कुरआन, १६:३५-३६)

''जी सत्य बाब आहे ती आम्ही यांच्यासमोर आणली आहे आणि काही शंका नाही की हे लोक खोटारडे आहेत. अल्लाहने कोणासही आपली संतती बनविले नाही, आणि कोणी दुसरा ईश्वर त्याच्यासमवेत नाही.'' (दिव्य कुरआन, २३:९०-९१)

''सांगा की, ''मी तर आपल्या पालनकर्त्याला पुकारतो आणि त्याच्याबरोबर कुणाला भागीदार ठरवीत नाही.'' सांगा, ''मी तुम्हा लोकांसाठी न एखाद्या हानीचा अधिकार राखतो न एखाद्या भल्याचा.'' सांगा, ''मला अल्लाहच्या पकडीतून कुणी वाचवू शकत नाही आणि मी त्याच्या छत्राशिवाय कोठेही आश्रयस्थान प्राप्त करू शकत नाही. माझे काम या व्यतिरिक्त काहीच नाही की अल्लाहचे म्हणणे आणि त्याचे संदेश पोहोचवावे. आता जो जो कोणी अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) चे ऐकणार नाही त्याच्यासाठी नरकाग्नी आहे आणि असले लोक त्यात सदैव राहतील.''

(दिव्य कुरआन, ७२:२०-२३)

''सांगा की, हे अश्रद्धावंतांनो, मी त्यांची उपासना करीत नाही ज्यांची उपासना तुम्ही करता. आणि न तुम्ही त्याची उपासना करणारे आहात ज्याची उपासना मी करतो. आणि न मी त्यांची उपासना करणारा आहे ज्यांची उपासना तुम्ही केली आहे. आणि न तुम्ही त्याची उपासना करणारे आहात ज्याची उपासना मी करतो. तुमच्यासाठी तुमचा धर्म आहे आणि माझ्यासाठी माझा धर्म.'' (दिव्य कुरआन, १०९ :१-६)

''सांगा, तो अल्लाह आहे एकमेव. अल्लाह सर्वांपासून निरपेक्ष आहे आणि सर्व त्याचे गरजवंत आहेत. न त्याची कुणीही संतती आहे आणि न तो कोणाची संतती. आणि

कुणी त्याच्या समान नाही.''   (दिव्य कुरआन, ११२ :१-४)

''जे लोक आमच्या संकेतवचनांना खोटे ठरवितात, ते बहिरे आणि मुके आहेत, अंधारात पडलेले आहेत. अल्लाह इच्छितो त्याला पथभ्रष्ट करतो आणि ज्याला इच्छितो त्याला सरळमार्गावर लावतो. यांना सांगा, थोडे विचार करून सांगा, जेव्हा तुमच्यावर अल्लाहकडून एखादे मोठे संकट येऊन कोसळते अथवा अंतिम घटका येऊन ठेपते तर काय तेव्हा तुम्ही अल्लाहशिवाय इतर कुणाचा धावा करता? सांगा, जर तुम्ही खरे असाल तर. त्यावेळी तुम्ही अल्लाहचाच धावा करता, मग जर त्याने इच्छिले तर तो तुमच्यावरून संकट टाळतो . अशा प्रसंगी तुम्ही ज्यांना अल्लाहचे भागीदार ठरविले आहे त्यांना विसरून जाता. तुमच्यापूर्वी अनेक जनसमूहांकडे आम्ही पैगंबर पाठविले आणि त्या जनसमूहांना संकटात व दु:खात टाकले जेणेकरून त्यांनी नम्रपणे आमच्यासमोर झुकावे.''

(दिव्य कुरआन, ६ :३९-४२)

''हे पैगंबर (स.), यांना सांगा, ''तुम्ही लोक अल्लाहशिवाय इतर ज्यांचा धावा करीत आहात त्यांची भक्ती करण्यास मला मनाई करण्यात आली आहे.'' सांगा, ''मी तुमच्या इच्छांचे अनुकरण करणार नाही, जर मी असे केले तर मी पथभ्रष्ट होईल, सरळमार्ग प्राप्त करणाऱ्यांपैकी राहू शकणार नाही.''   (दिव्य कुरआन, ६:५६)

''हे पैगंबर (स.)! त्यांना विचारा, काय आम्ही अल्लाहला सोडून त्यांचा धावा करावा जे आम्हाला लाभही पोहोचवू शकत नाहीत व नुकसानही नाही? आणि ज्याअर्थी अल्लाहने आम्हाला सन्मार्ग दाखवून दिला आहे तर काय आम्ही परत पावली मागे फिरावे? काय आम्ही आपली दशा त्या माणसासारखी करून घ्यावी ज्याला शैतानांनी वाळवंटात भटकविले असावे आणि तो हैराण व विक्षिप्तपणे फिरत असावा, वास्तविकपणे त्याचे सोबती त्याला हाका मारीत असतील की इकडे ये, हा सरळमार्ग अस्तित्वात आहे, सांगा, ''वस्तुत: खरे मार्गदर्शन तर केवळ अल्लाहचेच मार्गदर्शन आहे. आणि त्याच्याकडून आम्हाला हा आदेश मिळाला आहे की सर्व सृष्टीच्या स्वामीपुढे मान तुकवा.''

(दिव्य कुरआन, ६:७१)

''हे पैगंबर (स.), या लोकांना सांगा की मला तर त्या अस्तित्वांच्या उपासनेची मनाई केली गेली आहे, ज्यांचा तुम्ही अल्लाहला सोडून धावा करता (मी हे काम कसे करू शकतो) जेव्हा माझ्या पालनकर्त्याकडून माझ्याकडे स्पष्ट प्रमाण आले आहेत, मला आज्ञा दिली गेली आहे की मी सकल जगांच्या पालनकर्त्यापुढे नतमस्तक व्हावे. तोच तर आहे ज्याने तुम्हाला मातीपासून निर्माण केले, मग वीर्यापासून, मग रक्ताच्या गोळ्यापासून, मग तो तुम्हाला अर्भकाच्या रूपांत काढतो, मग तुम्हाला वाढवितो जेणेकरून तुम्ही आपल्या पूर्ण शक्तीप्रत पोहोचता. मग आणखी वाढवितो जेणेकरून तुम्ही वृद्धावस्था गाठावी. आणि

तुमच्यापैकी एखादा अगोदरच परत बोलाविला जातो. हे सर्वकाही अशासाठी केले जाते की तुम्ही आपली ठरलेली वेळ गाठावी आणि अशासाठी की तुम्हाला वस्तुस्थिती कळावी. तोच आहे जीवन देणारा आणि तोच मृत्यू देणारा आहे. तो जेव्हा कोणत्या गोष्टीचा निर्णय घेतो, केवळ एक आज्ञा देतो की ती होवो आणि ती होते.''

(दिव्य कुरआन, ४०:६६-६८)

''हे मुहम्मद (स.) सांगा की, ''हे मानवांनो, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे, त्याच्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही, तोच जीवन प्रदान करतो व तोच मृत्यू देतो, म्हणून श्रद्धा ठेवा अल्लाहवर आणि त्याने पाठविलेल्या निरक्षर नबी (स.) वर जो अल्लाह व त्याच्या आदेशांना मानतो, आणि अनुसरण करा त्याचे, जेणेकरून तुम्ही सरळमार्ग प्राप्त कराल.''

(दिव्य कुरआन, ७:१५८)

''आणि हे पैगंबर (स.) तुम्ही मार्गदर्शनाचे अनुसरण करीत राहा जे तुमच्याकडे दिव्य प्रकटन (वह्य) द्वारे पाठविले जात आहे, आणि संयम राखा इथपावेतो की अल्लाह निर्णय करील आणि तोच सर्वोत्तम निर्णय लावणारा आहे.'' (दिव्य कुरआन, १०:१०९)

''हे पैगंबर (स.)! सांगा, जे लोक अल्लाहवर खोटे कुभांड रचतात ते कदापि सफल होऊ शकत नाहीत. जगातील काही दिवसाच्या जीवनात मौजमजा करून घ्या, मग आमच्याकडे त्यांना परतावयाचे आहे, मग त्या द्रोहाच्या बदल्यात जे ते करीत आहेत आम्ही त्यांना कठोर यातनेचा आस्वाद चाखवू.'' (दिव्य कुरआन, १०:६९-७०)

''स्पष्ट सांगून टाका, हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्याकडून, आता ज्याची इच्छा असेल मान्य करावे आणि ज्याची इच्छा असेल त्याने नाकारावे. आम्ही (इन्कार करणाऱ्या) अत्याचाऱ्यांसाठी एक अग्नी तयार ठेवला आहे ज्याच्या ज्वालांनी त्यांना वेढून घेतले आहे. तेथे जर त्यांनी पाणी मागितले तर अशा पाण्याने त्यांचे आतिथ्य केले जाईल जे तेलावरील पापुद्र्यासारखे असेल आणि त्यांचे तोंड होरपळून टाकील, निकृष्ट पेय पदार्थ आणि अत्यंत वाईट विश्रांतिस्थान! उरले ते लोक जे ईमानधारक असतील आणि सत्कृत्ये करतील, तर निश्चितच आम्ही सत्कृत्ये करणाऱ्या लोकांचा मोबदला वाया घालवीत नसतो. त्यांच्यासाठी सदाबहार स्वर्ग आहेत ज्यांच्या खालून कालवे वाहात असतील, तेथे ते सुवर्ण कंकणांनी विभूषित केले जातील तलम रेशम आणि भरजरी हिरवी वस्त्रे ते परिधान करतील आणि उच्चासनावर लोड लाऊन बसतील. उत्तम मोबदला आणि उत्कृष्ट दर्जाचे निवासस्थान!'' (दिव्य कुरआन, १८:२९-३१)

''आणि जर त्यांच्यापैकी कुणी सांगितले की अल्लाहशिवाय मीदेखील एक उपास्य आहे तर आम्ही त्याला नरकाची शिक्षा देऊ. आमच्या येथे अत्याचाऱ्यांचा हाच बदला

आहे.''   (दिव्य कुरआन, २१:२९)

''हे पैगंबर (स.), आम्ही तर तुम्हाला जगवासियांसाठी कृपा बनवून पाठविले आहे. त्यांना सांगा, ''माझ्यापाशी जो दिव्यबोध येतो तो असा आहे की तुमचा ईश्वर केवळ एकच ईश्वर आहे, मग तुम्ही आज्ञापालनासाठी मान तुकविता काय?''

(दिव्य कुरआन, २१:१०७-१०८)

''हे ते लोक आहेत जे म्हणतात की, ''हे स्वामी, आम्ही श्रद्धा ठेवतो. आमच्या अपराधांबद्दल क्षमा कर आणि आम्हाला नरकाग्नीपासून वाचव.'' हे लोक संयमी आहेत, सत्यनिष्ठ आहेत, आज्ञाधारक व दानशूर आहेत, आणि रात्रीच्या अंतिम प्रहरी अल्लाहजवळ क्षमायाचना करीत असतात. अल्लाहने स्वत: या गोष्टीची ग्वाही दिली आहे की त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही, आणि फरिश्ते व सर्व ज्ञान राखणारेसुद्धा रास्त व न्यायनीतीने याची ग्वाही देतात की, त्या प्रभावशाली बुद्धिमंताशिवाय खरे पाहता कोणीही ईश्वर नाही.''

(दिव्य कुरआन, ३:१६-१८)

''हे पैगंबर (स.), यांना सांगा की, ''या, मी तुम्हाला ऐकवितो की तुमच्या पालनकर्त्याने तुमच्यावर काय निर्बंध घातले आहेत. हे की त्याच्यासमवेत कुणालाही भागीदार बनवू नका आणि आईवडिलांशी सद्वर्तन करा. आणि आपल्या संततीला दारिद्र्याच्या भीतीने ठार मारू नका, आम्ही तुम्हालादेखील उपजीविका देतो आणि त्यांनाही देतो व अश्लील गोष्टीच्या जवळपासदेखील फिरकू नका मग त्या उघड असोत अथवा गुपित, आणि कोणत्याही जीवाला ज्याला अल्लाहने आदरणीय ठरविले आहे ठार करू नका परंतु न्यायसंगत (असेल तर). या गोष्टी आहेत ज्यांचा आदेश त्याने तुम्हाला दिला आहे, कदाचित तुम्ही बुद्धीचा उपयोग कराल.''   (दिव्य कुरआन, ६:१५१)

''परंतु पश्चात्ताप त्या लोकांकरिता नाही जे वाईट कृत्ये करतात येथपावेतो की जेव्हा त्यांच्यापैकी एखाद्याची मृत्यूची घटका येऊन ठेपते तेव्हा तो म्हणतो की आता मी पश्चात्ताप केला आणि याच प्रकारे पश्चात्ताप त्या लोकांकरितादेखील नाही जे मरेपर्यंत अश्रद्धावंत राहिलेत. अशा लोकांकरिता तर आम्ही दु:खदायक शिक्षा तयार करून ठेवली आहे.''

(दिव्य कुरआन, ४:१८)

इस्लाम
मानवतेच्या कल्याणासाठी

"याच कारणास्तव बनीइस्राईलकरिता आम्ही हे फर्मान लिहिले होते की, "ज्याने एखाद्या माणसाला खुनाबद्दल अथवा पृथ्वीतलावर उपद्रव पसरविण्याव्यतिरिक्त अन्य कारणाने ठार केले तर त्याने जणू काही सर्व मानवांना ठार केले. आणि ज्याने कोणाला जीवनदान दिले त्याने जणू काही सर्व मानवजातीला जीवन प्रदान केले." परंतु त्यांची अवस्था अशी आहे की आमचे पैगंबर वरचेवर त्यांच्यापाशी उघड उघड आदेश घेऊन आले तरीसुद्धा त्यांच्यात मोठ्या संख्येने पृथ्वीवर अतिरेक करणारे लोक आहेत."

(दिव्य कुरआन, ५:३२)

"हे लोकहो! ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, आपल्या घराशिवाय दुसऱ्यांच्या घरात प्रवेश करीत जाऊ नका. जोपर्यंत त्या घरातील लोकांची सम्मती मिळत नाही आणि त्या घरातील लोकांना तुम्ही सलाम करीत नाही. ही पद्धत तुमच्यासाठी उत्तम आहे. अपेक्षा आहे की तुम्ही हे लक्षात ठेवाल." (दिव्य कुरआन, २४:२७)

"तुमच्यापैकी जे लोक अविवाहित असतील आणि तुमच्या दास-दासींपैकी जे सदाचारी असतील त्यांचे विवाह करून द्या. जर ते गरीब असतील तर अल्लाह त्यांना आपल्या कृपेने श्रीमंत बनवील. अल्लाह विशाल आणि सर्वज्ञ आहे."

(दिव्य कुरआन, २४:३२)

"आणि जर श्रद्धावंतांपैकी दोन गट परस्परांशी लढलेच तर त्यांच्या दरम्यान समेट घडवून आणा, मग जर त्यांच्यापैकी एका गटाने दुसऱ्या गटाची आगळिकी केली तर आगळिकी करणाऱ्याशी लढा येथपावेतो की तो अल्लाहच्या आदेशाकडे परत येईल, मग जर तो परत आला तर त्यांच्या दरम्यान न्यायाने समेट करा आणि न्याय करा, अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो. श्रद्धावंत तर एक दुसऱ्याचे भाऊ आहेत, म्हणून आपल्या भावांच्या दरम्यान संबंध सुरळीत करा आणि अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा, आशा आहे की तुमच्यावर दया केली जाईल. हे लोकहो, ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, पुरुषांनी दुसऱ्या पुरुषांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की ते त्यांच्यापेक्षा उत्तम असतील, आणि स्त्रियांनीसुद्धा दुसऱ्या स्त्रियांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की त्या त्यांच्यापेक्षा उत्तम असतील. आपापसांत एकमेकांना टोमणे (व्यंग) मारू नका आणि एकमेकांचा उल्लेख वाईट नावानेही करू नका. श्रद्धा ठेवल्यानंतर दुराचारांत नाव मिळविणे फार वाईट गोष्ट आहे. जे लोक या वर्तनापासून परावृत्त होत नसतील ते अत्याचारी होत. हे लोकहो, ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, अधिक शंका घेण्यापासून दूर राहा

कारण काही बाबतीत कुतर्क करणे हे पाप आहे. हेरगिरी करू नका. आणि तुमच्यापैकी कुणीही कुणाची चहाडी करू नये. काय तुमच्यापैकी एखादा असा आहे की जो आपल्या मृत भावाचे मांस खाणे पसंत करील? पहा, तुम्हा स्वत:ला याची घृणा वाटेल अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा, अल्लाह मोठा पश्चात्ताप स्वीकारणारा आणि परम कृपाळू आहे.''

(दिव्य कुरआन, ४९:९-१२)

''हे लोकहो ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, जेव्हा पुकारले जाईल नमाजसाठी शुक्रवारच्या दिवशी तेव्हा अल्लाहच्या स्मरणाकडे धाव घ्या आणि खरेदी-विक्री सोडून द्या, हे तुमच्यासाठी अधिक उत्तम आहे जर तुम्ही जाणून घ्याल.'' (दिव्य कुरआन, ६२:९)

''जे कोणत्याही स्थितीत आपली संपत्ती खर्च करतात, मग ते बिकट स्थितीत असोत अथवा चांगल्या स्थितीत, जे राग गिळून टाकतात व दुसऱ्याचे अपराध माफ करतात - असे सदाचारी लोक अल्लाहला अतिशय प्रिय आहेत.'' (दिव्य कुरआन, ३:१३४)

''अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पाळा व आपसांत भांडू नका नाहीतर तुमच्यात दुर्बलता येईल व तुमचा वचक नाहीसा होईल. संयम राखा. निश्चितच अल्लाह संयमी लोकांबरोबर आहे. आणि त्या लोकांसमान रंगढंग अंगीकारू नका जे आपल्या घरातून ऐटीत आणि लोकांना आपली शान दाखवीत निघाले व ज्यांचे वर्तन असे आहे की अल्लाहच्या मार्गापासून रोखतात, जे काही ते करत आहेत ते अल्लाहच्या पकडीच्या बाहेर नाही.'' (दिव्य कुरआन, ८:४६-४७)

''जर एखाद्या व्यक्तीकडून वाईट कृत्य घडले अथवा आपल्या स्वत:वर अत्याचार केले आणि त्यानंतर अल्लाहजवळ माफीची विनंती केली तर अल्लाह त्याला क्षमा करणारा व कृपा करणारा आढळून येईल. जो वाईट कमाई करील तर त्याचीही कमाई त्याच्याकरिता संकट ठरेल. अल्लाहला सर्व गोष्टींची खबर आहे व तो विवेकशील व बुद्धिमान आहे. मग जो एखादी चूक व अपराध करून त्याचा आरोप इतर निरपराध व्यक्तींवर लादेल, त्याने तर मोठे कुभांड व उघड पापाचे ओझे शिरावर घेतले.''

(दिव्य कुरआन, ४:११०-११२)

''हे ईमानधारकांनो, विहित केले तुमच्यावर उपवास (रोजे) जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर जेणेकरून तुम्ही धर्मपरायण व्हाल.'' (दिव्य कुरआन, २:१८३)

इस्लाममध्ये आदर्श न्याय

इस्लामची न्यायिक व्यवस्था ही जगातील सर्वोच्च न्यायिक व्यवस्था आहे.

इस्लामने शत्रूबरोबरसुद्धा सच्चा न्याय करण्याचा आदेश दिला आणि या आधारावर इस्लामने न्यायाचा सर्वोच्च आदर्श मांडला. हे खाली दिलेल्या आयतींवरून स्पष्ट होते.

"हे श्रद्धावंतांनो! न्यायाचे ध्वजवाहक बना आणि अल्लाहसाठी साक्षीदार बना, यद्यपि तुमच्या न्यायाचा व तुमच्या साक्षीचा आघात तुम्हा स्वत:वर अथवा तुमच्या आईबापावर व नातेवाईकांवर जरी होत असेल तरीदेखील! मामल्यातील पक्षकार मग तो श्रीमंत असो अथवा गरीब, अल्लाह तुमच्यापेक्षा जास्त त्यांचा हितचिंतक आहे. म्हणून आपल्या मनोवासनेच्या अनुकरणात न्यायापासून दूर राहू नका आणि जर तुम्ही पक्षपाताची गोष्ट बोललाच अथवा सत्याला बगल दिली तर समजून असा की जे काही तुम्ही करता अल्लाहला त्याची माहिती आहे." (दिव्य कुरआन, ४:१३५)

"हे ईमानधारकांनो! अल्लाहसाठी सत्यावर अढळ राहणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना. एखाद्या गटाच्या शत्रुत्वाने तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख व्हाल. न्याय करा, हे ईशपरायणतेशी अधिक निकटवर्ती आहे. अल्लाहचे भय बाळगून कार्य करीत राहा. जे काही तुम्ही करता, अल्लाह त्याची पुरेपूर खबर ठेवणारा आहे." (दिव्य कुरआन, ५:८)

इस्लामला बदनाम करण्याचा हेतूपुरस्सर प्रयत्न करण्यात येतो की इस्लामने मुस्लिमेतरांवर अन्याय व अत्याचारांची कुऱ्हाड उगारली. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की इस्लाममध्ये मुस्लिमेतरांना तर सोडाच, अगदी आपल्या शत्रुंवरदेखील किंचितही अन्याय करण्याची मनाई आहे. कुरआनची ही आयत हे स्पष्ट करते,

"आणि तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या लोकांशी लढा जे तुमच्याशी लढतात परंतु अतिरेक करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे आवडत नाहीत." (दिव्य कुरआन, २:१९०)

इस्लामने कुणाचीही नाहक हत्या करण्याची परवानगी दिली नसून निरपराध वा निष्पापाची हत्या करणे एक घोर पाप असल्याचे ठरविले आणि म्हणूनच कोणत्याही निष्पाप व्यक्तीच्या खुनाची शिक्षा देहदंड ठरविली आहे. मात्र या ठिकाणीसुद्धा खुन्यास शिक्षा देण्यात अतिरेक करण्याची सक्त मनाई करण्यात आली आहे. यालाच खरा न्याय म्हणतात. याविषयी कुरआनात ईश्वराचा आदेश असा आहे,

"कोणाचीही हत्या करू नका जिला अल्लाहने निषिद्ध ठरविले आहे, परंतु सत्यानिशी आणि जी व्यक्ती अन्यायाने ठार केली गेली असेल तिच्या वारसास आम्ही किसास (बदला) च्या मागणीचा हक्क दिला आहे. म्हणून त्याने हत्या करण्यात मर्यादा ओलांडू नये त्याला मदत दिली जाईल." (दिव्य कुरआन, १७:३३)

"हे ईमानधारकानो, हत्येच्या बाबतीत तुमच्यासाठी हत्यादंडाचा आदेश नियत

केला आहे. स्वतंत्र व्यक्तीने हत्या केली असेल तर त्या स्वतंत्र व्यक्तीस आणि गुलामाने हत्या केली असेल तर गुलामास मारले जावे आणि स्त्रीने हत्या केली असेल तर त्या स्त्रीची हत्या करावी. परंतु जर खुनी व्यक्तीच्या सोबत मृत व्यक्तीचा भाऊ जर क्षमेची वागणूक करू इच्छित असेल तर सर्वसामान्य नियमानुसार हत्यादंडाचा निर्णय घेतला जावा. खुनी व्यक्तीने चांगल्या प्रकारे अर्थदंड दिला पाहिजे. ही तुमच्या पालनकर्त्याकडून दिलेली मुभा आणि दया आहे. याउपरदेखील जे अतिरेक करतील त्याच्यासाठी दु:खदायक यातना आहे. हे ज्ञानीजनहो, मृत्युदंडामध्ये (समाजाच्या सुरक्षिततेचे) जीवन आहे. आशा आहे की या कायद्याचे भंग करण्यापासून तुम्ही स्वत:ला वाचवाल.''

(दिव्य कुरआन, २:१७८-१७९)

''आणि चोर मग तो पुरुष असो अथवा स्त्री दोघांचे हात कापून टाका, हा त्यांच्या कर्मांचा बदला आहे आणि अल्लाहकडून अद्दल घडविणारी शिक्षा! अल्लाहचे सामर्थ्य सर्वांवर प्रभावी आहे आणि तो बुद्धिमान व द्रष्टा आहे.'' (दिव्य कुरआन, ५:३८)

''हे श्रद्धावंतांनो! तुमच्याकरिता हे वैध नाही की तुम्ही बळजबरीने स्त्रियांचे वारस बनावे. आणि हे देखील वैध नाही की त्यांना त्रस्त करून त्या स्त्रीधनाचा काही भाग तुम्ही हिरावून घेण्याचा प्रयत्न कराल जो तुम्ही त्यांना देऊन टाकला आहे, परंतु जर त्या उघडपणे अश्लील कृत्ये करतील तर (तुम्हाला जरूर त्यांना त्रास देण्याचा अधिकार आहे.) त्यांच्याशी चांगल्या प्रकारे जीवन व्यतीत करा. जर त्या तुम्हाला नापसंत असतील तर शक्य आहे की एखादी गोष्ट तुम्हाला पसंत नसेल परंतु अल्लाहने त्यांच्यातच बरेचसे भले ठेवले असेल.'' (दिव्य कुरआन, ४:१९)

''पुरुषांसाठी त्या संपत्तीत वाटा आहे जी आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांनी मागे ठेवली असेल आणि स्त्रियांसाठीही त्या संपत्तीत वाटा आहे जी आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांनी मागे ठेवली असेल, मग ती कमी असो अथवा जास्त, हा वाटा (अल्लाहकडून) ठरविलेला आहे.'' (दिव्य कुरआन, ४:७)

इस्लामची हीच सर्वोत्तम न्यायिक व्यवस्था आहे आणि याच न्यायव्यवस्थेमुळे इस्लामी देशांत (त्या ठिकाणी इस्लामी व्यवस्था लागू आहे) खून, दरोडे, वाटमारी, बलात्कार, व्यभिचार वगैरेसारखी दुष्कर्मे होत नाहीत. आज सारे जग मोठ्या नरमाईने पाहत आहे की सौदी अरेबिया, इराण, कुवैत वगैरेसारख्या मुस्लिम देशांत शुक्रवारची नमाज अदा करण्यासाठीची अजान होताच आपापल्या दुकानात कोट्यवधींचा माल व सोने-चांदी सोडून दुकान उघडेच सोडून मुस्लिम नमाज अदा करण्यासाठी जातात आणि किंचितही चोरी होत नाही.

आज साऱ्या जगात तरुण पिढी मादक पदार्थांच्या व्यसनास बळी पडलेली आहे. मात्र इस्लामी न्यायव्यवस्था लागू असलेल्या देशांत समस्त जनता या सामाजिक दुर्दशेपासून पूर्णत: मुक्त आहे.

सर्वोत्तम मानवी आदर्श

कुरआनच्या या आयती पाहा,

"सदाचार हा नव्हे की तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे करावे तर सदाचार हा आहे की जे अल्लाहवर आणि अंतिम दिवसावर ईमान धारण करतात तसेच सर्व दूतांवर, सर्व ग्रंथ आणि सर्व पैगंबरांवर ईमान धारण करतात ईशप्रेमापोटी आपल्याला प्रिय असलेली संपत्ती आपले नातेवाईक आणि अनाथ गरजवंत, वाटसरू व याचक तसेच गुलामांच्या मुक्ततेसाठी खर्च करतात आणि नमाज कायम करतात व जकात अदा करतात तसेच दिलेल्या वचनांची पूर्तता करतात आणि अडचणी, संकटे आणि युद्धप्रसंगीदेखील संयम राखतात हेच लोक सत्यशील आणि अल्लाहचे भय बाळगणारे आहेत."

(दिव्य कुरआन, २:१७७)

"आणि तुम्ही आपसांमध्ये इतरांची संपत्ती अवैधपणे गिळंकृत करू नका किंवा आपल्या अधिकाऱ्यांच्या पुढे ती या हेतूने सादर करू नका की तुम्हाला त्या संपत्तीमधील काही भाग हेतूपुरस्सर हकनाकपणे खाण्याची संधी मिळेल."

(दिव्य कुरआन, २:१८८)

"जर तुम्ही आपले दान जाहिररीत्या द्याल तर हेदेखील चांगले आहे परंतु जर गुप्तरीत्या गरजूंना द्याल तर हे तुमच्यासाठी अधिक उत्तम आहे. तुमचे बरेचसे दोष या वर्तनाने नाहीसे होतात आणि जे काही तुम्ही करता अल्लाहला सर्व परिस्थितीत त्याचे ज्ञान आहे."

(दिव्य कुरआन, २:२७१)

"अल्लाह व्याजाचा ऱ्हास करतो आणि दान-धर्माची वाढ करतो आणि अल्लाह कोणत्याही कृतघ्न आणि वाईट आचरण करणाऱ्याला पसंत करत नाही."

(दिव्य कुरआन, २:२७६)

"हे श्रद्धावानांनो, अल्लाहचे भय बाळगा आणि जे काही तुमचे व्याज लोकांकडून येणे बाकी असेल ते सोडून द्या, जर खरोखर तुम्ही श्रद्धावंत असाल. परंतु जर तुम्ही असे केले नाही, तर सावध व्हा, अल्लाह व त्याच्या पैगंबराकडून तुमच्याविरूद्ध युद्धाची घोषणा आहे. अजूनसुद्धा पश्चात्ताप कराल (आणि व्याज सोडून द्याल) तर आपली मूळ रक्कम घेण्याचा तुम्हाला अधिकार आहे. तुम्ही कुणावर अत्याचार करू नका न तुमच्यावर कुणी अत्याचार करील. तुमचा कर्जदार जर हलाखीच्या परिस्थित असेल तर सुबत्ता येईपर्यंत त्याला सवलत द्या. आणि जर दान करून टाकाल तर ते तुमच्यासाठी जास्त चांगले आहे, जर तुम्ही समजून घ्याल. त्या दिवसाच्या संकटापासून आपला बचाव करा जेव्हा तुम्ही अल्लाहकडे परत जाल, तेथे प्रत्येक माणसाला त्याने कमाविलेल्या पुण्य

व पापाचा पुरेपूर मोबदला मिळेल आणि कोणावरही कदापि अन्याय होणार नाही.''
(दिव्य कुरआन, २:२७८-२८१)

"अनाथांची संपत्ती त्यांना परत करा. चांगल्या मालाला वाईट मालाने बदलू नका, आणि त्यांचा माल आपल्या मालात मिसळून खाऊ नका, हा फार मोठा गुन्हा आहे.''
(दिव्य कुरआन, ४:२)

"जे लोक अन्यायाने अनाथांची मालमत्ता गिळंकृत करतात खऱ्याअर्थी ते आपले पोट आगीने भरतात आणि निश्चितच ते नरकाच्या अग्नीत भडकत असलेल्या आगीत झोकून दिले जातील.'' (दिव्य कुरआन, ४:१०)

"आणि अनाथाच्या संपत्तीजवळ जाऊ नका, परंतु अशा मार्गाने जो योग्य असेल, येथपावेतो की तो प्रौढत्व गाठील. व वजनमापांत काटेकोर न्याय पाळा, आम्ही प्रत्येक माणसावर जबाबदारीचा तितकाच भार टाकतो जितका त्याच्या आवाक्यात आहे. आणि जेव्हा तुम्ही बोलाल तेव्हा न्यायोचित बोला मग ती गोष्ट आपल्या नातेवाईकांच्या बाबतीत का असेना व अल्लाहशी केलेल्या कराराची पूर्तता करा. या गोष्टीचे आदेश अल्लाहने तुम्हाला दिले आहेत कदाचित तुम्ही उपदेशाचा स्वीकार कराल.'' (दिव्य कुरआन, ६:१५२)

"हे दान तर खऱ्या अर्थी फकीर आणि गोरगरिबांसाठी आहे. आणि त्या लोकांसाठी जे दान वसुलीच्या कामावर नेमले आहेत आणि त्या लोकांकरिता ज्यांची दिलजमाई अपेक्षित आहे. तसेच हे, गुलामांच्या मुक्ततेसाठी व कर्जदारांना मदत करण्यासाठी व ईशमार्गात आणि वाटसरूंच्या सेवेसाठी उपयोगात आणण्याकरिता आहे. एक कर्तव्य आहे अल्लाहकडून आणि अल्लाह सर्वकाही जाणणारा द्रष्टा व बुद्धिमान आहे.''
(दिव्य कुरआन, ९:६०)

"अनाथाच्या संपत्तीजवळ फिरकू नका परंतु उत्तम रीतीने, येथपावेतो की तो आपल्या तारुण्यापर्यंत पोहचेल. वचनाचे पालन करा. निःसंशय वचनाबद्दल तुम्हाला जाब द्यावा लागेल. मापाने द्याल तेव्हा पूर्ण भरून द्या आणि वजन कराल तेव्हा ठीक तराजूने वजन करा ही चांगली पद्धत आहे आणि परिणामाच्या दृष्टीनेदेखील हीच उत्तम आहे. एखाद्या अशा गोष्टीमागे लागू नका जिचे तुम्हाला ज्ञान नसेल. निश्चितच डोळे, कान व हृदय या सर्वांच्याकडे जाब विचारला जाईल. पृथ्वीवर घमेंडीत चालू नका, तुम्ही पृथ्वीला फाडूही शकत नाही किंवा पर्वताच्या उंचीला गाठू शकत नाही. या गोष्टींपैकी प्रत्येकाचा वाईट पैलू तुझ्या पालनकर्त्याजवळ अप्रिय आहे. या त्या विवेकाच्या गोष्टी आहेत ज्यांना तुझ्या पालनकर्त्याने तुझ्यावर दिव्यप्रकटन केले आहे.'' (दिव्य कुरआन, १७:३४-३८)

"हे पैगंबर (स.), सांगून टाका, 'लोकहो, मी तर तुमच्यासाठी केवळ ती व्यक्ती

आहे जी (वाईट वेळ येण्यापूर्वी) स्पष्टपणे खबरदार करणारी आहे.' मग जे श्रद्धा ठेवतील व सत्कृत्ये करतील त्यांच्यासाठी क्षमा आहे व मानाची उपजीविका. आणि जे आमच्या संकेतांचे वैभव नष्ट करण्याचा प्रयत्न करतील ते नरकाचे सोबती आहेत.''

(दिव्य कुरआन, २२:४९-५१)

''माप ठीक भरा आणि कोणालाही कमी देऊ नका. खऱ्या तराजूने वजन करा आणि लोकांना त्यांच्या वस्तू कमी देऊ नका. पृथ्वीतलावर उपद्रव पसरवीत फिरू नका आणि त्याच अस्तित्वाचे भय बाळगा ज्याने तुम्हाला आणि पूर्वीच्या पिढ्यांना निर्मिले आहे.''

(दिव्य कुरआन, २६:१८१-१८४)

''विनाश आहे त्या प्रत्येक माणसासाठी ज्याला लोकांना टोमणे मारण्याची व (पाठीमागे) निंदा करण्याची सवय आहे, ज्याने धन गोळा केले आणि मोजून मोजून ठेवले. तो समजतो की त्याचे धन सदैव त्याच्यापाशी राहील, कदापि नाही, तो मनुष्य तर चक्काचूर करून टाकणाऱ्या जागी फेकून दिला जाईल आणि तुम्हाला काय माहीत की काय आहे ती चक्काचूर करणारी जागा? अल्लाहचा अग्नी, खूप भडकलेला, जो हृदयापर्यंत पोहचेल, तो त्यांच्यावर झाकून बंद केला जाईल. (अशा अवस्थेत की ते) उंचउंच स्तंभात (वेढले गेले असतील).''

(दिव्य कुरआन, १०४:१-९)

''तुम्ही पाहिले त्या माणसाला जो परलोकातील मोबदला व शिक्षेला खोटे ठरवितो? तोच तर आहे जो अनाथाला धक्के देतो आणि गरिबांना जेवण देण्यासाठी उत्तेजन देत नाही. मग विनाश आहे त्या नमाज अदा करणाऱ्यांसाठी जे आपल्या नमाजात गफलत करतात. जे दिखाऊपणा करतात, आणि क्षुल्लक गरजेच्या वस्तू (लोकांना) देण्यास टाळाटाळ करतात.''

(दिव्य कुरआन, १०७:१-७)

''सांगा, मी शरण मागतो सकाळच्या पालनकर्त्याची, त्या प्रत्येक वस्तूच्या अरिष्टापासून जी त्याने निर्माण केली आहे. आणि रात्रीच्या अंधाराच्या अरिष्टापासून जेव्हा की तो पसरतो, आणि गंड्यांत फुंकणाऱ्यांच्या अरिष्टापासून आणि मत्सर करणाऱ्यांच्या अरिष्टापासून जेव्हा ते मत्सर करतात.''

(दिव्य कुरआन, ११३:१-५)

''सांगा, मी शरण मागतो मानवांच्या पालनकर्त्यापाशी, मानवांच्या बादशाहपाशी, मानवांच्या खऱ्या ईश्वरापाशी, त्या दुष्प्रवृत्त करणाऱ्याच्या अरिष्टापासून जो पुन्हा पुन्हा परतून येतो, जो लोकांच्या मनात दुष्प्रवृत्ती निर्माण करतो, मग तो जिन्नांपैकी असो की मानवांपैकी.''

(दिव्य कुरआन, ११४:१-६)

पैगंबर मुहम्मद (स.) यांची वचने

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र, त्यांची वचने आणि त्यांची कर्मप्रणाली तसेच कुरआनातील अल्लाहचे आदेश हाच इस्लाम होय.

आम्ही कुरआनातील अल्लाहचे आदेश पाहिले, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केला. आता आपण मुहम्मद (स.) यांची वचने पाहू या.

हदीसच्या अर्थात पैगंबरवचनांच्या संपूर्ण ग्रंथांमधील सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'बुखारी शरीफ' व 'मुस्लिम शरीफ' होय. आम्ही सादर करीत असलेल्या हदीसी येथूनच घेण्यात आल्या आहेत.

१) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, "आपल्या बंधुची मदत करा, मग तो अत्याचारी असो की अत्याचारपीडित असो." प्रश्नकर्त्याने विचारले, "हे अल्लाहचे पैगंबरा! अत्याचारपीडिताची तर आम्ही मदत करू शकतो. मात्र अत्याचारीची मदत कशी करता येईल?"
   यावर पैगंबर मुहम्मद (स.) उत्तरले, "अत्याचारी माणसाला अत्याचार करण्यापासून रोखावे, ही त्याची मदत करणे होय." (हदीस : बुखारी-१०४६)

२) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, "जी व्यक्ती दया करीत नाही, तीदेखील दयेस पात्र नसते." (हदीस : बुखारी-१६७४)

३) पैगंबर मुहम्मद (स.) खूप लाजाळू स्वभावाचे होते. त्यांनी कधीही कोणास शिवीगाळ केली नाही, कोणाचा अपमान केला नाही, कोणासही धिक्कारले नाही. त्यांना जेव्हा राग येत असे तेव्हा एवढेच म्हणत, "हे काय झाले! त्याच्या डोक्यावर माती पडो!" (हदीस : बुखारी-१६८१)

४) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, "एखादी मुस्लिम व्यक्ती जोपर्यंत एखाद्याची हकनाक हत्या करीत नाही, तोपर्यंत त्यात धर्मबुद्धी होत राहील." (हदीस : बुखारी-१६९३)

५) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, "सर्वांपैकी तीन प्रकारचे लोक अल्लाहला खूप वाईट दिसतात. प्रथम 'हरम'च्या क्षेत्रात अत्याचार करणारे, द्वितीय इस्लाममध्ये अज्ञानाची पद्धत अवलंबणारे आणि तृतीय निरपराधाची हत्या करणारे." (हदीस : बुखारी-१६९७)

६) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, "लवकरच असे होईल की तुमच्यात प्रमुखत्वाची लालसा निर्माण होईल, मात्र अंतिम निवाड्याच्या दिवशी यामुळे पश्चात्तापाची पाळी येईल. याची सुरूवात चांगली वाटेल मात्र परिणाम वाईट

असेल.'' (हदीस : बुखारी-१७२५)

७) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जो शासनकर्ता आपल्या रयतेचे वाईट इच्छिणार, तर त्याला स्वर्गप्राप्ती होणार नाही.'' (हदीस : बुखारी-१७२७)

८) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''कोणत्याही शासकाने रागाच्या भरात कोणाचाही न्यायनिवाडा करता कामा नये.'' (हदीस : बुखारी-१७२९)

९) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''नेहमीच भांडण करणारा माणूस अल्लाहच्या दृष्टीत अत्यंत वाईट माणूस होय.'' (हदीस : बुखारी-१७३०)

१०) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तीनजण सोबत असताना दोन माणसांनी आपसात तिसऱ्यास न ऐकू येण्यासारखी कानात कुजबूज करू नये. यामुळे तिसरा माणूस दु:खी होत असतो.'' (हदीस : बुखारी-१७३७)

११) एका प्रश्नकर्त्याने विचारले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! इस्लाममध्ये कोणते कर्म जास्त उत्तम आहे?'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, ''लोकांना जेवू घालणे आणि ओळख असो की नसो, लोकांना सलाम करणे (अर्थात- त्यांच्या शांती व रक्षणाची अल्लाहसमोर प्रार्थना करणे) होय.'' (हदीस : बुखारी-१८०४)

१२) एका व्यक्तीने पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हटले, ''हे अल्लाहचे पैगंबरा! अश्रद्धावंतांसाठी अल्लाहच्या दरबारी प्रार्थना करावी की त्यांच्यावर अल्लाहचा धिक्कार आणि शाप व्हावा.'' यावर पैगंबरांनी उत्तर दिले, ''अल्लाहने मला या जगात दया करण्यासाठी पाठविले, धिक्कारण्यासाठी नव्हे!'' (हदीस : मुस्लिम)

पैगंबर मुहम्मद (स.) यांची कृती आणि वचने अर्थात हदीस, त्यांचे जीवनचरित्र तसेच कुरआनातील आयतींच्या सविस्तर अभ्यासावरून वाचकांनी स्वत:च विचार करावा की इस्लामने शांतता, दया आणि मानवतेच्या अत्युच्च व्यावहारिक आदर्शांची स्थापना केली.

या समस्त जगामध्ये केवळ कुरआनामध्येच ईशसत्याबरोबरच (अर्थात आध्यात्मिक सत्याबरोबरच) व्यावहारिक सत्यदेखील आहे. याच वैशिष्ट्यामुळे मक्का शहरात प्रकट झालेला इस्लाम समस्त जगात विस्तारला, समस्त जगाला आपल्या शांतता व समाधानाच्या शीतल छायेत घेतले. ही वस्तुस्थिती असूनही जर कोणी कुरआनातील या आयतींचा चुकीचा व मनाला वाटेल तसा अर्थ काढला तर यासाठी कुरआन किंवा इस्लाम जबाबदार नाही.

वाचकांच्या हेसुद्धा लक्षात आले असेल की सलमान रश्दी, अनवर शेख आणि तस्लीमा नसरीनसारख्या लेखकांनी पूर्वग्रहाने ग्रस्त होऊनच कुरआनातील आयतींचा संबंध आतंकवादाशी जोडला आहे. यावरून आपोआपच हे सिद्ध होते की इस्लाम धर्माने

कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही प्रसंगी हिंसा करण्याची व आतंकवादाची मुळीच शिकवण दिली नसून उलट हिंसात्मक आणि आतंकवादी कारवायांचा विरोधच केला. त्याचप्रमाणे जिहाद हे आतंकवाद नसून आत्मरक्षणासाठी तसेच शांतता प्रस्थापनेकरिता व आतंकवाद नष्ट करण्यासाठीच आहे.

'इस्लामी आतंकवाद का इतिहास' या पुस्तकात मी हिंदू राजे-रजवाडे आणि मुस्लिम बादशाहांच्या दरम्यान झालेल्या रक्तपाताचा उल्लेख केला होता. त्याबाबतीत आता मला कळून चुकले की हा रक्तपात इस्लामशी संबंधित नसून वैयक्तिक कलहातून झालेला होता. इतिहास साक्षी आहे की युद्धांमध्ये प्रत्येक देशात व लोकसमुदायात असा रक्तपात होतच असतो. अलेक्झांडरपासून ते हिटलरपर्यंतच्या इतिहासाची पाने पूर्णतः रक्ताने माखलेली आहेत. आपल्या भारतातसुद्धा सम्राट अशोकाच्या कलिंग विजयाच्या मोहिमेत एक लाखापेक्षा अधिक लोक ठार झाले होते. मात्र या आतंकवादी कार्यासाठी त्यांचा धर्म दोषी नाही. याचप्रमाणे मुस्लिम शासनकर्त्यांच्या बाबतीतसुद्धा असेच आहे.

सनातन वैदिक धर्म आणि इस्लाम[1]

एकेश्वरत्व सत्यधर्म अर्थात इस्लाम हा सनातन धर्म आहे आणि तो या जगात प्रारंभापासून आहे.

इस्लामचे एकेश्वरत्व विविध देशांमध्ये विविध नावांनी अस्तित्वात होते, प्रतिपादित होते. उदाहरणार्थ, भारतामध्ये हाच (इस्लाम) धर्म सनातन वैदिक धर्माच्या रूपात वेद, उपनिषद, गीतामध्ये अस्तित्वात होता.

काही हिंदू बांधवांना भ्रमवश वाटते की इस्लाम धर्म अरब देशांतून आलेला असून तो हिंदूविरोधी धर्म आहे. सुरूवातीस मलादेखील असेच वाटत होते. मात्र वास्तविक इस्लामचा अभ्यास केल्यावर मला चांगल्याप्रकारे लक्षात आले की इस्लाम अरब देशातून आला नाही आणि केवळ अरबवासीयांसाठीसुद्धा आलेला धर्म नाही. हा धर्म मुळात साक्षात ईश्वराकडूनच आलेला आहे आणि केवळ मुस्लिमांकरिताच आलेला नसून समस्त मानवजातीकरिता आलेला आहे. कुरआनात म्हटले आहे,

"कुरआन अवतरित करण्यात आला आहे, लोकांना सरळमार्ग दाखविण्यासाठी."
(दिव्य कुरआन, २:१८५)

या ठिकाणी 'लोकांना' हा शब्द वापरण्यात आलेला आहे, 'मुस्लिमांना' अगर 'अरबवासीयांना' असा शब्द वापरण्यात आलेला नाही. याचप्रमाणे,

"अत्यंत समृद्धशाली आहे तो ज्याने हा फुरक़ान (निकष) आपल्या दासांवर अवतरला जेणेकरून सर्व जगवासियांसाठी खबरदार करणारा ठरावा."
(दिव्य कुरआन, २५:१)

अर्थातच हा धर्म हिंदूंचा विरोधीसुद्धा नाही. कारण इस्लाम एखाद्या व्यक्तीचा, समुदाय अथवा एखाद्या विशेष धर्माचा विरोध मुळीच करीत नाही. इस्लाम केवळ असत्य आणि वाईट बाबींचा विरोध करतो आणि तेदेखील केवळ सैद्धान्तिक आधारावर. तसेच यामध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी नाही. स्वत: कुरआनातच म्हटले आहे,

"इस्लाममध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी नाही." (दिव्य कुरआन, २:२५६)

"तुम्ही तुमच्या धर्मावर आणि आम्ही आमच्या धर्मावर." (दिव्य कुरआन, १०९:६)

मी पाहिले की इस्लाम धर्मासंबंधी स्वत: हिंदूंना आणि याचप्रमाणे सनातन वैदिक धर्मासंबंधी मुस्लिमांना खरी माहिती नसल्यामुळे हे दोन्ही धर्मिय समुदाय एकमेकांना

१. (टीप- लेखकाची मते आम्ही निपक्षपातीपणे देत आहोत. प्रकाशकाने सहमत असणे आवश्यक नाही.)

एकमेकांविरोधी समजतात. परंतु वास्तविकता ही आहे की इस्लामच्या सर्वांत जवळचा धर्म जर कोणता असेल तर तो 'सनातन वैदिक धर्म' आहे.

आणखीन एक लक्षणीय बाब अशी की वाचकवर्गाने आजच्या प्रचलित हिंदू धर्मास समजण्याची चूक करता कामा नये. कारण 'हिंदू' या नावाचा मुळात कोणताही धर्म नाही. मुळात ही तर आचरणपद्धती आहे. हिंदूंच्या वास्तविक धर्माचे नाव 'सनातन वैदिक धर्म' असे आहे. मात्र दुर्दैव असे की बहुसंख्य हिंदू आज आपला वास्तविक धर्म अर्थात सनातन वैदिक धर्म जवळपास विसरून गेले असून सत्याचा मार्ग भटकले आहेत.

भारतात जवळपास ७५ कोटी हिंदू आणि जवळपास २५ कोटी मुस्लिम सोबत राहत आहेत. जर आपण एकमेकांचा धर्म आणि विचार समजून घेण्याचा प्रयत्न करणार नाही तर मानवताविरोधी तत्त्व, समाजविघातक घटक सहजगतीने आपल्या दरम्यान भ्रम, संदेह आणि अविश्वास निर्माण करतील, जसे आजकाल होत आहे. या देशाकरिता ही एक गंभीर समस्या आहे.

म्हणून आज या गोष्टीची नितांत गरज आहे की मुस्लिम बांधवांच्या इस्लाम धर्मास हिंदू बांधवांनी समजून घेण्याचा प्रयत्न करावा आणि याचप्रमाणे सनातन वैदिक धर्म अर्थात वेद, उपनिषद आणि गीता यासारख्या ग्रंथांस मुस्लिम बांधवांनी समजून घेण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून धर्माच्या नावावर कोणीही समाजविघातक घटक पसरविता कामा नये. ही एक तत्त्वपूर्ण गोष्ट आहे. याच तत्त्वपूर्ण गोष्टीमुळे सत्य समोर येईल आणि भ्रम व अविश्वासाचे प्रदूषित वातावरण नष्ट होईल. हिंदू-मुस्लिमांदरम्यान एकमेकांप्रति विश्वास निर्माण होईल. सत्याप्रतिसुद्धा विश्वास वाढेल आणि हाच विश्वास भविष्यात जनतेकरिता नवीन मार्ग उपलब्ध करून देईल. ही कुरआनचीदेखील तत्त्वपूर्ण शिकवण आहे,

"या, एका अशा बाबीकडे जी आमच्या आणि तुमच्या दरम्यान समान आहे, हे की आपण अल्लाहशिवाय कोणाचीही भक्ती करू नये." (दिव्य कुरआन, ३:६४)

कुरआनच्या या तत्त्वपूर्ण शिकवणीनुसार आपण पाहू या की सनातन वैदिक धर्म आणि इस्लाम धर्मात कोणते साम्य आहे.

सनातन वैदिक धर्म आणि इस्लाममधील आश्चर्यकारक साम्य

वास्तविक इस्लामचा अभ्यास करण्यासाठी मी परत एकदा कुरआनाचा अभ्यास करण्यास सुरूवात केली आणि मी अक्षरश: आश्चर्याच्या खोल सागरात बुडालो. कारण यात मला तेच सत्य आढळून आले, जे सहस्रावधी वर्षांपूर्वीपासून आपल्याकडे वेद, उपनिषद आणि गीतेत आहे. अशा प्रकारे इस्लामविषयी माझ्या अंत:करणात आपलेपणाची भावना निर्माण झाली.

उदा.- कुरआनाचा प्रारंभ ''बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम'' अर्थात- 'परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने' करण्यात आलेला आहे. हे वाचत असतानाच मला 'ॐ' आठवले. कारण 'ॐ'चा अर्थसुद्धा 'परम दयाळू व परम कृपाळू ईश्वराच्या नावानेच' प्रत्येक मंत्राची सुरूवात करतो. हाच अर्थ 'बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम'चा होतो.

इस्लामचा आधार आणि सनातन वैदिक धर्माचा आधारसुद्धा एकच आहे.

''ला इलाहा इल्लल्लाह'' (अल्लाहशिवाय कोणीही पूज्य नाही) सनातन वैदिक धर्माचा आधारसुद्धा हाच आहे. आश्चर्याची बाब अशी की जगातील सर्वांत प्राचीन धर्माच्या ग्रंथात म्हणजे ऋग्वेदातसुद्धा ''ला इलाहा इल्लल्लाह'' आहे. ऋग्वेद मंडल सूक्तांच्या सातव्या क्रमांकाचे मंत्र असे आहे,

''इन्द्रं वो विश्वतस्परि हवामहे जनेभ्य:। अस्माकमस्तु केवल:।।

(ऋग्वेद : मंडल १, सूक्त - ७, मंत्र - १०)

भावार्थ- हे लोकहो! माझ्याशिवाय इतर कोणासही पूज्य स्वीकारता कामा नये. कारण माझ्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही. (हिंदी भाष्य - महर्षी दयानंद स्वामी)

या ठिकाणी एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते आणि ती अशी की वेदामध्ये शुद्ध एकेश्वरत्वाचीच शिकवण देण्यात आलेली आहे. वेदांची भाषा ही संस्कृत भाषेच्या व्याकरणापासून पूर्णत: मुक्त आहे. यामुळेच लोक आपापल्या परिने यातील मंत्रांचा अर्थ पाहिजे तसा दाखविण्याचा प्रयत्न करतात. स्वामी दयानंद सरस्वती हे वैदिक संस्कृत भाषेचे महान विद्वान होत. ते एक एकेश्वरवादी धर्मपंडित होत. ते केवळ वेदांवरच श्रद्धा ठेवीत आणि वेदांच्याच शिकवणी श्रेष्ठ समजत. म्हणून या ग्रंथातील वेद मंत्रांचा हिंदी अनुवाद मी स्वामी दयानंद सरस्वतींनी केलेल्या अनुवादावरून घेतला, कारण तोच अनुवाद खरा आहे. स्वामी दयानंदांच्या हिंदी अनुवादाचा संदर्भ घेण्याचे आणखीन एक कारण असे की (हे मी मागेही सांगितले आहे) स्वामीजींनी त्यांच्या 'सत्यार्थ प्रकाश' या

पुस्तकात इस्लामसंबंधी जे काही लिहिले आहे, ते वाचून बऱ्यांचजणांना इस्लामविषयी बऱ्यांच गैरसमजुतींना बळी पडावे लागले, यासाठीच मी मुद्दाम वैदिक मंत्रांचा अर्थ तोच घेतला जो स्वामीजींनी सांगितला, जेणेकरून 'सत्यार्थ प्रकाश' वाचून लोकांना गैरसमजूत होऊ नये अथवा ज्यांना गैरसमजूत झाली त्यांना सत्य लक्षात यावे.

यानंतर आपण गीतेकडे वळू या.

"मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनञ्जय।" (गीता : अध्याय - ७, श्लोक - ७)

भावार्थ- हे धनंजया! माझ्याव्यतिरिक्त (ईश्वराव्यतिरिक्त) इतर दुसरा कोणीही ईश्वर नाही.

या ठिकाणीदेखील हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की श्रीमद भगवत गीतेतसुद्धा ईश्वराचेच संदेश वा शिकवणी आहेत. हे संदेश देणारे श्री कृष्ण एक महान योगी पुरुष होते. म्हणूनच त्यांना योगीपुरुष असेही म्हटले जाते. ईश्वरी योग साधून ईश्वराचा संदेश प्राप्त करीत.

इस्लामच्या नियमानुसार अल्लाह म्हणजेच ईश्वराव्यतिरिक्त इतर दुसऱ्याची पूजा वा बंदगी करणे 'शिर्क' अर्थात अनेकेश्वरत्व आहे. इस्लामच्या दृष्टिकोनात हे सर्वांत मोठे पाप आहे. विशेष बाब म्हणजे इस्लामप्रमाणेच सनातन वैदिक धर्मसुद्धा 'शिर्क' अर्थात अनेकेश्वरत्वाचा वा मूर्तिपूजेचा कट्टर विरोधक आहे. श्रीमद भगवत गीतेत आहे की श्रीकृष्ण अर्जुनास ईश्वराचा संदेश देताना म्हणतो,

"कामैस्तेस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽ न्यदेवताः।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया।।"

(गीता : अध्याय - ७, श्लोक - २०)

भावार्थ- काम आणि भोगविलासाच्या मागे धावल्यामुळे ज्ञान हरवून बसलेले लोक आपल्या व्यसन आणि इच्छांना बळी पडून (ईश्वराव्यतिरिक्त) दुसऱ्या देवतांची पूजा वेगवेगळ्या पद्धतीने करतात.

गीतामध्येच आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम्।
देवान्देवजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि।।"

(गीता : अध्याय - ७, श्लोक - २३)

भावार्थ- मात्र ईश्वराशिवाय इतर देवतांना पूजणारे हे या विवेकशून्य लोकांचे फळ (अर्थात- भौतिक सुखवस्तु) क्षणभंगूर आहेत. (आणि ते) देवतांना पूजणारे

देवतांकडेच स्वाधीन होतात आणि ईश्वराचे भक्त (ज्यांनी माझ्यासमोर आत्मसमर्पण केले) ते माझ्याच छत्रछायेखाली येतील. अर्थात माझ्या लोकी येतात. म्हणजेच त्यांचे जीवन सार्थ आणि यशस्वी होते.

आणखीन एके ठिकाणी आहे,

"तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत। तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्स्पसि शाश्वतम।।" (गीता : अध्याय - १८, श्लोक - ६२)

भावार्थ- (आणि म्हणून) हे अर्जुना! (तू) पूर्णपणे या ईश्वराच्या अभय-छत्रछायेत जा, या ईश्वराच्या कृपेने (तू) स्थायी समाधान आणि सनातन परमधाम अर्थात मुक्ती प्राप्त करशील.

इस्लाम धर्मात नमाज अदा करणे म्हणजे अगदी शुद्ध अंत:करणाने एकाच ईश्वराची नि:स्वार्थ उपासना आहे. भौतिकवाद, चंगळवाद आणि भौतिक सुखसाधनांच्या प्राप्तीसाठी ईश्वराची पूजा करण्याची कल्पनासुद्धा इस्लाममध्ये नाही. म्हणून गीतेच्या उपरोक्त शिकवणीनुसार अशी उपासना करणारे मुस्लिम केवळ मोक्षप्राप्ती आणि जीवनाचे सार्थक करतात.

कुरआनात आहे,

"आणि अल्लाहला (ईश्वराला) सोडून अशा कोणत्याही अस्तित्वाचा धावा करून नकोस जो तुला फायदाही पोहचवू शकत नाही आणि नुकसानही नाही. जर तू असे करशील तर अत्याचाऱ्यांपैकी बनशील." (दिव्य कुरआन, १०:१०६)

कुरआनात अल्लाहने पुढे म्हटले आहे,

"लोकांकरिता वासनाप्रिय गोष्टी,– स्त्रिया, संतती, सोन्या-चांदीचे ढीग, निवडक घोडे, पशू आणि शेतजमिनी– अत्यंत मोहक बनविल्या गेल्या आहेत, पण या सर्व वस्तू तर क्षणिक ऐहिक जीवनाची सामग्री आहे. खरे पाहता जे सर्वोत्तम ठिकाण आहे, ते अल्लाहजवळ (ईश्वराजवळ) आहे." (दिव्य कुरआन, ३:१४)

याच्याच पुढे म्हटले आहे,

"त्यांना सांगा! यापेक्षा अधिक चांगली वस्तू काय आहे, ते सांगू? जे लोक अल्लाहच्या कोपाचे भय बाळगून वागतील, त्यांच्यासाठी त्यांच्या पालनकर्त्याजवळ उद्याने आहेत ज्यांच्याखालून कालवे वाहत असतील, तेथे त्यांना चिरकालीन जीवन प्राप्त होईल. पवित्र पत्नीं त्यांच्या सोबती असतील आणि त्या अल्लाहच्या प्रसन्नतेने मान्यवर होतील. अल्लाह आपल्या दासांच्या वागणुकीवर देखरेख ठेवतो." (दिव्य कुरआन, ३:१५)

आणि पुढे म्हटले आहे,

"हे ते लोक आहेत जे म्हणतात की, "हे स्वामी, आम्ही श्रद्धा ठेवतो. आमच्या अपराधांबद्दल क्षमा कर आणि आम्हाला नरकाग्नीपासून वाचव." हे लोक संयमी आहेत, सत्यनिष्ठ आहेत, आज्ञाधारक व दानशूर आहेत, आणि रात्रीच्या अंतिम प्रहरी अल्लाहजवळ क्षमायाचना करीत असतात." (दिव्य कुरआन, ३:१६-१७)

"ही मालमत्ता व ही संतती केवळ ऐहिक जीवनाची हंगामी शोभा आहे. वास्तविक बाकी राहणारी सत्कृत्येच तुझ्या पालनकर्त्याजवळ परिणामाच्या दृष्टीने उत्तम आहेत आणि त्यांच्यापासूनच चांगल्या आशा निगडित केल्या जाऊ शकतात."

(दिव्य कुरआन, १८:४६)

इस्लामनुसार अल्लाहने अर्थात ईश्वरानेच या सृष्टीची निर्मिती केली. तोच पालनकर्ता, पोशिंदा आणि तोच कयामत आणणारा आहे. इस्लामने सांगितलेली हीच वास्तविकता वेदांमध्येदेखील तंतोतंत आढळते.

ऋग्वेदात स्पष्टपणे म्हटले आहे,

"परि धमानि यानि त्वं सोमासि विश्वतः। पवमान ऋतुभि कवे॥"

(ऋग्वेद : मंडल ९, सूक्त - ६६, मंत्र ३)

भावार्थ- परमात्मा हा उत्पत्ती, स्थती आणि प्रलय (म्हणजे कयामत) या तिन्ही प्रकारच्या क्रियांचा हेतू आहे. अर्थात त्याच्यामुळेच विश्वाची उत्पत्ती आणि त्यातच स्थती व त्यानेच प्रलय होतो. (हिंदी भाष्य महर्षि दयानंद)

ऋग्वेदात आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"त्वं द्यां च महिव्रत पृथ्विवीं चाति उभ्रिषे। प्रति द्रापिममुञ्चथाः पवमान महित्वना॥"

(ऋग्वेद : मंडल ९, सूक्त - १००, मंत - ९)

भावार्थ- ईश्वराने भूलोक आणि पृथ्वीलोकास ऐश्वर्यशाली बनवून त्यास आपल्या रक्षणरूपी कवचाने अच्छादित केले, अशा विचित्र रचनेने या अनंत ब्रह्मांडाची रचना केली आहे की त्याच्या महत्त्वापर्यंत कोणी पोचू शकत नाही." (हिंदी भाष्य महर्षि दयानंद)

आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"योः न पिता जनिता यो विधाता धामानि वेद भुवनानि विश्वा।

यो देवानां नामधा एक एव सम्प्रश्नं भुवना यन्त्यना॥"

(ऋग्वेद : मंडल - १०, सूक्त - ८२, मंत्र - ३)

भावार्थ- जो ईश्वर आपला पालनकर्ता, पोशिंदा आहे, आपला निर्माता आणि या

सर्वच सृष्टीचा निर्माता आहे आणि समस्त ठिकाणे व वस्तुंचा ज्ञाता आहे, तसेच समस्त वस्तुंना संज्ञा प्रदान करणारा आहे, तोच अप्रतिम आहे, एकमेव आहे. समस्त समस्यांचे तोच एकमेव समाधान आहे. (हिंदी भाष्य महर्षि दयानंद)

याचप्रमाणे गीतेत म्हटले आहे,

"अहं कृत्सनस्य जगत: प्रभव: प्रलयस्तथा।"

(गीता : अध्याय - ७, श्लोक - ६)

भावार्थ- मीच (ईश्वर) या समस्त ब्रह्मांडाचा प्रारंभ आणि प्रलयाचा मूळ कर्ता आहे.

यजुर्वेदात म्हटले आहे,

"अपा पृष्ठमसि योनिरग्ने समुद्रमभित: पिन्वमानम्।

वर्धमानो महाँ ऽ आ च पुष्करे दिवो मात्रया वरिम्णा प्रथस्व॥"

(यजुर्वेद : अध्याय - १३, मंत्र - २)

भावार्थ- मानवांना जे सत्, चित्त आणि आनंद प्राप्त आहे, अशा पूर्ण ब्रह्मांडाचा निर्माता, प्रत्येक ठिकाणी उपस्थित, सर्वश्रेष्ठ आणि प्रभुत्ववान, सामर्थ्यशाली असलेल्या ब्रह्माच्या उपासनेने परिपूर्ण ज्ञान वगैरे असीम वैशिष्ट्ये प्राप्त होत असतात, याचा उपयोग का करू नये! (हिंदी भाष्य महर्षि दयानंद)

इस्लाम धर्मानुसार केवळ एकमात्र ईश्वर, ज्यास कोणीही जन्म दिला नाही, जो अविनाशी आहे, ज्याचे कोणतेही स्वरूप नाही आणि प्रभू एकमेव आहे, तो जन्मही घेत नाही आणि मृत्यूही पावत नाही. अगदी इस्लाम धर्माप्रमाणेच वेदांची शिकवणसुद्धा अशीच आहे. श्वेतासूत्र उपनिषदाच्या सहाव्या अध्यायातील आठव्या श्लोकात म्हटले आहे,

"न तस्य कार्यं करणं च विद्यते।"

भावार्थ- यास (ईश्वरास) शरीर आणि अवयव नसून तो निराकारी आहे. अर्थात तो अन्न-पाणी आणि इतर कोणत्याही प्रकारच्या गरजांपासून पूर्णत: निस्पृह आहे.

कुन्टु उपनिषदाच्या प्रथम खंडातील सहाव्या श्लोकात म्हटले आहे,

"यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षू षि पश्यति।

नदेव ब्रह्म त्वं विद्धि ने दं यदिदमुपासते॥"

भावार्थ- ज्यास कोणत्याही प्रकारे डोळ्यांनी पाहता येणे शक्य नाही, उलट ज्याच्या मदतीने आपल्या डोळ्यांना पाहण्याचे सामर्थ्य प्राप्त होते, यालाच तू ईश्वर

स्वीकार कर. आपल्या (ईशप्रदत्त असलेल्या) डोळ्यांनी दिसणाऱ्या ज्या विविध वस्तूंना ईश्वर समजून लोक त्या वस्तूंची पूजा करतात, त्या वस्तू (मुळीच) ईश्वर नाहीत.

श्वेतासूत्र उपनिषदाच्या सहाव्या अध्यायातील नवव्या श्लोकात आहे,

''न तस्य कश्चित्पतिरस्ति लोके न चेशिता नैव च वस्य लिङ्गम्।

स कारणं करणाधिपाधिपो न चास्य कश्चिज्जबिता न चाधपः।।''

भावार्थ- या समस्त ब्रह्मांडात त्याचा (ईश्वराचा) कोणीही स्वामी वा प्रभु नाही, कोणीही त्याचा शासक वा आदेशदाताही नाही. त्यास जन्म देणारा अगर स्वामी कोणीही मुळीच नाही.

या ठिकाणी या बाबीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो की इस्लाम धर्माचा जगत्विख्यात नारा ''अल्लाहु अकबर'' असून याचा स्पष्ट अर्थ असा आहे की 'अल्लाहच महान आहे.' 'अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे.' अर्थात- ईश्वरापेक्षा कोणीही महान नाही. हीच परिपूर्ण व सर्वस्वीकृत वास्तविकता आहे, हे सत्य तेव्हासुद्धा होते जेव्हा जग नव्हते, हे सत्य आजही आहे आणि जग अस्तित्वात असेपर्यंत हे सत्य असणार. सनातन वैदिक धर्माचादेखील हाच मूळ आहे की 'पूर्णस्य पूर्ण मादाय पूर्णमेवावशिष्यते।' अर्थात- या शाश्वत आणि अविनाशी पूर्णत्वातून पूर्णत्वास वजा केल्यावरसुद्धा पूर्णत्वच बाकी राहते. (म्हणजे अल्लाह हा अनंत आहे. कारण केवळ अनंतातून अनंत काढल्यास अनंत बाकी राहते.)

श्वेतासूत्र उपनिषदाच्या सहाव्या अध्यायातील आठव्या श्लोकामध्ये इस्लामचा नारा ''अल्लाहु अकबर'' (अल्लाह महान आहे) अशा शब्दांत आहे, 'न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते।' अर्थात- ईश्वरासम आणि यापेक्षा किंचित जास्तदेखील कोणीही नाही. म्हणजे केवळ ईश्वर सर्वांत महान आहे. तो अद्वितीय आहे.

श्वेतासूत्र उपनिषदाच्या चौथ्या अध्यातील एकोणिसाव्या श्लोकात म्हटले आहे,

''नैनमूर्ध्व न तिर्यञ्चं नमध्ये परिजग्रभत्।

न तस्य प्रतिमा अस्ति यस्य नाम महद्यशः।।''

भावार्थ- (ईश्वर इतका महान आहे की) त्यास वरून, इकडून-तिकडून अथवा दरम्यानमधून कोणीही स्पर्श करू शकत नाही. ज्याचे नाव अत्यंत महान आहे, अर्थात जो सर्वश्रेष्ठ आहे, अशा त्या ईश्वराच्या समान कोणीही नाही. त्याचा कोणताही अवतार नाही, कोणतीही मूर्ती नाही आणि प्रतिमादेखील नाही.

सनातन वैदिक धर्माची विशेष श्रद्धा वा विचारसरणी अशी आहे की,

"ईश्वर (अल्लाह) हा अजन्मलेला, अविनाशी आहे. एकमेव प्रभुत्ववान व सामर्थ्यशाली आहे. त्याच्यासारखा केवळ तोच आहे. त्याच्यासम कोणीही नाही. त्याची कोणीही संतती नाही, कोणीही त्याची कोणतीही माता नाही व त्याचा कोणीही पिता नाही, भाऊसुद्धा नाही वा बहीणही नाही आणि पत्नीही नाही."

विशेष म्हणजे इस्लामचीदेखील हीच मूळ शिकवण आहे.

"तो तर आकाशांचा व पृथ्वीचा आविष्कारक आहे, त्याची कोणी संतती कशी असू शकेल? ज्याअर्थी त्याची कोणीही जीवनसाथी नाही? त्याने प्रत्येक वस्तू निर्माण केली आहे व त्याला प्रत्येक वस्तूचे ज्ञान आहे." (दिव्य कुरआन, ६:१०१)

"यहुदी म्हणतात की 'उजैर' अल्लाहचा पुत्र आहे, आणि 'इसाई' म्हणतात की मसीह (येशू) अल्लाहचा पुत्र आहे. या अवास्तव गोष्टी आहेत ज्या ते आपल्या तोंडातून काढतात, हे त्या लोकांचे अंधानुकरण आहे, जे त्यांच्यापूर्वी इन्कार करण्यामध्ये गुरफटले होते. अल्लाहचा कोप त्यांच्यावर. कोठून हे बहकविले जात आहेत."

(दिव्य कुरआन, ९:३०)

गीतेतील प्रसिद्ध श्लोक

"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।" (गीता : अध्याय-२, श्लोक-४७)

भावार्थ- केवळ कर्म करणेच तुझ्या अखत्यारीत असून त्याच्या फलप्राप्तीत नाही.

उपरोक्त श्लोकाचे खरे स्वरूप मला इस्लाममध्येच पाहावयास मिळाले. कारण इस्लामचे अनुयायी खऱ्या अर्थाने प्रत्यक्षरित्या नफा-तोटा, जीवन-मृत्यू, मान-अपमान वगैरे सर्वकाही ईश्वराची मर्जी व इच्छा समजून आनंदाने स्वीकारतो. ते प्रत्येक कार्याप्रसंगी 'इन्शा अल्लाह' असे म्हणतात, अर्थात 'ईश्वराची इच्छा असेल तर' काम होईल. या ठिकाणी कदाचित वाचकांच्या लक्षात आलेही असेल की जेव्हा एखादा मुस्लिम एखादे भले काम अगर पुण्यकर्म करीत असतो, तेव्हा तो हाच विचार करतो की हे काम त्याने केले नसून ईश्वरानेच केले अथवा ईश्वरामुळेच घडले. यामुळे स्वतःच्या पुण्याईवर त्यास गर्व चढत नाही. शिवाय आपल्या पुण्याईचा मोबदलादेखील इच्छित नाही. हा इस्लामच जो एका मनुष्याला व्यावहारिक रूपाने निष्काम कर्मयोगी बनवितो. गीतेमध्ये हेच सांगितले आहे की 'निष्काम सेवा' हेच सर्वश्रेष्ठ असून याउलट 'सकाम सेवा' अत्यंत खालच्या दर्जाचे पुण्य आहे. केवळ इस्लामच एकमात्र धर्म आहे ज्यात ईश्वराची सकाम उपासना मुळीच होत नाही. तिथे फक्त निष्काम उपासनाच आहे.

उदाहरणार्थ, कुरआनची सुरूवातच ईशस्तवनाने होते. ईशस्त्वनात स्वतःकरिता कोणत्याही भौतिक आमिषाचा वा स्वार्थाचा लवलेशसुद्धा नाही. यात ईश्वराचा भक्त ईश्वराकडून धन-दौलत आणि सुखसाधनांची मागणी करीत नाही, तर हे अगदी निष्काम भावाने ईश्वराचे स्तवन करणे होय. ईश्वराची भक्ती आणि पूजा करणे होय. एक मुस्लिम अगदी न चुकता दिवसातून पाच वेळा अत्यंत श्रद्धापूर्वक व अत्यंत आस्थापूर्ण ईश्वरोपासना (नमाज) निष्काम भावाने करतो, ईश्वराप्रति हे केवळ इस्लाम धर्माचे वैशिष्ट्य आहे की या धर्माने मानवास ईश्वराप्रति पूर्णतः समर्पित केले. निष्काम भावाने असे समर्पण इतरत्र कुठेच नाही. अशा आत्मसमर्पित भक्ताविषयी गीतेमध्ये ईश्वराचा हा संदेश आहे,

"अनन्यश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥

(गीता : अध्याय - ९, श्लोक - २२)

भावार्थ- जे निष्काम भावी आणि माझ्याप्रति अपार प्रेम असलेले माझे भक्त माझे नेहमी स्मरण करतात, या दररोज नेहमी भक्ती करणाऱ्यांच्या मी मागण्या पूर्ण करतो.

अर्थात ईश्वराच्या स्वाधीन झालेला व आत्मसमर्पित निष्कामभावी भक्तच आत्मसमाधान

आणि मोक्ष प्राप्त करू शकतो.

गीतेतच आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

“शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्यामधिगच्छति।।”

(गीता : अध्याय - ६, श्लोक - १५)

भावार्थ- असा ईश्वराप्रति आत्मसमर्पित भक्तच उच्चतम शांती प्राप्त करतो.

याचप्रमाणे कुरआनातील सूरह क्र. २ च्या आयत क्र. ११२ मध्ये ईश्वराने वचन दिले आहे,

“सत्य हे आहे की जो कोणी अल्लाहच्या आज्ञापालनामध्ये स्वत:ला समर्पित करील आणि सद्वर्तनी असेल त्याच्यासाठी त्याच्या पालनकर्त्याजवळ त्याचा मोबदला आहे आणि अशा लोकांना न कोणते भय असेल न ते कधी शोक करतील.”

तसेच आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

“आम्ही अगदी स्पष्ट वस्तुस्थिती दर्शविणारी वचने अवतरली आहेत. पुढे सरळ मार्गाकडे मार्गदर्शन अल्लाहच ज्याला इच्छितो त्याला करतो.” (दिव्य कुरआन, २४:४६)

सनातन वैदिक धर्म अर्थात वेद, उपनिषद आणि गीतेच्या शिकवणीवरून हे सिद्ध होते की शारीरिक, आत्मिक आणि भौतिक तसेच हरप्रकारे शांती व समाधान प्राप्त करण्याचा आणि मोक्षप्राप्ती करण्याचा सरळ व सुलभ मार्ग “ला इलाहा इल्लल्लाह” (अल्लाहशिवाय कोणीही ईश्वर नाही) म्हणजे इस्लाम आहे.

इस्लामने स्पष्ट केले आहे की मृत्यूनंतर अर्थात अंतिम निवाड्याच्या दिवशी प्रत्येक मानवास जिवंत करण्यात येईल ही एक बुद्धिसंगत वस्तुस्थिती आहे, कारण मानवी आत्मा हा आपल्या कर्मांच्या परिणामस्वरूपी प्राप्त होणाऱ्या स्वर्गातील सुख-समाधान अथवा नरकाग्नीतील यातनांची जाणीव केवळ अशा वेळीच करू शकतो जेव्हा त्यास मूळ शरीर प्राप्त होईल.

अशा प्रकारे अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सादर केलेला धर्म अर्थात इस्लाम धर्म हा काही नवीन वा वेगळा धर्म तर नाहीच नाही, मात्र निश्चितच इस्लाम धर्म हा कालानुरूप संशोधित सत्य धर्म होय.

उपरोक्त प्रमाण व पुराव्यानुसार एकेश्वरत्वाच्या (तौहीद) आधारावर इस्लामशी जवळीक असणारा धर्म हा सनातन वैदिक धर्म आहे, हे निश्चित! शिवाय खरी गोष्ट अशी की इस्लाममध्ये एकेश्वरत्वाप्रति ज्याप्रकारे श्रद्धा व ईश्वराला आत्मसमर्पण करण्याची भावना आहे, ती इतरत्र कोणत्याही धर्मात नाही. आणखीन एक विशेष बाब

अशी की इस्लाममध्ये या गोष्टीचासुद्धा पुरेपूर बंदोबस्त करण्यात आलेला आहे की, एकेश्वरत्व आणि कुरआनच्या आयती आपल्या मूळ स्वरूपात सुरक्षित असाव्यात आणि अशा प्रकारचा बंदोबस्त इस्लामव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्मात नाही.

मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की मला हे कळून चुकले की इस्लामचा स्वीकार करणाऱ्यांच्या अंत:करणात ईश्वराप्रति जी आदरयुक्त भीती असते ती इतर धर्मियांत दिसत नाही. याच वैशिष्ट्यांच्या आधारावर इस्लाम हाच सर्वश्रेष्ठ धर्म होय.

दुर्दैवाची बाब अशी आहे की एकेश्वरत्वाची ही वास्तविकता स्पष्ट करणारा सनातन वैदिक धर्म आज केवळ ग्रंथांच्याच चौकटीत कैद झालेला आहे. एकेश्वरत्व म्हणजे एकाच ईश्वराची पूजा करण्याचा पुरस्कार करणारी वास्तविकता आज मूर्तिपूजा, अनेकेश्वरत्व व विविध देवीदेवतांच्या पूजाअर्चेने दूषित होऊन बसली आहे. आजही येथे नवनवीन देवता, ईश्वराचे नवनवीन अवतार समोर येत आहेत. वस्तुस्थिती एवढी विकोपाला गेली आहे की एखाद्या चित्रपट किंवा टी.व्ही.मध्ये एखाद्या व्यक्तीने ईशावताराची भूमिका केली की लोक त्याचीसुद्धा पूजा करायला लागतात, त्याच्या महिमत्वाचा प्रचार करू लागतात, एवढेच नव्हे तर यातील बरेच स्वत:ला ईश्वर म्हणूनच मिरविताना दिसत आहेत आणि जनतासुद्धा त्यांच्या मागे वेड्यासारखी धावत सुटली आहे. दुर्दैव आणि दु:खाची बाब अशी की असत्य आणि खोटारडेपणाचा जेवढा बोलबाला व विजय आपल्याकडे आहे, तेवढा या जगाच्या पाठीवर इतरत्र कोठेही नाही. ईश्वर सर्वांनाच सद्‌बुद्धी देवो! असे वाटते की लोकांनी आपली बुद्धी व विवेक कोठेतरी गहाण ठेवले आहे.

बांधवानो! जरा गंभीरपणे विचार करा!

या मार्गभ्रष्ट आणि बुद्धी हरवून बसलेल्या लोकांनी या गोष्टीकडे एकदाचे अवश्य लक्ष द्यावे की ज्या धरतीच्या पाठीवर आपण राहतो, ती धरती सूर्याच्या (जो एक तारा आहे) कक्षेत भ्रमण करणारा एक ग्रह आहे. सूर्यमंडलात भ्रमण करणारे बरेच ग्रह आहेत. त्याचप्रमाणे या ग्रहांच्या भ्रमणकक्षेतदेखील कित्येक उपग्रह आहेत. उदाहरणार्थ, आपल्या पृथ्वीभोवती फिरणारा उपग्रह हा चंद्र आहे. सूर्यमालेतील काही ग्रह आपल्या पृथ्वीपेक्षा लहानही आहेत आणि आपल्या पृथ्वीपेक्षा हजारो पटीने मोठे असलेले गुरूसारखेही ग्रह आहेत. सूर्य आणि सूर्यमालेतील या ग्रह-उपग्रहांदरम्यान म्हणजेच या अफाट सौरमंडलात आपण राहत असलेल्या या पृथ्वीचे अस्तित्व खूप लहान आहे.

हा सूर्य आकाशगंगेतील एक तारा असून या आकाशगंगेत जवळपास २०,००० कोटी तारे (अर्थात सूर्य) आहेत. त्यातील बरेच तारे आपल्या सूर्यापेक्षाही हजारो पटीने मोठे व चमकदार आहेत.

ब्रह्मांडामध्ये या आकाशगंगेसारख्या लक्षावधी अशा आकाशगंगा आहेत, ज्यांत या आकाशगंगेपेक्षा लक्षावधी पटीने जास्त तारे (सूर्य) आहेत. ताऱ्यांमधील अंतर इतके दीर्घ असते की ते किलोमीटर अथवा मैल यासारख्या प्रमाणात मोजता येणे शक्य नसल्यामुळे प्रकाशवर्ष या एककात मोजण्यात येते. आपल्या या पृथ्वीपासून आकाशगंगेतील अधिकतम अंतर तब्बल १३२० कोटी प्रकाशवर्ष इतके आढळले आहे.

हे अंतर किती जास्त आहे, याचा अनुमान यावरून लावता येईल की प्रकाशाचा वेग तीन लाख किलोमीटर प्रतिसेकंद इतका असतो. या प्रमाणानुसार एका तासात १०८ कोटी किलोमीटर प्रकाशाची गती असते. ही गती आजकालच्या विमानाच्या अधिकतम गतीपेक्षा (१५०० किलोमीटर प्रति तास) सात लाख २० हजार पटीने जास्त आणि रॉकेटच्या अधिकतम गतीपेक्षा (३० हजार किलोमीटर प्रति तास) ३६ हजार पटीने जास्त आहे.

इतक्या असामान्य गतीने प्रकाश एका वर्षात नऊ लाख ४६ हजार ८० कोटी किलोमीटर अंतर कापतो. अर्थातच नऊ लाख ४६ हजार ८० कोटी किलोमीटरच्या अंतरास एक प्रकाशवर्ष एवढे अंतर असे म्हणतात.

हे अंतर केवळ आपल्या आकाशगंगेपुरते मोजता येण्याइतपत आहे. मात्र हे ब्रह्मांड तर सर्वत्र विस्तारित असून त्याची लांबी अथवा अंतर मोजणे अद्यापही शक्य झालेले नाही. आज खगोलशास्त्रज्ञांनी हे मान्य केलेले आहे की ब्रह्मांडाच्या विस्तार आणि विशालतेचा जो शोध लागला, तो अंतिम नसून या वास्तविक ब्रह्मांडापेक्षा कोट्यवधी

ब्रह्मांड वास्तविक ब्रह्मांडात सामावले जाऊ शकतात. एकूणरित्या आजच्या ज्ञान-विज्ञान आणि संशोधनशास्त्रानुसार अल्लाहची (ईश्वराची) ही रचना अनंत असून मानवी बुद्धीकक्षेच्या बाहेर आहे, हे निश्चितच मान्य करावे लागेल.

जर आपण ईश्वराद्वारे निर्मित या ब्रह्मांड आणि त्यातील जीव-जंतु, वनस्पती आणि निसर्गाची अनुशासित व्यवस्था पाहिली आणि त्यावर गंभीरपणे विचार केला तर ईश्वराचे अमर्याद सामर्थ्य व शक्ती पाहून त्याच्याप्रति श्रद्धेने मन ओथंबून वाहू लागते.

या ठिकाणी पृथ्वीचेच उदाहरण घेऊ या. पृथ्वी आणि यावरील वातावरण हे ईश्वराद्वारे जीवनासाठी निर्माण करण्यात आलेली किती व्यवस्थित आणि सुनियोजित योजना आहे. येथे जीवनासाठी समस्त प्रकारच्या परिस्थिती अनुकूल आणि योजनाबद्ध रीतीने निर्माण करण्यात आली आहे. सूर्यापासून येणाऱ्या विषारी किरणांपासून जीवनाचे रक्षण करण्यासाठी आश्चर्यकारकरित्या 'ओझोन'ची व्यवस्था करण्यात आली आहे. सजीवांच्या उदरनिर्वाहासाठी विविध प्रकारच्या व्यवस्था करण्यात आल्या आहेत. हे सर्वकाही इतके व्यवस्थित आणि योजनाबद्ध आहे की आपण गंभीरतेने विचार जर केला तर आश्चर्याचा जबर धक्काच आपल्याला बसतो. हे सर्वकाही आपोआपच घडले नसून निश्चितच एका जबरदस्त सामर्थ्यशाली निर्मात्याची ही करणी होय.

बळ आणि ऊर्जेशिवाय कोणतेही कार्य होत नाही, हा विज्ञानाचा नियम आहे. या कार्यात ऊर्जा लागली, मग ती गतीच असो की स्थितीज, त्यास बल अथवा शक्ती कोठून मिळाली? जर हे बल पदार्थातील अणुंच्या केंद्रकीय अभिक्रियेपासून (न्युक्लियर रिॲक्शन) मिळत असले तरीही ही अभिक्रिया कशी सुरू झाली? अथवा यासाठी हा पदार्थ कोठून आला? प्रश्नावर प्रश्न उभे केलेत तरी परत तोच प्रश्न उभा राहतो की बियापासून झाड की झाडापासून बी? नास्तिक आणि असत्यवाद्यांकडे याच्या उत्तरादाखल केवळ निराधार प्रकारचा युक्तिवाद असणार.

या अतिविशाल ब्रह्मांडामध्ये सजीव कसे आणि कोठून आले? मनुष्यांसहित पशु-पक्षी आणि कृमी-कीटक सुरूवातीस पृथ्वीवर कसे निर्माण झाले असावेत? त्यांची आश्चर्यकारक आणि विचित्र रचना पाहा- डोळे, कान, नाक व इतर अवयव पाहून यावर धीरगंभीर विचार करा. यावरून असे वाटत नाही काय की जणू हे सर्व एखाद्याच्या नियोजनबद्ध निर्मितीचा उत्कृष्ट नमुना आहे! सृष्टीच्या वृद्धीसाठी कशाप्रकारे सर्व सजीवांत कामभाव अथवा वासना निर्माण करण्यात आली? जर वासना नसती तर सजीव सृष्टीचा वंश चालू राहिलाच नसता. अशा अत्यंत विलक्षण आणि आश्चर्यकारक सृष्टीची रचना ईश्वराव्यतिरिक्त कोणीही करू शकत नाही.

ही तर या अतिविशाल आणि अनंत ब्रह्मांडातील एका कणासारखी असलेल्या पृथ्वीची अवस्था आहे. यापलीकडेही थोडा याकडेही विचार करा की किती व्यवस्थितपणे उपग्रह हे ग्रहाभोवती, ग्रह हे ताऱ्याभोवती, तारा आकाशगंगेभोवती आणि आकाशगंगा या ब्रह्मांडात भ्रमण करीत आहे. जर यांना गती प्रदान करण्यात आली नसती तर यांचे अस्तित्वच नसते.

मग शेवटी यांना कोण गती प्रदान करणारा आहे? काही नास्तिक अथवा अज्ञानी म्हणतील की ब्रह्मांडात झालेल्या प्रचंड विस्फोटामुळे यांना गती मिळाली. असो! मात्र आमचा प्रश्न असा आहे, हा प्रचंड स्फोट होण्यासारखी परिस्थिती कोणी निर्माण केली? मग परत प्रश्नावर प्रश्न! आणि या प्रश्नाचे उत्तर देणे मानवी बुद्धीकक्षेच्या बाहेर आहे.

आज कृत्रिम उपग्रह (सॅटेलाइट) पृथ्वीच्या भ्रमणकक्षेत आपोआप भ्रमण करण्याकरिता स्थापित करण्यात येतो आणि मग तो आपोआप पृथ्वीच्या कक्षेत भ्रमण करीत राहतो. मात्र हे स्थापित करण्यासाठी याची अचूक गणना करण्यात येते की हा उपग्रह रॉकेटच्या साहाय्याने किती किलोमीटर प्रतितासाच्या गतीने अवकाशात फेकण्यात यावे. आता प्रश्न असा आहे की महाविस्फोटापासून अनंत ताऱ्यांच्या निर्मितीचा जो पदार्थ फैलावण्यात आला, त्या सर्वांसाठी वेगवेगळी गणना कशी करण्यात आली असावी आणि शेवटी ही अचूक गणना कोणी केली, जिच्या आधारावर अनंत ताऱ्यांचा तो पदार्थ (ज्यापासून लाखो किलोमीटर व्यास असलेले अनंत विशाल तारे निर्माण झाले आणि अजूनही होत आहेत; वेगवेगळ्या व आपापल्या कक्षेत स्थापित होऊन निश्चित मार्गावर भ्रमण करत आहेत.) मग हे एवढे सर्वकाही आपोआपच कसे काय घडणार? मानवाच्या विवेकतेजवळ याचे उत्तर हेच आहे की हे सर्वकाही आपोआप घडणे शक्य नाही.

ईशग्रंथ कुरआनमध्ये यास वारंवार सर्वशक्तिमान अल्लाहचाच (ईश्वराचाच) चमत्कार असल्याचे म्हटले आहे आणि याचप्रमाणे वेदामध्येदेखील असे म्हटले आहे, हे अनंत ब्रह्मांड त्याच ईश्वराने (अल्लाहने) निर्माण केले, जो अनादी व अनंत आहे.

हे अनंत ब्रह्मांड एक प्रकारचे अनंत असे गूढ रहस्य असून त्याची उत्पत्ती आपोआपच झालेली नाही. कारण आपोआप काहीही घडत नसते. प्रत्येक घटना व प्रत्येक निर्मितीमागे एक कारण अथवा मूळ असते. आणि म्हणूनच या अनंत ब्रह्मांडाच्या निर्मितीचे मूळ त्याच एकमेव ईश्वराशिवाय (अल्लाहशिवाय) इतर कोणीही नाही, हेच समस्त प्रश्नाचे एकमेव व समाधानकारक उत्तर आहे.

हे सर्वकाही सविस्तरपणे सांगण्यामागचा हेतू केवळ एवढाच आहे की, या अनंत ब्रह्मांडाची रचना करणारा, ते व्यवस्थितपणे चालविणारा आणि त्याचा विनाश करणारा

अर्थात इस्लामी परिभाषेत कयामत स्थापन करणारा महान व अत्यंत सामर्थ्यशाली ईश्वर वास्तविक पाहता या पृथ्वीवर जन्म घेऊन, पैसा कमवून, खाऊन पिऊन, आजारी पडून, म्हातारपण येऊन मरणारी एखादी व्यक्ती मुळीच असू शकत नाही, जी या अनंत ब्रह्मांडाच्या तुलनेत अत्यंत क्षुल्लकच नव्हे तर शून्य दर्जाची असते.

तर्कशक्तीनुसार म्हणावयाचे झाल्यास ब्रह्मांडाचा स्वामी परावलंबी मुळीच असू शकत नाही. अनंत ब्रह्मांडाच्या ईश्वरास खाण्याविषयी, कामवासनेची व इतर अशा प्रकारच्या कोणत्याही बाबतीची मुळीच गरज असू शकत नाही. कारण हा महान आणि अपार सामर्थ्यशाली ईश्वर स्वत: प्रत्येक प्रकारच्या सुख व समाधानाचा एकमेव स्रोत आहे. तो निराकार आहे. त्यास कोणत्याही प्रकारची संतती, मूल-बाळ वगैरे काहीही नाही. त्यास मुलगा आहे ना मुलगी! तो जन्मही घेत नाही आणि त्यास मृत्यूदेखील नाही. अर्थातच तो एकमेव आणि नि:स्पृह असून त्याच्यासारखा इतर कोणीही नाही.

हे अनंत ब्रह्मांड निर्माण करणारा ईश्वर (अल्लाह) अजन्मा (जन्म न घेतलेला) असून अविनाशी, सर्वशक्तिमान आणि अनंत असून त्याच्यासारखा इतर कोणीही नाही. हीच बाब वेदांमध्ये अशा शब्दांत स्पष्ट करण्यात आली आहे,

''पूर्णमद: पूर्णमिदं पूर्णात्पूर्ण मुदच्यते।''

भावार्थ- तो ईश्वर पूर्ण आहे आणि त्याची ही रचना वा निर्मिती (ब्रह्मांड) देखील पूर्ण आहे. कारण पूर्णपासूनच पूर्णाची निर्मिती होऊ शकते. (या ठिकाणी पूर्णाचा अर्थ 'अनंत' असा आहे) उपरोक्त मजकुरात ब्रह्मांड हे अनंत असल्याचे आम्ही सिद्ध केलेले आहे. शिवाय अनंत ही अशी एकमात्र पूर्णता आहे जी अनंताची निर्मिती करू शकते.

याचा भावार्थ असा आहे, सर्वशक्तिमान ईश्वर अनंत असून त्याची ही रचना म्हणजेच ब्रह्मांडसुद्धा अनंत आहे. कारण अनंतापासूनच अनंताची निर्मिती शक्य आहे.

इस्लामने सत्याचा नारा 'अल्लाहु अकबर' (अल्लाह सर्वांत महान आहे) आणि 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहशिवाय इतर कोणीही पूज्य नाही) बुलंद केला आणि याच्या माध्यमानेच समस्त मानवजातीस महान सत्याचा संदेश दिला.

यावरून हेच सिद्ध होते की इस्लामने सादर केलेले हे महान सत्य जगात पूर्वीपासून, सदैवपासून व अनंतकाळापासून तसेच जगाची निर्मिती झाल्यापासूनच आहे. दुसऱ्या शब्दांत असे की इस्लाम अनादी व अनंत आहे.

या पुस्तकातील संपूर्ण बाबींच्या निष्कर्षावरून हेच सिद्ध होते की ''इस्लाम आतंक नसून आदर्श आहे!'' आणि म्हणूनच इस्लामचा हा आदर्श स्वीकारण्यायोग्य आहे.

आपणा सर्वांचे कर्तव्य

जसे हे सिद्ध करण्यात आले की इस्लाम केवळ मुस्लिमांकरिता नसून समस्त मानवजातीकरिता आणि समस्त मानवांच्या कल्याणाकरिता आहे. म्हणूनच अशा स्वरूपाच्या शांतताप्रिय आणि मानवकल्याणकारी इस्लामला बदनाम करण्यासाठी आतंकवादास मुस्लिमांशी जोडण्याची एक जबरदस्त सुनियोजित कुटिलनीती व घाणेरडे स्वार्थी राजकारणच आहे. मोबाईलवरून एस.एम.एस. करून प्रचारित करण्यात येत असते की "प्रत्येक मुस्लिम आतंकवादी नाही, मात्र प्रत्येक आतंकवादी हा मुस्लिम आहे!" मात्र मला इथे असे निश्चितच सांगावेसे वाटते की जर फक्त मुस्लिमच आतंकवादी असते तर हैद्राबाद मस्जिदीमध्ये आणि मालेगावच्या ईदगाहमध्ये बॉमबस्फोट करून आतंकवादी हल्ले झालेच नसते.

मुस्लिम मदरसे, धार्मिक व सामाजिक संघटना, तसेच मुस्लिम मौलानांविषयी दुष्प्रचार करण्यात आला की ते आतंकवादाला प्रेरणा देतात. याविषयीचे सत्य जाणण्यासाठी मी जवळपास सर्व सामाजिक व धार्मिक मुस्लिम संघटनांचे अध्ययन केले. परंतु तिथे मला आतंकवादाचा कोणीही समर्थक मिळाला नाही. सांगितले जाते की, मदरशात आतंकवादी निर्माण केले जातात. मदरशात बनविलेल्या या आतंकवादींना शोधण्यासाठी मी लखनौ येथील मदरसा नदवा व इतर मदरशांमध्ये गेलो असता तिथे मला आतंकवादाच्या जागी शांती, अनुशासन, सुसंस्कृतपणा, मानवतेप्रति प्रेम दिसले. काही लोक विचार करतात की मौलाना लोक आतंकवादाचे शिक्षण देतात. याविषयी सत्य जाणून घेण्यासाठी मी अनेक मौलानांना भेटलो. त्यांचे विचार जाणून घेतल्यानंतर मला असे वाटले की, हे इस्लामी विद्वान आतंकवादाचे समर्थक असू शकतच नाही. कारण मानवतेलाच इस्लाम सांगणारे हे लोक आहेत. हा ग्रंथ लिहिण्याअगोदर अनेक विद्वान मौलानांना मी भेटलो. मौलाना सय्यद अबुल हसन नदवी (रह.) (अलीमियां) यांनी स्थापन केलेले 'पयामे इन्सानियत फोरम'द्वारा देशाच्या विभिन्न भागांत सेमिनार आयोजित करण्यात आले. त्यात माणुसकीवर विचार मांडण्यासाठी मला आमंत्रित करण्यात येत होते.

याव्यतिरिक्त देशातील विभिन्न मुस्लिम संघटना व संस्थांनीसुद्धा आपल्या सार्वजनिक कार्यक्रमात मला विचार व्यक्त करण्याची वारंवार संधी दिली. या सर्व प्रसंगी मी अनेक मौलानांना भेटलो. या सर्व विद्वान मौलानांचे साधेपण, सज्जनता आणि माणुसकीविषयी त्यांच्या मनातील उत्कंठेने मला अतिप्रभावित केले. मुस्लिम सामाजिक व धार्मिक संघटना आणि मुस्लिम विद्वानांशी (मौलाना) भेटल्यानंतर मी या निष्कर्षाप्रत आलो, की जनतेमध्ये हेतूपुरस्सर इस्लामला बदनाम करण्याचा कट रचला जात आहे.

आतंकवादावर मुस्लिमांचे विचार जाणून घेण्यासाठी हजारो मुस्लिमांशी मी संपर्क साधला होता. यांच्यापैकी सर्व मुस्लिमांचे शेजारी मुस्लिमेतरांशी बंधुभावाचे व मैत्रीचे संबंध मला दिसून आले. त्यांच्यापैकी कोणीही मुस्लिम इच्छित नाही की निर्दोष लोकांची हत्या केली जावी. मुस्लिमेतर (ज्यांनी मुस्लिमांचे काही वाईट केले नाही) यांच्याशी द्वेष करणारा, आतंकवादाचा समर्थक एकही मुस्लिम मला दिसून आला नाही.

यानंतरसुद्धा एखादा मनुष्य असा असेल तर त्यासाठी सर्व मुस्लिमांना किंवा इस्लामला कोणत्याही प्रकारे दोषी ठरविले जाऊ शकत नाही. तो एक अपवाद आहे आणि अपवाद चहुकडे असतात.

आज आतंकवादाचे दुष्परिणाम आणि भोग मुस्लिम आणि मुस्लिमेतर या दोघांनाही भोगावे लागत आहेत. कारण आतंकवादास मुस्लिम व मुस्लिमेतर दोघेही बळी पडलेले आहेत. मात्र यासाठी मुस्लिमांवरच आरोप करण्यात येत आहेत. आतंकवाद हा केवळ आतंकवादच असतो. त्याला कोणत्याही धर्माशी अथवा संप्रदायाशी जोडणे हे निश्चितच अन्यायपूर्ण आहे.

मुस्लिमांना हे चांगलेच माहीत आहे की प्रत्येक आतंकवादी हल्ल्यामुळे मुस्लिम आणि इस्लामला बदनाम करणाऱ्यांचाच फायदा होतो, त्यांनाच बळ मिळते आणि त्यांचेच स्वार्थ पूर्ण होतात. कारण आतंकवादी हल्ला झाला की मुस्लिमेतरांच्या मनात भय निर्माण होऊन एक होतात आणि लोकशाहीत एक शक्ती निर्मित होते आणि या शक्तीचा फायदा इस्लाम विरोधक उठवितात. अशा प्रत्येक दुर्दैवी घटनेमुळे शक्ती वाढत जाते. या ठिकाणी ही शक्ती अतिमजबूत राजनैतिक शक्ती बनते जेथे आतंकवादी अधिक संख्येने होतात. म्हणूनच इस्लामला बदनाम करणाऱ्या या शक्तींना नेहमीच वाटत असते की असे आतंकवादी हल्ले होत राहावेत आणि बसल्याजागी काहीही न करता आपोआप त्यांना शक्ती मिळत राहावी. अशा परिस्थितीत आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे की अशा सांप्रदायिक शक्तींचा उद्देश सफल होऊ देऊ नये आणि देशाला अराजकतेपासून वाचवावे.

समर्पण

मी या पुस्तकाच्या सुरूवातीलाच माझ्या पूर्वीच्या पुस्तकासंबंधी अर्थात 'इस्लामी आतंकवाद का इतिहास'संबंधी लिहिले आहे की वास्तविक इस्लाम जाणून घेतल्यानंतर मला माझ्या चुकीची जाणीव झाली. इस्लामविषयी मी जे काही पूर्वी लिहिले व बोललो ते सर्व अनुचित होते.

इस्लामला जवळून न जाणणाऱ्या भ्रमित लोकांना आज असे वाटते की मुस्लिम मौलाना हे हिंदूंशी अथवा मुस्लिमेतरांशी तिरस्कार, वैर आणि घृणा बाळगतात. हे मुस्लिम मौलाना मुस्लिमेतरांशी अत्यंत निर्दयी आणि कठोर असतात. मात्र मी ही बाब स्वत: अनुभवली, जाणून घेतली आणि त्यांच्याविषयी ऐकले तेव्हा कळले की मुस्लिम मौलाना व्यवहारात सदाचारी व सद्वर्तनी असतात, ते अन्य धर्माचा व परधर्मियांचा आदर व सन्मान करतात. याबरोबरच ते मानवतेप्रति अत्यंत दयाळू आणि संवेदनशील असतात. एवढेच नव्हे तर मी त्यांच्यात सर्व संतांचे गुणदेखील पाहिले आहेत. इस्लामच्या मौलाना अथवा पंडितांचा आदरच केला पाहिजे. कारण ते इस्लामच्या नियमांचे कठोरतेने पालन करतात, चांगल्या गुणांचा सन्मान करतात. ते अतिसभ्य आणि मधुरभाषी असतात.

सुरूवातीस मीही या मुस्लिम धर्माचाऱ्यांविषयी चुकीची धारणा बनविली होती. याचा प्रभाव माझे पहिले पुस्तक 'इस्लामी आतंकवादाचा इतिहास'वर पडलेला आहे. आपल्या या चुकीविषयी प्रायश्चित करण्यासाठी मी सार्वजनिक रूपात माफी मागू इच्छितो. परंतु प्रश्न हा होता की माझे पुस्तक (इस्लामी आतंकवाद का इतिहास) आणि याविषयीचे कॅसेट्स पूर्ण देशात फैलावले गेले होते. म्हणून माफी (तौबा) आमी अशा प्रकारे मागू इच्छित होतो की ज्याला पूर्ण देशाने जाणावे. तेव्हाच माझ्या लिहिलेल्या व बोललेल्या शब्दांचे खंडन त्या लोकांपर्यंत पोहचू शकेल ज्यांनी याला वाचले किंवा ऐकले आहे. यासाठी हिंदू व मुस्लिमांच्या साहाय्यतेची आवश्यकता भासत होती. अशा लोकांच्या सहयोगप्राप्तीसाठी देशातील विभिन्न शहरांमध्ये जाऊन मी लोकांशी भेटत राहिलो. (ज्यांची विचारधारा अशी होती.)

लोक सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन दुसऱ्या दिवशी किंवा नंतर बोलवित, परंतु पुन्हा भेट घेण्याचे ते आश्वासन पाळीत नसत. अशा प्रकारे मी सतत सहा महिने देशाच्या कानाकोपऱ्यात धावत पळत होतो. यासाठी माझे फार पैसे आणि वेळ खर्च झाला. मिळकतीची सीमित साधने आणि धावपळीनेसुद्धा सफलता न मिळाल्याने मी निराश होऊ लागलो.

एके रात्री बराच काळ मला झोप आली नाही. माझ्या मनात विचारांचे काहूर माजले. मला वाटू लागले की मी जे इच्छितो ते अल्लाह म्हणजे ईश्वराला मंजूर नाही. म्हणून हा प्रयत्न मला सोडावा लागेल. हा विचार करता मला झोप लागली. झोपेत मला एक तेजस्वी पुरुष दिसले. त्यांनी मला हलवून सांगितले, "उठ! निराश होऊ नकोस. अल्लाहने तुझा पश्चात्ताप (तौबा) स्वीकारला आहे. जैसे ते लिहिले तसेच हे लिहून टाका. पुढे तुझ्यासाठी यशच यश आहे."

यानंतर माझी झोप उडाली. जाग आल्यानंतर मला खूप भीती वाटू लागली. मनात मोठी धडकी भरली होती. याच स्थितीत बसून राहिल्यानंतर उठून मी पाणी प्यालो. घड्याळाकडे पाहिले तेव्हा रात्रीचे तीन वाजून गेले होते. नंतर बसून मी स्वप्नाविषयी विचार करू लागलो. मला कळत नव्हते की, "जसे ते लिहिले तसेच हेसुद्ध लिहून टाका." याचा अर्थ काय आहे? थोडा वेळ विचार केल्यानंतर मला वाटले की याचा अर्थ असा होऊ शकतो, "जसे ते पुस्तक (इस्लामी आतंकवाद का इतिहास) लिहिले तसेच हे (म्हणजे जे सत्य आहे) लिहून टाका."

याला ईशआदेश (अदृश्यपणे आलेला आदेश) मानून मी निश्चय केला, की आता मी याविषयी कुणालाही भेटणार नाही. मोठे परिवर्तन असे झाले की पूर्वी माझ्या चुकीविषयी पश्चात्ताप (तौबा) करणे हाच एकमेव उद्देश होता. म्हणजे आपण लिहिले व बोलल्याविषयी सार्वजनिक रूपात खंडन करून माफी मागून गुपचूप बसून राहणे होते. तेव्हा हा ग्रंथ (इस्लाम : आतंक की आदर्श, हिंदी) लिहिण्याचा विचार माझ्या मनात नव्हता. परंतु हा आदेश आल्यानंतर आता माझा उद्देश बदलून गेला. आता मी इस्लामच्या सत्यतेविषयी हा ग्रंथ लिहिणे व व्याख्यानाद्वारे जनतेला वास्तविक इस्लामशी परिचित करवून या देशात पद्दलितांशी झालेल्या भेदभावाविरूद्ध आवाज उठविण्यासाठी तसेच हिंदू-मुस्लिमांमध्ये निर्माण झालेली दरी समाप्त करण्यासाठी 'भारतीय जन-सेवा फ्रंट' आणि 'हिंदू-मुस्लिम जन एकता मंच' संघटना बनविण्याचा निर्णय घेतला. ईश्वराशी प्रार्थना आहे की, या कार्यात सामील होण्यासाठी लोकांना प्रेरणा द्यावी.

यानंतर मी प्राथमिकतेच्या आधारावर हे पुस्तक लिहिण्याचा निश्चय केला. मात्र मागे मी जे पुस्तक लिहिले होते, त्याच्या विषयाशी हे पुस्तक अगदीच उलट होते. शिवाय या विषयावर मी कधी जास्त विचार केलेला नव्हता व जास्त माहितीसुद्धा नव्हती. एवढे असूनही मी एका अदृश्य शक्तीच्या प्रभावाने हे पुस्तक लिहू लागलो.

पुस्तक लिहिताना जसजसे योग घडत गेले आणि ज्याप्रकारे परिस्थिती अनुकूल होत गेली, त्यावरून मला पूर्ण विश्वास झाला की या सत्कार्यात मला निश्चितच अल्लाहची (ईश्वराची) रहस्यमय मदत मिळाली. त्यामुळेच मी हे लिहू शकलो.

जेव्हा मी हे पुस्तक लिहिण्यास सुरूवात केली, तेव्हा '२४ आयती' असलेल्या 'ज्या' पत्रकासंबंधी लिहिले, ते माझ्याकडे नव्हते. मला एवढे तर माहीत होते की अशा प्रकारचे पत्रक वितरित करण्यात आले, मात्र २४ आयतींपैकी काही आयती लक्षात नव्हत्या. मला पत्रक नसल्याची कमतरता खूप खलत होती. मला प्रश्न पडला की आता हे पत्रक कोठून आणू? मात्र आश्चर्य असे की त्याच दिवशी संध्याकाळी दिल्लीहून 'हिंदू रायटर्स फोरम'चे संस्थापक डॉ. के. व्ही. पालीवाल यांनी पाठविलेले २४ आयतींचे पत्रक मिळाले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी दिल्ली येथून प्रकाशित होणाऱ्या हिंदू महासभेचे पाक्षिक वृत्तपत्र 'हिंदू सभा वार्ता'सुद्धा प्राप्त झाले. त्यात हे सविस्तररित्या छापलेले होते. अशा प्रकारे दुसऱ्यांदा पत्रक मिळाल्याने मला या पुस्तकाचा तिसरा भाग लिहिणे शक्य झाले.

मानवतेच्या हितार्थ सत्य आणि न्यायाच्या या कार्यात यश मिळावे म्हणून मी अल्लाहची (ईश्वराची) मदत मागतो की त्या दयाळू व कृपाळूने माझी मदत करावी व मला सन्मार्ग दाखवावा.

हे पुस्तक 'इस्लाम आतंक नव्हे आदर्श' त्या परम कृपाळू व परम दयाळू अल्लाहलाच (ईश्वर) समर्पित आहे ज्याच्या कृपेने हे लिहिणे शक्य झाले.

वाचकांना कळकळीचे आवाहन

पुस्तकाची ही मराठी आवृत्ती विशेषत: त्या लोकांच्या सेवेत आहे ज्यांना इस्लामविषयी योग्य माहिती प्राप्त झालेली नाही, त्यांना इस्लामचे खरे स्वरूप माहीत व्हावे. त्याचप्रमाणे आपल्या मुस्लिम बांधवांचेसुद्धा हे परमकर्तव्य आहे की हे पुस्तक अधिकाधिक मुस्लिमेतर बांधवांत वितरित करावे आणि त्यांना हे पुस्तक वाचण्यासाठी प्रेरित करावे.

आम्ही या पुस्तकाची अन्य भाषेतील आवृत्तीसुद्धा प्रकाशित करू इच्छितो. ईश्वराची इच्छा असेल तर अनुवादक आणि प्रकाशक मिळताच हे सत्कार्यही मार्गी लागेल. सत्याचा हा संदेश आम्ही प्रत्येक मानवापर्यंत पोहचवू इच्छितो. यासाठी वाचकांना कळकळीचे आवाहन करण्यात येत आहे की या कार्यात सक्रिय हातभार लावावा.

सत्याप्रति समर्पित जनतेस समाजाच्या भलाईसाठीच्या या कार्यात सर्वतऱ्हेने सहकार्याची आवश्यकता आहे.

आपला

स्वामी लक्ष्मीशंकराचार्य

जीवनपरिचय

श्री स्वामी लक्ष्मीशंकराचार्य यांचा जन्म १९५३ साली कानपूर जनपद येथील एका ब्राह्मण परिवारात झाला. त्यांचे वडील दिवंगत सीताराम त्रिपाठी व आई श्रीमती कौशल्यादेवी व्यवसायाने शिक्षक होते. स्वामीजींचे शिक्षण कानपूर आणि इलाहाबाद येथे झाले. शिक्षण पूर्ण करून त्यांनी गुत्तेदारीचा व्यवसाय सुरू केला. मात्र व्यवसायात त्यांचे मन रमू शकले नाही. लवकरच त्यांनी भौतिकता त्यागून अध्यात्माशी जीवनाची गाठ बांधली.

वर्तमान काळात इस्लामविषयी होत असलेल्या वा करण्यात येत असलेल्या दुष्प्रचाराने प्रभावित होऊन त्यांनी 'इस्लामी आतंकवाद का इतिहास' (हिंदी) हे पुस्तक लिहिले. याचे 'द हिस्ट्री ऑफ इस्लामिक टेररिझम' या नावाने इंग्रजी भाषांतर मुंबई येथून प्रकाशित झाले. मात्र नंतर सत्य लक्षात आल्यावर त्यांनी आपल्या या पुस्तकावर खेद व्यक्त करून 'इस्लाम- आतंकवाद की आदर्श' हे पुस्तक हिंदीत लिहिले त्याचा मराठी अनुवाद 'इस्लाम- आतंक नव्हे आदर्श' प्रकाशित केला जात आहे.